शनिवार । २२ मे १९८२
किंमत दीड रुपया

# माणूस

## धर्मजागरण की गोंगाट?

पृष्ठ....५



## मधुस्मृती

शिवाय....
साम्यवादी राजवटीवरील
एक रूपककथा
पृष्ठ....१९

# सप्रेम नमस्कार

## (कोकणी) ' माणूस ' जागा होणार कधी ?

¤ पुण्याच्या 'माणूस' या साप्ताहिकाने रत्नागिरी जिल्ह्यातील वेठबिगारीचा नमुना नुकताच पेश केला आहे. त्याबद्दल त्यांचे व श्रीगमाचेही अभिनंदन करावे तेवढे थोडेच !

प्रस्तुत वेठबिगारीची कथा संतापजनक आणि कोणासही तशी चीड आणणारीच आहे; पण नुसती चीड, नुसता संताप आणून या रोगाचे निर्मूलन होणार नाही. यासाठी आता (कोकणी) माणूस जागा व्हायलाच हवा ! त्याने अगतिकपणे, जन्मजात दारिद्र्य आणि अजाण राहून यापुढे चालणार नाही! आवाज उठवून सरकारला अशा घटनांवर जालिम उपाय करण्यास भाग पाडले पाहिजे. तसेच समजून-उमजून डोळेझाक करून, या प्रश्नाकडे ' नशीब ' ' नशीब ' म्हणून नुसती बोटे मोडीत बसूनही आता चालणार नाही! तसेच सरकारनेदेखील (आणि पुढाऱ्यांनीही) मतापुरते येथे जागे न रहाता,ज्या मतांच्या जोरावर सत्ता व खुर्ची मिळाली त्या माणसाला आणि माणुसकीला जगवण्यासाठी, तळातील गाळातच तिला गाडण्यासाठी न वापरता गाळातून वर काढण्यासाठी पुढे झाले पाहिजे! अशासाठी पुण्याच्या या ' माणूस 'ने यापुढे ' माणसा 'साठी अशी धाव घेण्याची गरज भासता नये !

हे सारे खरे असले तरी कोकणात काय आणि आदिवासी, वारली आदी भागातील तथाकथित पुढाऱ्यानी आणि जाणत्या जनतेने आपली ' खरी जबाबदारी ' ओळखायला हवी. खरे पहाता सरकारपेक्षा जनतेने—कोकणी ' माणसा 'ने जागे व्हायला पाहिजे! आपल्या डोळ्यादेखत आपल्या बांधवाचे उभे आयुष्य मातीत घालण्याचे घोर कृत्य यापुढे व्हायला नको आहे. शेवटी सभोवतालची पंचक्रोशी व संबंधित जनताच अशा वेठबिगारीच्या किडीला जबाबदार आहे. सर्वांना जी अन्यायकारक गोष्ट आहे ती निर्दाळून ' माणूस ' मुक्त करण्याची जबाबदारी टाळून नामानिराळे रहाणे रानटीपणाचेच द्योतक ठरेल ! कोकणवासीच काय इतरत्र ठिकाणी नको तिथे व नको तितकी दिखाऊ सुधारणा वाढली आहे. शिक्षण-उद्योग-पैसा-सुखसोयी इत्यादीमध्ये प्रगती वारेमाप वाढली; पण मानसिक आणि बौद्धिक प्रकृती जंगलीच राहिली आहे. हे कोणत्याही आजच्या समाजाला व शासनाला भूषणावह नाही! पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणी ' चाकरी ' करणाऱ्या माणसाला हे कळत कसे नाही ? आणि तो तरी ह्यातून मुक्त आहे असे थोडेच ! घरातल्या लहान पोराखेरीच सर्व्यांनी ' पैसा मिळवावा ', ' साजच्याला पियाला ' जावं आणि उसनवारीही फेडीत जावं हेही बरोबर नाही ! या भागातील या सामान्य समाजातील नको तिथे नको तेवढे ' पुढारी ' पण मिरवावे; पण ही अशी वेठबिगार डोळ्याआड का करावी ? त्यासाठी 'आवाज' का उठवू नये ? म्हणनच आम्ही ' माणूस ' च्या श्रीगमाचे अभिनदन करताना पुन्हा आवाहन करतो की, (कोकणी) ' माणूस ' जागा केव्हा होणार व वेठबिगारीच्या आव्हानाला निर्भीड आणि परिणामकारक उत्तर केव्हा देणार ? का उघड्या डोळ्यानी माणसाचा व माणुसकीचा बळी घेत रहाणार ? तो पहात पहात गप्प रहाणार ?

६ मे ८२ दत्तु गोरे, पुणे

¤ आपल्या साप्ताहिकाच्या शनिवार ८ मे ८२ च्या अंकातील ' वेठबिगार ' आणि ' डाककर्मचारी ' या संबंधीचे लिखाण वाचण्यात आले.

दोनही विषयांचा फार जवळचा संबंध आहे. नित्य भेटणाऱ्या 'पोस्टमन' या मित्राशी थोडे हितगुज केल्यास सरकारी पातळीवर अनेक वर्षे मोठ्या प्रमाणावर पोस्टमन व इतर चतुर्थ श्रेणी डाककर्मचाऱ्याना वेठीस धरलेले आढळून येईल.

त्यातून सुटका करून घेण्यासाठी भारतीय डाक कर्मचारी संघटना वर्षापूर्वीच स्थापन झाली आहे–तिच्या सदस्यांची संख्या लक्षावधी आहे. त्यांना संघटित करून न्याय मिळविण्याच्या प्रयत्नास ती लागलेली आहे.

पिंपरीस पुणे शहर पूर्व विभागाचे ३०–३–८२ रोजी खुले अधिवेशन पहाण्याची संधी मिळाली.

ही संघटना भारतीय मजदूर संघाशी


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : एकावन्नावा

२२ मे १९८२

किमत : दीड रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

संलग्न असून संघाच्या नियमानुसार संघटनेचे सर्व पदाधिकारी कर्मचाऱ्यांतून निवडले जातात. त्याप्रमाणे त्याचे अ. भा. जनरल सेक्रेटरी एम. पी. साळवान (एक पोस्टमन) मुद्दाम दिल्लीहून आले होते. त्यांच्या भाषणातून आणि महाराष्ट्र भा. म. स. चे चिटणीस श्री. भाई शहा यांच्या प्रतिपादनातून त्यांच्या किमान मागण्याचे स्वरूप समजले.

त्यांची एक बोलकी घोषणा—
" महासंघ तेरी क्या पहचान
त्याग–तपस्या और बलिदान !"

याचे उदाहरण–(१) पुणे जिल्ह्यात पोस्टमन संख्या ६००, रनर्स १२००, रनर पार्टटाइमर पगार रु. ६०।– दरमहा, हंगामी नोकर (२)पोस्टमनची चाल मोजण्यास 'पादमीटर' असतो. पुणे विभागाच्या पादमीटरचा पाय अनेक वर्षे मोडलेला आहे! परिणाम? पोस्टमनांची संख्या वाढत नाही!

—ना. वा. भावे
नगर सदस्य–पिं. चिं. न.

# श्रमिक संघटनेची भूमिका

## —कुमार शिराळकर

२७ मार्च १९८२ च्या ' माणूस ' साप्ताहिकातील प्रा. रवींद्र पांडे याचे 'राष्ट्रीय एकात्मता–सातपुड्याच्या पायथ्याजवळची' या शीर्षकाखालचे लिखाण वाचले. रवींद्र पांडे हे कॉलेजमध्ये शिकविणारे, धुळे जिल्ह्यातील शहादा येथे गेले काही वर्षे राहात असलेले प्राध्यापक आहेत. पांडेजींनी आपल्या लिखाणात भारतीय जनता पक्षाच्या तथाकथित भारतीय कष्टकरी संघटनेचा व त्यानिमित्ताने लक्ष्मण कदम वगैरे याच पक्षाशी संबंधित असणाऱ्या व्यक्तीचा गौरव करण्याच्या उद्देशाने लिहिलेल्या या लिखाणात १९७२ पासून शहादे भागात कार्यरत असलेल्या श्रमिक संघटनेविषयी बदनामीकारक टोमणे मारण्याचा अव्यापारेषु व्यापारही केला आहे. प्राध्यापकमहाशयांनी लिखाणात म्हटले आहे, 'मार्क्सवाद्यांच्या श्रमिक संघटनेने पेटवलेला शेतकरी–शेतमजूर संघर्ष, त्यासाठी हिंसा आणि दशहतीचा मार्ग यामुळे प्रभावित असेच हे क्षेत्र आणि या संघर्षक्षेत्रात...'

प्रा. पांडे यांचे अज्ञान किंवा विचारविकृती, श्रमिकसंघटनेची माहिती ज्यांना आहे त्यांच्या लगेच लक्षात येऊ शकेल. एक तर शहादे भागातील श्र. सं. नेच्या नेतृत्वाने निर्माण झालेला संघर्ष हा हिंसा आणि दशहत यांचे विरोधात उभा झाला आहे. बड्या बागाईतदार शेतमालकांनी मजुराचे चालवलेले पराकोटीचे शोषण–काम, मजुरीवाढ आणि महागाईविरोध यासाठी काढलेल्या मोर्चावरची मालकवर्गाकडून झालेली दगडफेक, पोलिसांनी फोडलेली अश्रुधुराची नळकाडी, लाठीहल्ले आणि गोळीबार, डामरखेडासारख्या गावात ' बलुची ' वॉचमनकडून गुराखी मुलाना आणि आदिवासीना झालेली जबरदस्त मारहाण, निरपराध, दुबळ्या आदिवासीना झाडाला बांधून रक्त फुटेपर्यंत केलेली मारहाण, काठ्या–कुऱ्हाडी घेऊन ट्रॅक्टरमधून भरभरून आलेल्या शेतमालकांनी दादागिरी करून श्रमिकांच्या सभेवर सरकारी अधिकाऱ्याचे देखत घातलेली बंदी, किमान वेतनाची मागणी करणाऱ्या मजुरावर मंदाण्याच्या मालदारांनी केलेली हल्ल्याची जय्यत तयारी, आदिवासी स्त्रियांवर होणारे सामूहिक बलात्कार इत्यादि प्रकारांना प्राध्यापक काय म्हणू इच्छितात? या हिंसादहशतीच्या विरोधात दुबळ्या, भोळ्या दरिद्री आदिवासीना व इतर शेतमजुरांना संघटित करून त्यांची लढाऊ चळवळ उभारणे हा हिंसा आणि दहशतीचा मार्ग आहे काय? श्र सं. ने अशी संघटित लढाऊ चळवळ अन्याय, अत्याचार आणि शोषण करणाऱ्या बड्या सधन शेतमालकाच्या आणि छळ, जुलूम, भ्रष्टाचार करणाऱ्या फॉरेस्ट रेव्हेन्यू पोलीसखात्याच्या विरोधात उभारली आहे. मार्क्सवाद सरंजामी–भांडवली विषम व्यस्थेतील हिंसादहशतशोषण नष्ट करण्यासाठी मार्ग दाखवितो. हिंसा व दहशतीचा मार्ग अवलंबीत नाही. छळ करणाऱ्या दुष्ट शक्तीचा बंदोबस्त श्रमिकाच्या जागरूक शक्तीनेच होऊ शकतो ही शक्ती निर्माण करण्याचे कार्य श्र. सं. हेतुपुरस्सरपणे करत आहे. मार्क्सवादाचे वास्तव परिस्थितीतून उद्भवलेले वर्गसंघर्षाचे तत्त्व हा श्र. सं. च्या कार्याचा आधार आहे.

' शेतकरी–शेतमजूर संघर्ष ' "पण 'श्रमिक'ला ग्रामीण भागातला छोटा शेतकरी..... हा वर्ग शत्रू वाटतो व त्याविरुद्ध कायमचा संघर्ष पेटवून शेतकऱ्याच्या शेतातले पीक कापून, चोरून नेणे त्याना चूक वाटत नाही.." इत्यादि शब्द प्राध्यापकमहाशयांच्या ज्ञानाचा आवाकाच केवळ स्पष्ट करतात असे नाही तर शेतमजूर–गरीब शेतकऱ्याचे म्हणजेच पर्यायाने श्रमिक संघटनेचे दुष्मन जी भाषा वापरतात तीच प्राध्यापक गिरवत आहेत हेही स्पष्ट होते. अर्थात् प्राध्यापक ज्या लोणखेड्याच्या कॉलेजमध्ये चाकरी करतात ते 'पुरुषोत्तम सेना' फेम पी. के पाटलांच्या आधिपत्याखालचे कॉलेज आहे हे कळावे म्हणजे आश्चर्य वाटणार नाही. तथापी जनता पक्षाच्या पुढाऱ्यांच्या कॉलेजमध्ये पोट भरताना भारतीय जनता पक्षाचा गौरव करावा हेही नवल नव्हे! कारण श्रमिकाचे विरोधात भांडवलदार–जमीनदारांची बाजू घेण्याचा समान सूर जनता पक्ष व भा. ज. प. दोघेही सारख्याच तन्मयतेने छेडतात. असो.

अंबरसिंग सुरतवंती या आदिवासी तरुणाच्या पेटत्या मनाने पुकारलेला शहादे भागातील हा वर्गसंघर्ष गरीब शेतकरी व शेतमजुरांनी एकत्रितपणे चालविला आहे. आदिवासी शेतकऱ्यांच्या फसवून घेतलेल्या जमिनी परत ताब्यात घेण्याचे आंदोलन, जंगल व इतर पडित जमीन मिळावी म्हणून झालेले हजारोचे सत्याग्रह ह्यामध्ये आदिवासी शेतकरी व भूमिहीन शेतमजूर खांद्याला खांदा लावून लढले. दुष्काळात रोजगारासाठी काढलेल्या प्रचंड मोर्चात मध्यम शेतकरीही सामील झाला होता. शेतमजुरांच्या वेतनाबाबत झालेल्या आंदोलनात गरीब शेतकऱ्याकडे काम करणाऱ्या मजुरानी तो देईल ती मजुरी घ्यायची हा तर श्र. सं. चा नियमच आहे. मध्यम शेतकऱ्याला देखील सूट देण्याची भूमिका मजूर समितीने घेतली आहे. इतकेच नव्हे तर गरीब शेतकऱ्याशी आमचा लढा नाही हे वारंवार सांगत असताना एका किमान वेतन निरीक्षकाने (सरकारी) व खापर गावच्या बड्या जमीनदार मालकानी गरीब शेतकऱ्यांना जेव्हा खोडसाळपणे नोटिसा बजावून त्यांनीही कायद्याप्रमाणे वेतनातील फरक द्यायला सांगितले तेव्हा श्र. सं. ने त्या अधिकाऱ्याचा धिक्कार केला व त्याचे विरुद्ध तक्रार नोंदविली.

प्राध्यापक पांडेना श्र. सं. विषयी गैरसमज पसरविण्याचे काम दिल्याने त्यानी ते इमानेइतबारे पार पाडले पाहिजे ही गोष्ट खरी असली तरी असत्याचा आधार कपाळमोक्षाकडे नेतो हेही त्यानी विसरू नये.

ज्या पिंपराणी गावातील शिबिराचा उल्लेख पांडेजी करतात आणि त्या परिसरातील ज्या गावाबद्दल ते लिहितात त्या गावामध्ये बहुतेक सगळे आदिवासी राहातात हे आदिवासी भूमीहीन आणि गरीब शेतकरी आहेत. आदिवासीतील काही कारभारी मंडळी मध्यम शेतकरी आहेत. श्र. सं. ने यापैकी कुठल्याही गावात शेतमजुराचा मजुरीवाढीसाठी लढा दिलेला नाही. देण्याचा प्रश्न आज तरी उद्भवत नाही. इतकेच नव्हे तर १९७९ सालापर्यंत श्र. सं. खेरीज कुणीही या गावातून (सुरुवातीला ग्राम स्वराज्य समिती

पृष्ठ ३३ वर

मुंबई वार्ता

# साहित्यातले जातिभेद आणि वर्गभेद

नुकताच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वतीनं कै. अनंत काणेकराचा दुसरा स्मृति-दिन साजरा झाला काणेकराचा खास प्रांत अशा साहित्य। साहित्यसमीक्षेचा. या निमित्तानं विचार व्हावा, हे उचितच होतं. या विषयावर डॉ. विद्याधर पुंडलिकांचं व्याख्यान झाल.

सुरुवातीला काणेकराच्या गौरवपर काही बोलून, त्यांच्या थोडया आठवणी सांगून, पुंडलिकांनी आपल्या विषयाला हात घातला. काणेकरांच्या सूक्ष्म विनोदबुद्धीशी आणि विचारचापल्याशी जुळणारा निदान मथळा तरी असावा, असा आजचा विषय निवडण्यामागे हेतू होता—असं त्यानी म्हटलं खरं; पण त्यामध्ये केवळ तेवढाच उद्देश नव्हता. समीक्षेचीच समीक्षा करणं आणि समीक्षेत वापरल्या जाणाऱ्या, गृहीत धरल्या जाणाऱ्या टर्मिनॉलॉजीचं विश्लेषण करण, हा मीमांसेचा अविभाज्य भाग आहे आणि केवळ भाकड खटाटोप वगैरे चमचमीत शिव्या देऊन तो हद्दपार करता येणार नाही !

मात्र सौदर्यशास्त्रीय मीमासेचं हे क्षेत्र अतिशय निसरडं आणि फसवं ! सशाची शिगंच ती ! बोलण्याच्या नादात आणि वादाच्या ओघात तोल कधी ढळेल आणि अतिरेक कधी होईल ते वाद घालणारानाही समजू नये. काव्यामृताचं प्राशन करायचं सोडून समीक्षेच्या फूटपट्ट्या लावणं म्हणजे करटेपणा असं मानणारी भाबडी रसिकता हे एक टोक, तर 'भावनासे कर्तव्य ऊँचा होता है' असं मानत काटेकोर रेखीव फूटपट्टीवाली समीक्षा हे दुसरं टोक. या वेडेपणाला आणखी रंगत आणणारा घटक म्हणजे आपण स्वत: आणि आपण मानलेल्या समीक्षापद्धतीवरचा अढळ विश्वास !. आपल्या समीक्षेची मोहर पोस्टाच्या स्टॅम्पसारखी सरळसोट ठामपणे उठवण्याची वृत्ती आणि हाती सापडेल ते आपल्या वर्गीकरणाच्या पद्धतीत कोंबण्याचा नेमस्तपणा !

सरधोपट समीक्षेच्या अशा एका प्रवाहावर पुंडलिकांनी आपल्या भाषणात हल्ला चढवला. समीक्षेतले हे 'क्लिशे' म्हणजे 'कनविनिअंट स्टिक्स !' साहित्याच्या हिरवळीतली टोचणारी कुसळं म्हणजे काही समीक्षा-प्रकार ! उमरखय्यामप्रमाणे साहित्यतरूंच्या तळी मद्याची सुरई ! आणि (जमल्यास) प्रिया वगैरे घेऊन बसायला जावं, तर समीक्षेच्या लाल मुंग्या चावून काही स्वस्थ बसू देत नाहीत !—इत्यादि, इत्यादि. पुंडलिकांची ही चावाचाव ऐकून, गाडी एकूण 'समीक्षा म्हणजेच कशी भाकड' असल्या उतरणीला लागणार की काय ? अशी भीती वाटायला लागली. तशात पुंडलिकानी एका समीक्षकाचं अवतरणही उद्धृत केलं—'माय बिझनेस इज नॉट टू क्रिटिसाइज; आय रिलेट !' आता खरं म्हणजे अशी व द द्यावी अशा बऱ्याच व्याख्या उपलब्ध असतात आणि त्यांच्या जंजाळातून वाट काढणं हे तर साहित्याच्या अभ्यासकाचं काम असतं.

अर्थात् पुंडलिकांमधला विलक्षण विद्वानही या भाबडेपणात फार काळ गुतला नाही. साहित्याच्या क्षेत्रात सध्या फोफावलेल्या काटेरी कुंपणाबद्दल सांगून ते म्हणाले, 'ग्रामीण पीठ, शहरी पीठ आणि दलित पीठ असल्या निरनिराळ्या पीठांच्या शकराचार्यांचं आपापसात पटत नाही. ग्रामीण। दलितपणा ठरवण्याची तर रीतसर कमिशनंच बसली आहेत! हे सगळे एकमेकाना क्रांतिकारक। प्रतिक्रांतिकारक असा गौरव। शिव्या (अनुक्रमे) देत असतात. असाच गोंधळ माजवणारा आणखी एक जातिभेद म्हणजे साहित्यातला मध्यमवर्गीयपणा !

मध्यमवर्गीय ही शिवी आहे याची जाणीव ठळकपणे करून दिली ती मार्क्सवादी समीक्षाप्रवाहाने ! यामागची उपपत्ती ही अर्थातच सामाजिक आणि आर्थिक आहे मार्क्सनं मांडलेल्या साम्यवादात समाजाच उत्पादनव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून जे चित्र आहे, त्यात शोषित आणि शोषक असे समाजाचे दोनच वर्ग कल्पिलेले आहेत. हे दोन्ही वर्ग समाजातले सनातन वर्ग आहेत आणि ते तसेच राहतील. पुढे त्यांच्यातला संघर्ष कळसाला पोचून त्यातून क्रांती घडून येईल आणि साम्यवाद प्रस्थापित होईल असा हा एकूण सिद्धान्त आहे.

या साऱ्या विवेचनामध्ये विचार आहे तो केवळ टोकाच्या दोन वर्गांचा. मध्यमवर्गाला त्यात कुठे स्थान नव्हतं. कारण मार्क्सनं सिद्धान्त मांडला तेव्हा मध्यमवर्गाचा ठावठिकाणाही नव्हता; परंतु अभूतपूर्व वेगानं घडून आलेला तंत्रज्ञानाचा विकास आणि समाजस्थितीत त्यानं घडवून आणलेले मूलगामी बदल यांचा त्या सिद्धान्तात विचार नाही. मार्क्सचा द्रष्टेपणा त्या बाबतीत उणा पडल्यासारखाच दिसतो. तंत्रज्ञान आणि उद्योग याच्या अफाट प्रगतीनं सामाजिक आणि आर्थिक रचना बदलली नोकरशाहीचा उदय झाला आणि मध्यमवर्ग हा एक नवाच वर्ग ठळकपणे अस्तित्वात आला! याही समाजात सत्ता-संपत्तीचं केंद्रीकरण होतंच; पण मार्क्सच्या सिद्धान्तातली प्रखर वर्गविग्रहाची भावना मात्र उणावली आहे, पीळ कमी झाला आहे, हा तर अगदी कामगारनेत्यांचाही अनुभव आहे.

अतिशय गुतागुतीची आणि क्लिष्ट अशी ही वर्गरचना मार्क्सवादी, निओमार्क्सिस्ट वगैरे मंडळींनी चक्क टाळलीच ! त्यांनी बूर्ज्वा मध्यमवर्ग नाकारला, खोटा ठरवला. त्यांच्या भावना, सवेदनाक्षमता, अनुभव हे सारं खोटं ठरवलं, कमअस्सल ठरवलं ! आपल्या धर्मग्रंथाला चिकटून रहाण्याचा हा कर्मठपणा, पोथीनिष्ठा हे साम्यवादी विचारसरणीचं तर नव्हे, पण अनुयायांचं अगदी प्रस्थापित वैगुण्य आहे !

साम्यवादी विचारसरणीची ही अफूची गोळी एकदा चढवली की काय होतं ? पुंडलिक म्हणतात, 'समाजशास्त्राचे आणि तेही असे कर्मठ निकष साहित्य आणि कलाक्षेत्रात उतरले की, समीक्षकाचा संस्कृतिसंरक्षक होतो ! कलाकृती मिलिटरीतल्या रंगरूटासारखी पास नाही तर नापास केली जाते. मध्यमवर्गीय किंवा अ-मध्यमवर्गीय अशी लेबलं गोष्टींना सोयिस्करपणे लावली जातात. परिणामी कलेचं स्वातंत्र्य, वैविध्य, बहुविधत्व या साऱ्यावर गदा येते वास्तविक पहाता धर्म अथवा कला या स्वायत्त-सस्था आहेत. त्याचे निकष, नियम येतात ते त्याच्यातल्या अंतर्गत घडामोडीमधून. कलेच्या अंतर्गत गरजा असतात. सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सर्वसाधारण सास्कृतिक प्रवाहांचाही जबरदस्त शिरकाव कलाक्षेत्रात होत असतो आणि मंथनाची एक सतत प्रक्रिया तिथे चालू असते; पण यामुळे कलाविषयक आदर्शांमध्ये मूलगामी फरक सततच पडत असतात, असं मात्र नाही. एखादं चक्र खूप वेगानं फिरत असत, पण म्हणून ज्या आसा-

भोवती, मध्यबिंदूभोवती ते फिरत असतं, तो बिंदूही तसाच उलथा–पालथा होतो अस नव्हे. कलचे निकष बरेचसे असेच असतात. त्याच्या लेखी असंबद्ध-इर्‌रेलवंट काहीच नसतं; पण संपूर्ण नवं, मूलगामी असंही क्वचित असतं.

### प्रचंड वैविध्य

अशी परिस्थिती असताना बाहेरून एखादी आदर्शवादी समीक्षा लादणं आणि त्या पाशियल-अपुऱ्या समीक्षेच्या आधारे मध्यमवर्गीयपणा ठरवणं ही समाजशास्त्रीय टीका झाली. साहित्यिक नव्हे. खरं म्हणजे तथाकथित मध्यमवर्गीय समजल्या गेलेल्या साहित्य-परंपरेत प्रचंड वैविध्य आहे. पुरोगामी–प्रतिगामी, क्रांतिकारक-प्रतिक्रांतिकारक, सुधारक–सनातनी ही सारी टोक इथं बघायला मिळतात. काही दोन-चार विषय उदाहरणादाखल घ्या. भूतकाळ अथवा परंपरापूजन किंवा ऐतिहासिक मध्यवर्ती कल्पनांवरचं लेखन बघा. ब. मो. पुरदरे, शिवाजी सावंत, ना. स. इनामदार, रणजित देसाई, गो. नी. दांडेकर, पु. भा. भावे, कुसुमाग्रज, वसंत कानेटकर, सावरकर हे सारे लेखक थोड्याफार फरकानं याच कल्पनावर लिहीत असतात; पण केवळ एवढ्याच एका विशेषणावर–वर्णनावर त्याची बोळवण करणं त्यांच्यातीलही वैविध्याला किती अन्यायकारक ठरेल! कुटुब किंवा कुटुबकेंद्रीय चित्रण करणाऱ्या लेखकाविषयीही असच म्हणता येईल.

आणि अगदी त्यातूनही एखाद्याला मध्यमवर्गीयपणा फारच भिनला, तरी त्या विंचवालासुद्धा उतारा आहेच! अगदी 'जन्मना जायते शूद्रः' सारखी काही ती काळ्या दगडावरची रेघ नव्हे! हा उतारा म्हणजे डि-क्लासिंगचा. जन्म, संस्कारानं मध्यमवर्गीय असूनही त्या मर्यादा ओलांडणारेही लेखक असू शकतात. पुंडलिकानी या सदर्भात दोन ठळक उदाहरणं दिली, ती पूर्वीच्या काळातल्या मालतीबाई बेडेकर आणि हल्लीचे विजय तेंडुलकर. मध्यमवर्गीय परपरात राहूनही सहृदय व्यापकपणा असणारा लेखक म्हणजे कै. श्री. म. माटे!

खरं म्हणजे आज घडीला गाजणारे ज्याच्याकडून, ज्याच्या साहित्याकडून अपेक्षा ठेवावी असे जवळजवळ सारेच साहित्यिक मध्यमवर्गीय संस्कारातून निपजले आहेत आणि आपल्या–आपल्या मगदूर आणि शैलीप्रमाणे जीवनाच्या अस्सल अनुभवाचच ते चित्रण करत असतात. चि. वि. जोशी, पु ल. देशपाडे, कोल्हटकर असे विनोदकार, पाडगावकरांसारखे कवी, गाडगीळ, गोखल्यांसारखे कथाकार हे सारे मध्यमवर्गीय असतीलही; पण तो त्यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा केवळ एक भाग झाला. केवळ मध्यमवर्गीय म्हणून आणि त्याबद्दल सरसकट दूषण लावून त्याची समीक्षा पूर्ण होणार नाही. 'प्रस्थापित' अशी एक शिवी देऊन त्याची विल्हेवाट लावता येणार नाही. ती अतिशय ढोबळ टीका होईल.

पुंडलिकाचं हे भाषण ऐकता-ऐकता समीक्षासंबंधी तदनुषंगिक विचाराची एक मालिकाच माझ्या मनात जागी झाली. वागण्या-रहाण्याच्या, पोषाखाच्या रूढी अथवा फॅशन्स बनतात, तशा त्या साहित्याच्याही बनत असतात. काही साहित्यप्रकाराची काही काळात चलती असते. कधी असंही असतं की, एखादी विचारसरणी जनमानसावर अधिक प्रभाव टाकून असते, त्यामुळेही त्या विशिष्ट परंपरेतल्या साहित्याची निर्मिती अधिक होत असते; पण ही परिस्थिती केवळ कालसापेक्ष झाली. त्या मर्यादित साहित्यप्रकारावर समीक्षकानं आपल्या समीक्षाव्यवहाराची समग्र चौकट उभी करणं बरोबर नव्हे. साहित्याकडे जाताना टीकाकारानं आपल्याला जगताना, माणूस म्हणून आलेल्या अनुभवाची सामग्री घेऊन जावी हे ठीक; पण त्यापुढे जाऊन आपल्या तत्त्वप्रणालीतील आदर्श जसेच्या तसेच घेऊन जायचे म्हटलं, तर त्यानं ललितवाङ्मयाऐवजी बोधपद्र वाङ्मय आणि पार्टी लिटरेचर याच्याचकडे वळणं बरं. वर्णन, विश्लेषण आणि टीका अथवा जजमेंट या समीक्षेच्या तीन पातळ्या आहेत आणि त्या सर्वांमागे गृहीत धरली गेली आहे ती व्यापक समाजशास्त्रीय जाणीव आणि त्या जाणिवेनं दिलेली सहिष्णुता; संकुचितता नव्हे!

ही सहिष्णुता सुटली आणि कुणा तरी एकाच तत्त्वप्रणालीचा टिळा माथी लावून घेतला की, त्यामधून अनेक गोंधळ होतात समीक्षा–विचाराचा एकूण नूरच बदलून जातो. अगदी प्लेटो, डॉ. जॉन्सनपासून ते थेट आजपर्यंतचे किती तरी समीक्षक, मुक्कामावर अगदी पोचता पोचता चकवा पडून वाट चुकले आहेत ते या बोधवादी भूमिकेमुळ; तर दुसरीकडे मर्ढेकरांसारखे किती तरी कलावादी समीक्षकांच्या हातूनही मुद्दा निसटला आहे, तो काटेकोर कलावादामुळं. खरं म्हणजे साहित्य किंवा कलेचा हा फिनॉमिनन एवढा भव्य आहे, एवढा गुंतागुंतीचा आणि विविधतापूर्ण आहे की, निख्खळ कलावाद किंवा निख्खळ सामाजिक बांधिलकी अशा चिमट्यात तो अडकवता येणार नाही. ती केवळ विपर्यस्त टीका ठरेल!

समीक्षक तत्त्ववेत्त्याना गेली कित्येक शतकं चकवत आलेल्या या प्रश्नाच उत्तर खरं म्हणजे तसं फारसं कठिण नाही या दोहोंचाही सुवर्णमध्य, साहित्याप्रमाणे निकषांचंही बहुविधत्व हे त्याचं उत्तर आहे आणि ते वस्तुस्थितीला धरूनही आहे. साहित्य केवळ मनोरंजनही करत नाही आणि केवळ प्रचारही करत नाही. मग ते करतं तरी काय? आय. ए. रिचर्ड्स् म्हणतो, प्रत्येक साहित्यिक आपापल्या कुवतीप्रमाणे सत्याकडे बघण्याची वृत्ती अथवा दृष्टी देत असतो–ॲटिट्यूट टू रिॲलिटी–देत असतो. तर शेक्सपियरसारखे महामना साहित्यिक आपल्या भेदक बुद्धीनं ज्ञान अथवा 'इन्साइट इनटू रिॲलिटी' देत असतात. तेव्हा या बहुविध सत्याचं स्वरूप समजून घेणारी आणि देणारी अशी समीक्षाही बहुविध हवी, तिला तारतम्य हवं.

व्याख्यानाच्या शेवटी पुंडलिकानी सांगितलं, 'काणेकरामधली समधातता आणि सॅनिटी-शहाणपणा हा काणेकरामधला सर्वांत मोठा विशेष! टीकाकारामध्येही आवश्यक असेल तर तो हाच गुण! शहाणपणा, सूक्ष्म बुद्धिचापल्य आणि साहित्यिक जातिभेदापलीकडे जाणारी नजर ही टीकाकाराची गरज आहे आणि ती साहित्याचीही गरज आहे. असेच टीकाकार आपल्या विधायक टीकेतून साहित्याला अर्थ आणि आकार देत असतात, कर्मठ तत्त्वनिष्ठांच्या ते आवाक्याबाहेरचं आहे!'

–ललिता बर्वे

---

## मुक्काम संगमनेर

# शंकराचार्य पूजेतले....

नगरपरिषदेचा टॅंकर रस्त्यावरून पाण्याचा सडा घालत सकाळपासून गावातून हिंडत होता. गावातल्या मुख्य रस्त्यावर स्वागताच्या कमानी उभारलेल्या. भगव्या पताका–अनाउन्स करून लोकांना सांगितलेलं असल्यामुळं बऱ्याच दारांपुढं रांगोळ्या.

शृंगेरीपीठाच्या जगद्‌गुरु शंकराचार्यांच्या स्वागताची जय्यत तयारी झालेली. त्यांचा कार्यक्रम घडवून आणण्यात 'विश्व हिंदु परिषदे'न पुढाकार घेतलेला. एक स्वागत समितीही स्थापन झाली.

नगरपालिकेच्या मैदानात शहराच्या वतीनं शंकराचार्यांचा सत्कार होता.

मी तिथं गेलो. लोकांची मुबड उडालेली, त्यात बायकांची गर्दी जास्त.

गावातल्या मंडळांची ढोल-लेझीमची पथकं, शंकराचार्यांच्या 'संस्थाना'च्या गाडया, गळ्याचे पट्टे, दाक्षिणात्य पद्धतीची लुंगी, काळीभोर दाढी वाढवलेले, शेंडी राखलेले, त्याचे शिष्य अंगानं उघडे.

भगव्या झेंड्याची, ओवाळणाऱ्या तबकाची चिक्कार गर्दी—जो तो 'स्वामी'च्या पायांवर डोकं ठेवायला यायचा—'स्वामी'चे शिष्य सगळ्यांना हाताच्या अंतरावर राखत. सोबतीला पुढं-मागं पोलीसगाड्या—वरिष्ठ अधिकारी जातीनं व्यवस्था हाताळत होते.

चौकशी केली तेव्हा समजलं—खास सरकारी ऑर्डर्स आहेत. 'निधर्मी भारता' शंकराचार्यांना 'स्टेटऑनर' देऊन राजकीय नेत्यासारखी बडदास्त ठेवणारं आपलं निधर्मी सरकार!'

स्वागत गोंधळात आटोपलं—मुख्य रस्त्यावरून 'स्वामी' निघाले—त्यांच्या मागे-पुढे प्रचंड जमाव. गर्दी, लोटालोटी, खेचाखेच, दर्शनासाठी घुसखोरी, रस्त्यावरची गर्दी, त्यातून वाट काढत जाणारा भगवाध्वजधारी घोडेस्वार. लोकाचा हा उत्साह बघून एक सावरकरवादी म्हणालेसुद्धा, 'उद्या हिंदु राष्ट्र डिक्लेअर करून टाकतो!'

निघालेले स्वामी मिरवणुकीत प्रवचनाच्या ठिकाणी येऊन पोहोचले.

गर्दीचा रस्ता टाळून मी आधीच स्टेजसमोरची जागा पकडलेली.

शंकराचार्य आणि त्यांचे उत्तराधिकारी शिष्य याच्यासाठी व्याघ्राजिन टाकलेलं. ते त्यावर आसनस्थ झाले!

संयोजकानी सूत्रं हातात घेतली—

भटक्या-विमुक्त संघटनेच्या वतीनं निदर्शन होणार असं जाहीर झालेलं.

पत्रक त्या संघटनेत काम करणाऱ्या एका कार्यकर्त्यानं काढलेलं.

तो कार्यकर्ता 'जनजागरण अभियानात' केशरी टिळा लावून आघाडीवर होता.

तर या संघटनेच्या अध्यक्षानं पहिला हार अर्पण केला.

निदर्शनाच्या पार्श्वभूमीवर त्याच संघटनेच्या अध्यक्षाला हार घालायला मुद्दाम आणलं असाव—त्याला शंकराचार्यांविषयीच्या भावनेपेक्षा संघटनेतील आपापसातील हेव्यादाव्याचच अधिक कारण असावं. संयोजकानी त्याचा फायदा घेऊन निदर्शकाची हवाच काढून घेतली.

प्रास्ताविकात संयोजकानी विदेशी विचारवाल्यांना टोकायच ठरवलेलं असावं. कारण त्यांचं सगळं बोलणंच तसं होतं—

'केरळच्या कम्युनिस्ट राज्यकर्त्यांसुद्धा शंकराचार्यांना 'स्टेटऑनर' दिलय. हार घालणाऱ्या भटक्यांच्या संघटनेच्या अध्यक्षाना स्वामींनी हस्तस्पर्श केलाय. यावरून तुमच्या लक्षात आलं असेल स्वामी अस्पृश्यता पाळत नाहीत. हे तुम्हाला शंकराचार्यांबरोबर चर्चा करता येईल; पण चर्चा करणारा त्याच्या योग्यतेच हवा. पाचशे दिडक्या मिळवणाऱ्याला शंकराचार्य काय करतात असं विचारण्याचा काय अधिकार?—'

असं बरंच काही. किती तरी विसंगत, उथळ. मंत्रपठण—जागर—संस्कृततली भाषणं—मानपत्रसमर्पण.

पूजेसाठी म्हणून उत्तराधिकारी शिष्यस्वामी उठून गेले.

¤

भगवीवस्त्रं, रुद्राक्षाच्या माळा, शुभ्र दाढी, सोनेरी फ्रेमचा चष्मा, लोकांकडे बघतानाचा, भाषण ऐकतानाचा त्यांचा निरागस चेहरा. 'सगळी अजाण आहेत' असं भासवणारं त्यांचं हास्य—

शंकराचार्य बोलायला लागले—सावकाश, संथपणे. हिंदीतून बोलत होते—

'मी भारतीय आहे, तुमचा आहे, सगळ्यांचा आहे' पहिल्याच वाक्याला टाळ्यांचा कडकडाट.

टाळ्या अपेक्षित असाव्यात. ते क्षणभर थांबले. पुन्हा संथ स्वरात प्रवचन सुरू—

'प्रत्यकाने आपला आखून दिलेला धर्म पाळावा. पुरुषानी पुरुषाचा, स्त्रियानी स्त्रियांचा, साडी हे स्त्रियाचं वस्त्र तेच त्यानी वापरावं. त्यानी पुरुषी वस्त्र वापरल्यावर दोघातला फरक कसा जाणावा?

आपला धर्म जाणावा. तसं वागावं!

मुद्दयाच्या समर्थनार्थ एक उदाहरण—

'पॅन्ट-शर्ट घातलेलं कोण आहे हे निरखायला गेल्यावर एखादे वेळी चप्पल बसेल, कारण ती मुलगी होती—आपण तिला निरखत होतो. आपल्याला समजलं नव्हत म्हणून आपण बघितलं—दोष आपला नाही वस्त्राचा आहे! तीच स्त्रीवेषात असती तर न निरखता फरक जाणवला असता!

धर्मांतराच्या संदर्भातही असंच—

'आज आमदार-खासदार पाच-दहा लाख रुपये घेऊन या बेंचवरचे त्या बेंचवर बसतात. त्यांची किंमत जास्त म्हणून त्यांना पाच-दहा लाख लागतात; पण गरीब, अन्नाला मोताद असणारे मग दहा-वीस रुपयाला विकले जातात! पैशासाठी धर्मांतर करतात! त्याचं दारिद्र्य दूर करायला हवं. मग हा प्रश्नच उद्भवणार नाही!'

सामाजिक विषमतेचा, अस्पृश्यतेचा, दिल्या जाणाऱ्या वागणुकीच्या संदर्भात शंकराचार्यांनी काहीच उल्लेख केला नाही. जातिव्यवस्थेबद्दलही असच बोलेले. माझी अपेक्षा होती ठोस बोलतील, लोकाना खडसावतील—सांगतील—

आपण माणसं आहोत—सगळी सारखी—एका ईश्वराची लेकरं! मग हा माणसामाणसात भेदभाव कशाला—तोडून टाका—काढून टाका मनातून!—'

पण 'जगद्गुरु' असं नाही बोलले.

ते म्हणाले, 'आम्ही काय करणार? आम्ही कितीही म्हटल्यानं जात का पुसणार आहे? लोकच आम्हाला म्हणतात तुम्ही ब्राम्हण आहात. प्रत्येकाचा चेहरा त्याची जात सांगतो आणि सरकारही सगळीकडे जातीचा उल्लेख करायला लावतं. अशा उल्लेखाशिवाय तर पर्यायच नाही! मग त्यात आमचा काय दोष? आम्ही कुठं सांगतो—सरकार सांगतं!—'

सरकारवर ढकलून मोकळे!

असंच काही तरी—किती तरी! सुसंगती जाणवत नव्हती.

धार्मिक कर्मकांड, लग्नातल्या अनिष्ट रूढी, बुवाबाजी, अंधश्रद्धा याची जळमट झटकायला हवीत; पण त्यांचा साधा उल्लेखसुद्धा प्रवचनात कुठं झाला नाही!

'मी भारतीय आहे, मी तुमचा आहे, मी सर्वांचा आहे' म्हणून प्रवचन संपवले

कंटाळलेले आधीच कटले होते. भक्तिभावानं थांबलेल्यांनी जयजयकार करत स्वामींना मुक्कामी पोहचवलं.

¤

चर्चा करू इच्छिणाऱ्यांशी 'स्वामी' बोलतील. अशानी सकाळी ७ वाजता यावं, अशी सूचना संयोजकांनी दिलेली!

मी सकाळी सात वाजता मुक्कामी हजर!

गर्दी होतीच. निरनिराळ्या 'दरा'च्या पूजेसाठी लोकांनी नंबर लावलेले!

गेल्यावर समजलं 'स्वामी' पूजेत आहेत. नऊनंतर खाली येतील!

नंतरचा कार्यक्रम विचारला. तीन-चार घरी 'स्वामी'च्या 'मोठ्या' पूजा होत्या. पुन्हा बारा वाजता मुक्कामी. नंतर विश्रांती आणि प्रस्थान——

असा सगळा पॅक कार्यक्रम!

आणि मग असंही समजलं 'स्वामी' समोर जायचं असेल तर धोतर-पंचा या वेषात जायला हवं—

इथं रेंगाळण्यात अर्थ नाही हे मी जाणलं.

आपल्या शंभर शिष्यांच्या लव्याजम्यासह 'धर्मजागरण' करायला निघालेल्या आणि सगळा वेळ कर्मकांडात—पूजा-पाठात घालवणाऱ्या, लोकांना हाताच्या अंतरावर राखणाऱ्या या 'जगद्गुरूना' आणि 'हिंदु धर्म—मानवधर्म' अशा घोषणा देणाऱ्यांना 'धर्म' कुणी तरी सांगायला हवा की, हे वेड्याचं सोंग घेणं आहे की, आपण काय करतोय हे त्यांना समजत नाही!

असं असेल तर त्यांना क्षमा करायला मी कोणत्या देवाला सांगू?

—विनय गुणे

# शस्त्रकपात

## रेगनच्या सूचनांचे स्वरूप

वा. दा. रानडे

शस्त्रकपातीबाबत रशियाचे नेते ब्रेझनेव्ह यांच्याशी बोलणी करण्याची तयारी अमेरिकेचे अध्यक्ष रेगन यानी दर्शविली असून त्याबाबत एक योजनाही मांडली आहे. दोन्ही वडया राष्ट्रांनी जमिनीवरून सोडावयाच्या आपल्या क्षेपणास्त्रात एकतृतियांश कपात करावी अशी त्यांची सूचना आहे. अण्वस्त्रसाठ्याची परिस्थिती अलीकडे रशियात अनुकूल होत चालली असल्याचे आणि त्यामुळे कोणत्याही बाजूने प्रथम अण्वस्त्रहल्ल्याचा धोका वाढण्याचे अमेरिकेस वाटू लागले होते. तेव्हा हा धोका टाळण्यासाठी व दोन्ही बाजूच्या अण्वस्त्रबळात समतोल आणण्यासाठी रेगन यांनी ही सूचना केली आहे

रेगन याची सूचना रशियाने मान्य केली तर दोन्ही बाजूच्या क्षेपणास्त्राची संख्या ८५० व क्षेपणास्त्रातून टाकण्यात यावयाच्या अण्वस्त्रांची संख्या ५००० राहील. सध्या रशियाजवळची जमिनीवरची क्षेपणास्त्रे अमेरिकन क्षेपणास्त्रापेक्षा मोठी आणि अधिक अचूक आहेत. अमेरिकन क्षेपणास्त्रांपेक्षा दुप्पट अण्वस्त्रे ही क्षेपणास्त्रे आपल्याबरोबर नेऊ शकतात. शस्त्रकपातीची पहिली पायरी म्हणून जमिनीवरच्या क्षेपणास्त्रात कपात करण्याची सूचना याचे कारण दोन्ही राष्ट्राजवळच्या शस्त्रसाठ्यात सर्वांत असमतोल घटक हा आहे असे रेगन यांनी सांगितले.

रशियाजवळच्या २४०० क्षेपणास्त्रांपैकी १४०० जमिनीवरची आहेत. त्यापैकी ३०८ एस एस. १८ जातीची मोठी क्षेपणास्त्रे आहेत. ही क्षेपणास्त्रे दहा अण्वस्त्रे बरोबर नेऊ शकतात. अमेरिकेजवळ सध्या या क्षेपणास्त्राच्या तोडीचे क्षेपणास्त्र नाही. रशियाजवळ याशिवाय एस. एस. १७ जातीची ४ अण्वस्त्रे नेऊ शकणारी आणि एस. एस. १९ जातीची ६ अण्वस्त्रे नेऊ शकणारी क्षेपणास्त्रे आहेत.

अमेरिकेजवळच्या १७०० क्षेपणास्त्रांपैकी फक्त १३०० जमिनीवरची आहेत आणि त्यापैकी ५०० पेक्षा अधिक एकच अण्वस्त्र नेऊ शकतात. उलट अमेरिकन पाणबुड्यांजवळ ५७६ क्षेपणास्त्रे आहेत ती ४७५०० अण्वस्त्रे नेऊ शकतात तर रशियाच्या ९८९ पाणबुड्यांवरील क्षेपणास्त्रे फक्त १९०० अण्वस्त्रे नेऊ शकतात. तांत्रिक प्रगती बरीच झाली असली तरीही पाणबुडीवरील क्षेपणास्त्रे जमिनीवरील क्षेपणास्त्रापेक्षा कमी अचूक असतात. तरीसुद्धा अमेरिका ट्रिडंटर आणि रशियन टायकून जातीची जी नवी क्षेपणास्त्रे तयार करीत आहे त्यामुळे पाणबुड्यांवरुन टाकावयाच्या क्षेपणास्त्रांची अचूकता वाढेल.

जमिनीवरील क्षेपणास्त्राच्या बाबतीत रशियाची बाजू वरचढ असली तरी बाँबर विमानांच्या बाबतीत अमेरिकेची बाजू वरचढ आहे. रशियाजवळच्या बाँबर विमानाच्या दुप्पट बाँबर विमाने अमेरिकेजवळ आहेत. त्यात कपात करण्याचा उल्लेख रेगन यांनी आपल्या भाषणात केलेला नसला तरी रशियाबरोबरच्या वाटाघाटीत त्याचाही विचार करण्याची आमची तयारी आहे असे एका अमेरिकन अधिकाऱ्याने वॉशिंग्टनमध्ये पत्रकारांना सांगितले.

रेगन यांनी शस्त्रकपातीबाबत वाटाघाटीची तयारी दर्शविली असली तरी अनेक प्रकारची अण्वस्त्रे बरोबर नेऊ शकणाऱ्या एम. एक्स ही नवी क्षेपणास्त्रे, ट्रिडंटर ही पाणबुडीवरची क्षेपणास्त्रे आणि बी १ व स्टेल्थ या बाँबर विमानांचे उत्पादन अमेरिका चालूच ठेवील, हे अमेरिकन अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. जमिनीवरच्या क्षेपणास्त्राचे बाबतीत रशियाशी करार झाला तर २०० एम एक्स क्षेपणास्त्रे आणि ८५० ट्रिडंटर २ ही पाणबुड्यांवरची क्षेपणास्त्रे हाच अमेरिकेजवळचा क्षेपणास्त्र-साठा राहील.

एका बाजूला क्षेपणास्त्रे व बाँबर यांची निर्मिती चालू ठेवायची आणि दुसरीकडे शस्त्रकपात वाटाघाटीची सूचनाही करायची या रेगन यांच्या धोरणावर डेमोक्रॅटिक पक्षाच्या काही नेत्यांनी टीका केली आहे. सिनेटर एडवर्ड केनेडी म्हणाले, ' रेगन शस्त्रकपातीची भाषा बोलत असले तरी वस्तुत: अमेरिका एम एस क्षेपणास्त्र, बी १ बाँबर विमाने आणि इतर नव्या अण्वस्त्राची निर्मिती अमेरिका चालू ठेवणार आहे. अमेरिकन जनतेला जी शस्त्रकपात हवी आहे ती या प्रकारची नव्हे.

रिपब्लिकन पक्षातल्या कट्टर गटाचे नेतेही रेगन यांच्या सूचनांना फारसे अनुकूल नाहीत. त्यांच्या मते रेगन यांनी शस्त्रकपात वाटाघाटीची सूचना करायला हरकत नव्हती, पण पोलंड व अफगाणिस्तानचे प्रश्न त्याच्याशी निगडित करायला हवे होते. रशियाने पोलंडमध्ये लष्करी कायदा पुकारण्यास पाठिंबा दिला म्हणून अमेरिकेने गेल्या जानेवारीत शस्त्रकपात वाटाघाटीची तारीख ठरविण्यास नकार दिला होता; पण या वेळी अशी काही अट न घालता वाटाघाटी जूनअखेर सुरू होतील अशी आशा रेगन यांनी व्यक्त केली आहे.

जमिनीवरील अण्वस्त्रात कपात करण्याची रेगन याची सूचना रशिया मान्य करण्याची शक्यता कमी दिसते अण्वस्त्रात अमेरिकेचा वरचढपणा टिकवण्याचा हा प्रयत्न आहे अशी प्रतिक्रिया टास या रशियन वृत्तसंस्थेने व्यक्त केली. ही सूचना मान्य करावयाची तर रशियाला आपल्या जमिनीवरच्या क्षेपणास्त्रात बरीच कपात करावी लागेल. अमेरिकेची कपात मात्र फार कमी असेल, याकडे टासचे लक्ष वेधले आहे. जगात अण्वस्त्रविरोधी चळवळ वाढत आहे आणि या प्रश्नावर युरोपात अमेरिकाविरोधी भावना वाढत आहे. तिचा प्रभाव कमी करण्याचा रेगनच्या सूचनांमागे उद्देश आहे असे रशियास वाटते व त्याच्या या सूचनाबद्दल रशियन नेते साशंक आहेत.

शस्त्रकपात वाटाघाटीना ते तयारी दर्शविणार नाहीत असा याचा अर्थ नाही; पण जमिनीवरच्या क्षेपणास्त्रात एकतृतियांश कपात करावी ही रेगन यांची पहिले पाऊल म्हणून केलेली सूचना मात्र रशिया मान्य करण्याची शक्यता नाही. शस्त्रकपातीचा संपूर्ण करार एकदमच करावा अशी भूमिका रशियाने घेण्याचा संभव आहे

□

कामगारवृत्त

# पंडितांची 'वाटचाल'

अलीकडे कामगार-चळवळीत एक प्रश्न वारंवार विचारला जातो की, कामगार-चळवळीचे उद्दिष्ट काय? आजकाल कामगार-चळळीला धंद्याचे रूप प्राप्त झालं आहे, अशी अनेकाची तक्रार आहे. एखादा माल बरा वाटला की, लोक त्या मालावर जशी झडप घालतात, तसं एखादा कामगार-नेता बरा वाटला की, आजचे कामगार त्या नेत्याकडे झडप घालत असलेले दिसतात. जर हा कामगारनेता जास्तीत जास्त आर्थिक फायदे मिळवून देणारा असेल तर साहजिकच पूर्वीचे नेतृत्व सोडून हे कामगार या नव्या नेत्यापाठीमागे धावत असलेले दिसतात. म्हणूनच मालकाला कोंडीत पकडून जास्तीत जास्त आर्थिक फायदे मिळवून देणे हेच आजच्या कामगारचळवळीचे उद्दिष्ट आहे, असे काही कामगारनेते जाहीरपणे सागतात.

पण हे समीकरण मान्य नसलेले काही कामगारनेते आजही याच मुबईत पहावयास मिळतात. संघर्षाद्वारे आर्थिक फायदे मिळवून देण्याबरोबरच कामगारचळवळ विधायक कार्यासाठीही राबली पाहिजे, कामगाराला सुशिक्षित करून त्याला त्याच्या हक्कांची जाणीव करून दिली पाहिजे, उत्पादन वाढवून देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातही वाढ झाली पाहिजे, अशा विचाराचे काही लोक आजही येथे पहावयास मिळतात. कामगारनेते विजय पंडित हे त्यातीलच एक!

'माणूस'चा आणि विजय पंडितांचा परिचय हा अलिकडचाच! त्याची एक मुलाखत मागील वर्षीच्या डिसेंबर महिन्यात 'माणूस' मध्ये प्रकाशित झाली. ती पाहून विजय पंडित अर्थातच कमालीचे चकित झाले! कारण असं की, चलतीच्या पाठीमागे जसे कामगार धावतात तसे पत्रकारही धावत असल्याने आमच्यासारख्या संख्येने अल्प असलेल्या संघटनेकडे कोणीच लक्ष देणार नाही, (अर्थात् आपणहून) अशी विजय पंटित याची धारणा होती. 'माणूस'ने पहिल्याच भेटीत त्यांची ही धारणा खोटी ठरवली आणि आजकाल लौकिकात चमकणाऱ्या लोकासाठी जेवढी जागा लिहिण्यासाठी वापरली जाते तेवढीच जागा पंडितांच्यासाठी वापरून 'माणूस'ने त्याच्या विचारांचा गौरव केला.

या एका मुलाखतीने अनेक गोष्टी घडल्या. पंडितांच्या मनात फार दिवसापासून असे होते की, कामगाराना कायद्याचे ज्ञान देऊन त्यांना सुशिक्षित करण्यासाठी आपण एखादे नियतकालिक सुरू करावे. ही इच्छा त्यांच्या मनी घर करून बसलेली असली तरी ती प्रत्यक्षात कागदावर उतरत नव्हती. 'माणूस'च्या त्या मुलाखतीने त्याना जी प्रेरणा मिळाली त्यातूनच त्यांचे 'वाटचाल' हे नियतकालिक मार्च महिन्यापासून कामगारांसमोर आले.

'वाटचाल'चा उद्घाटनसोहळा चांगल्या प्रकारे संपन्न झाला. ना. ग. गोरे याच्या हस्ते या नियतकालिकाचे उद्घाटन झाले! वृत्तपत्रानी समाजप्रबोधनाचे कार्य करावे व या कामात 'वाटचाल'ने जराही मागे राहू नये असे आवाहन या वेळी ना. ग. गोरे यांनी केले.

'वाटचाल' चा पहिला अंक वाखाणण्यासारखाच होता. उत्कृष्ट छपाई, चागला कागद आणि अनेक सदरे यामुळे अंक पटकन हातात घ्यावासा वाटतोच; पण पहाता पहाता मन अनेक सदरात नकळत गुंतूनही बसते!

पहिल्या संपादकीय मध्ये युनियनच्या स्थापनेपासूनचा इतिहास वर्णन केला असून त्यात 'वाटचाल'चा हेतू, ध्येय-धोरणही आपणास वाचावयास मिळते. आपल्या पहिल्या संपादकीय मध्ये विजय पंडित म्हणतात— 'तर निरनिराळ्या व्यवसायात काम करणाऱ्या कामगाराला आपल्या हक्काची आणि कर्तव्याची जाणीव करून द्यावी याच प्रमुख हेतूने आज आम्ही ही 'वाटचाल' सुरू करीत आहोत. हक्क आणि कर्तव्याबरोबरच आमचा हा कामगार सुशिक्षित कसा होईल, याचीही काळजी आम्ही 'वाटचाल' मधून घेणार आहोत. आमच्या मताने सुशिक्षित याचा अर्थ केवळ लिहिता-वाचता येणारा असा नसून, त्या कामगाराला कायद्याचे ज्ञान देत सुशिक्षित करणे असा आहे.'

'या गोष्टीबरोबरच सरकारची जी ध्येय-धोरणे कामगारचळवळीस बाधक असतील त्यावरही आम्ही प्रहार करणार आहोत. सरकारप्रमाणेच जे कोणी कामगारनेते कामगाराला दाढेशी धरून स्वत.चा स्वार्थ साधत असतील त्यांच्यावरही आम्ही लेखणी उचलणार आहोत. ज्या कामगारासाठी आम्ही हे सर्व करणार आहोत तेच कामगार जर उद्या अतीव मार्गाला लागले तर दु:खद अंत:करणाने त्यांच्यावरही लेखणी उगारून आम्ही त्यांना योग्य मार्गाला आणण्याचा प्रयत्न करणार आहोत.'

अशा या सडेतोड भाषेत पडितांनी आपले जे ध्येय-धोरण विशद केले आहे त्यावरून ते कोणत्याही राजकीय पक्षाचे नसलेले दिसतात. याचबरोबर 'आमचे वैशिष्ट्यपूर्ण करार', 'हे बोलतात', 'माझेही मत', 'उगवते तारे' या सदराबरोबरच पहिल्या अंकात कुणाल, राजन कोचर, जी. आर. खानोलकर आणि प्रभाकर नेवगी आदीचे लेख आहेत.

पहिल्या अंकाचे कामगारांनी स्वागत केल्यानंतर दुसरा अंक त्याच थाटामाटात अगदी वेळेवर बाहेर आला. दुसऱ्या अंकातील संपादकीय ''सामंत-तंत्र' अमान्य; तरीही गिरणी संप यशस्वी करा!' खूपच गाजले. यामध्ये गिरणीकामगारांच्या संपाबाबत सविस्तर चर्चा केली असून डॉ. सामंतांनी हा संप सुरू करण्यापेक्षा कायदेशीर मार्गाने लढा देऊन, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे प्रतिनिधित्व संपवावयास हवे होते असे पंडितानी म्हटले आहे; पण असे जरी असले तरी हा अवर्णनीय संप यशस्वी करण्यासाठी सर्वांनी संघटित व्हावे असे आवाहन ही पंडितांनी केले आहे.

हे संपादकीय वस्तुस्थिती सागणारे असल्याने ते अनेकाना रुचले. यापाठोपाठ जे तिसरे संपादकीय बाहेर आले त्यामध्ये १९ एप्रिलच्या 'महाराष्ट्र बंद'बाबत माहिती आली आहे. यामध्ये गिरणीकामगाराच्या त्राण्यासाठी हा संप मागे घ्यावा असे पंडितांनी म्हटले आहे यावरून त्याच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या संपादकीयामध्ये सुसंगता दिसत नाही दोन्हीही लेखात विचाराची व धोरणाची एकसूत्रता शोधून सापडत नाही!

'वाटचाल'मध्ये कायदाविषयक, त्याच्या अंमलबजावणीबाबत बरीच माहिती उदाहरणांसहित आल्याने हे नियतकालिक कामगाराबरोबरच वकिलामध्येही गौरविले जात आहे.

प्रत्येक युनियनचे एक मुखपत्र असते, तसे आपलेही एक असावे या सकुचित विचारात 'वाटचाल' बसणारे नाहो. संपूर्ण कामगार-चळवळीला 'वाटचाल'मध्ये स्थान देण्याचे पंडितांनी ठरवले आहे. त्यामुळे 'वाटचाल' कामगारक्षेत्रात लवकरच लोकप्रिय होईल अशी आशा अनेकाना वाटते. पडितांनी कामगारचळवळीबरोबरच कामगाराना सुशिक्षित करण्याचे हे जे कार्य हाती घेतले आहे त्यामध्ये त्याना यश मिळो अशीच सर्वांची मनापासूनची इच्छा दिसते!

—मोहन शं. कुलकर्णी

स. शि. भावे

# भारतीय सेनादलात पार्किन्सन !

सेनादलातील श्रेणींचा पुनर्विचार करण्यासाठी केन्द्र सरकारने १९७९ साली एक कमिटी नेमली होती. त्या वेळचे भूदलप्रमुख जनरल मल्होत्रा, वायुदलप्रमुख एअरमार्शल लतीफ आणि नौदलप्रमुख अॅडमिरल परेरा या तिघांचा समितीत समावेश होता. या समितीने एका शिफारशीच्या फटक्यात अधिकारपदांची संख्या दुप्पट केली. हे चांगले झाले की वाईट ? असा प्रश्न गेल्या (१५ मे ८२) उत्तरमीमांसेत विचारला होता.

या शिफारशीमागे कोणते चांगले हेतू होते हे आधी पाहू.

. स्वातंत्र्यानंतर बासष्टपर्यंतच्या दहा-पंधरा वर्षांत केन्द्रीय सरकारचे सेनेकडे जे अक्षम्य दुर्लक्ष झाले त्यामुळे जवान आणि अधिकारी नाराज झाले होते. ही नाराजी दूर करण्याची गरज बासष्टच्या पराभवानंतर पटत गेली.

५० ते ६० या दशकात पारंपरिक (conventional) सैन्याचे महत्त्व आपल्या सरकारला कमी वाटू लागले होते. आण्विक शक्ती संपादन करणे अधिक महत्त्वाचे वाटत होते. अणुऊर्जेसाठी वेगळे खाते निर्माण करण्यात आले होते. पंतप्रधान पं. नेहरूंनी अखेरपर्यंत हे खाते खास स्वतःकडे ठेवले होते. अणुशक्तीचे महत्त्व ओळखण्याचे व अणुशक्तीबाबत स्वयंपूर्ण होण्याचे हे धोरण बरोबरच होते; पण पारंपारिक सैन्याकडे झालेले दुर्लक्ष बरोबर नव्हते.

आणखी असे की, या दशकात रणनीतीपेक्षा राजनीतीला वरचे स्थान प्राप्त झाले होते. राजनीतीच्या गणितात पाक हा आपला एकमेव शत्रू मानला जात होता. चीन हा प्राचीन मित्र होता. बांडुग परिषदेचे वेळी, आणि नंतर चाउ-एन-लाय यांनी दिल्लीला भेट दिली त्या वेळी, 'हिंदी-चिनी-भाईभाई' चे वातावरण होते ! ५५-५६ च्या या गोष्टी. ५७ ला पंडितजी सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय शांति-विजय-यात्रा संपवून दिल्लीस परतले तेव्हा डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी, केवळ स्वत:च्या निर्णयाने त्यांना, 'भारतरत्न' ही पदवी विमानतळावर प्रदान केली !

पंडितजींच्या धोरणाच्या यशोदुदुंभी या वेळी दुमदुमत होत्या. रणांगणावरही रणनेत्यांना निर्णय घेण्याची मोकळीक नव्हती. म्हणून तर ४८ साली पाक-घुसखोरांना दोन-तीन दिवसांत काश्मीरबाहेर उचलून फेकून देण्याची हिंमत बाळगणाऱ्या देशाभिमानी सेनाधिकाऱ्यांना राजनैतिक निर्णयाने मनगटे चावीत बसावे लागले ! युद्धतहकुबीरेषा आणि यूनो-निरीक्षक पत्करावे लागले. तहकुबीरेषेचा तो गळफास आजही आपल्या गळ्याभोवती आवळलेला आहे ! 'सार्वमत घेऊ' या भारताच्या आश्वासनाचे जगभर हसे झाले आहे.

या उपेक्षेने, दुय्यम दर्जाच्या वागणुकीने जवान व सेनाधिकारी ६२ साली वैतागले होते. सैन्याजवळ आधुनिक शस्त्रास्त्रे नव्हती. आधुनिक आणि पुरेशा सुविधा नव्हत्या. ६२ साली आपल्याकडे स्वयंचलित रायफली नव्हत्या. तसे हिमालयात चालू शकतील असे नवे, टिकाऊ बूट किंवा तंबू नव्हते. मुख्य म्हणजे युद्धाच्या धोरणविषयक निर्णयात सेनाधिकाऱ्यांना महत्त्वाचे मत नव्हते.

याचा एक उपपरिणाम म्हणजे सेना-सेवेचे महत्त्व कमी झाले होते आणि राजनैतिक सेवेचे महत्त्व वाढले होते. सरदार वल्लभभाई पटेल यांचे चिटणीस व नंतर भारताचे रशियातील राजदूत व्हो. पी. मेनन यांना जनरल करिअप्पा किंवा जनरल थिमय्या यांचेपेक्षा राजधानीत अधिक प्रभुत्व प्राप्त झाले होते. कृष्ण मेननसारखे संरक्षणमंत्री सेनेच्या प्रमुखांना कस्पटासारखे वागवीत होते, त्यांच्या अंगावर फेकून फायली परत करीत होते ! सेनाधिकारी यामुळे मनातून रुष्ट होते, अपमानित होते. त्यांचा आत्मविश्वास डळमळावा असे वातावरण होते.

६२ च्या चिनी थप्पडीनंतर आपण जागे झालो. सेनेचे महत्त्व नव्याने आपल्या लक्षात आले. "We were rudely awakened", अशी कबुली, आकाशवाणीवरील भाषणात पंडितजींनी राष्ट्राला उद्देशून दिली.

या धक्क्यातून सावरून सेनेने आपल्या पायावर भक्कम उभे राहावे म्हणून मग अनेक नव्या नव्या योजना उभ्या राहिल्या. एन सी. सी. महाविद्यालयीन व उच्च माध्यमिक पातळीवर सक्तीची झाली. थेट कमिशन देऊन अनेक नवे तरुण अधिकारी मर्यादित मुदतीसाठी भूदलात नेमले गेले. अधिकाऱ्यांचे वेतन व सुविधा यात लक्षणीय वाढ झाली. निवृत्त जवान व अधिकारी यांच्याकडे अधिक आदराने व आस्थेने पाहिले जाऊ लागले. त्यांच्या स्वास्थ्यासाठी, तसेच राष्ट्रासाठी अपंगत्व ओढवून घेतलेल्यांच्या पुनर्वसनासाठी अनेक योजना कार्यान्वित झाल्या !

शस्त्रास्त्रांचे नवे संशोधन सुरू झाले, नॅट व विजयंता यांच्या निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली. शस्त्रास्त्र-संशोधन-संस्था सुरू झाली. सुविधांचा नवा वाढलेला दर्जा आवश्यक मानला जाऊ लागला.

नवे संरक्षणमंत्री नेमले गेले.

सेनादलांविषयी नवी आणि पश्चात्तप्त कृतज्ञता साऱ्या राष्ट्राच्या मनात उत्पन्न झाली.

पंडितजी मात्र खचले ते खचले! त्या दारुण धक्क्यातून ते सावरले नाहीत. सव्वा-एक वर्षात, भुवनेश्वरला त्यांना पहिला शारीरिक धक्का बसला ! २७ मे ६४ ला, १८ वर्षांच्या पंतप्रधानकीनंतर त्यांनी देह ठेवला. यंदा या घटनेलाही १८ वर्षे पुरी होतील ! ◻

जाग येऊन केलेल्या उपाययोजनेचे पहिले फळ दिसले ते ६५ च्या युद्धात ! नवे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री व नवे संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या संयुक्त नेतृत्वाने सेनादलांच्या अधिकाऱ्यांना ४८ किंवा ६२ पेक्षा अधिक मोकळीक दिली

होती. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला होता, मनोधैर्य दृढ झाले होते, सामरिक महत्त्वाकांक्षा युयुत्सु झाली होती; डावपेचासाठी त्यांची कल्पनाशक्ती पल्लवित झाली होती. नॅट आणि विजयंता यानी पहिला विजयी तडाखा याच युद्धात हाणला होता !

७१ साली, नवीकरणाच्या या योजनांचे अधिक फल प्रत्ययाला आले. भूदल, नौदल आणि वायुदल–तीनही दलाच्या नेत्यांनी व जवानांनी तीनही आघाड्यांवर शर्थ केली ! लष्करी दणका आणि डावपेच दोन्हीत आपल्या सेनादलानी उच्च दर्जाचे प्राविण्य प्रकट केले. भारतीय सेनेचा आत्मप्रत्यय या वेळी जणू आकाशाला जाऊन भिडला !

¤

परंतु, आत्मप्रत्यय वाढला की भूकही वाढते !

भारतीय सेनेचे तेच झाले. तीनही दलाच्या अपेक्षा वाढल्या. वेतनाच्या, अधिक श्रेणीच्या, महत्त्वाच्या पदाच्या अपेक्षा वाढल्या. राष्ट्राने म्हणजे सरकारने, या अपेक्षा प्राधान्याने पुऱ्या केल्या पाहिजेत, तेवढी कृतज्ञता व समयज्ञता त्यांनी दाखविली पाहिजे अशी हक्कभावना त्यांच्या मनात संचरू लागली.

७५ साली आलेल्या आणीबाणीने ह्या हक्कभावनेला चांगलेच खतपाणी मिळाले. ही भावना चागली फोफावली !

आणीबाणीत कोणतेही सरकार सेनादलावर अधिकाधिक अवलंबून असते, या नियमाला भारतीय सरकार अपवाद नव्हते. अंतर्गत संभाव्य उठाव दडपण्यासाठी सेनेची मदत हवीच होती. शिवाय आणीबाणीत सेना शिरजोर होते तशी होऊ नये हेही धोरण होते. परिणामी सेनेवरील खर्चात या काळात भरपूर वाढ झाली. तसेच जास्त जास्त निवृत्त सेनाधिकाऱ्यांची नेमणूक महत्त्वाच्या मुलकी जागांवर होऊ लागली.

७७ साली जनता सरकार आले. या सरकारलाही सेनेची गरज होती. पोलिसांचे आणि राखीव दलाचे उठाव, जनता सरकारच्या राजवटीत, हेतूची व प्रेरणास्थानाची शंका यावी इतक्या नियमिततेने झाले. हे उठाव मोडून काढण्यासाठी पुन्हा सैन्य हवेच! सेनादलाचे महत्त्व वाढविणे हे धोरण जनता सरकारनेही कायम ठेवले. या धोरणाचे फळ म्हणजे मल्होत्रा, लतीफ व परेरा यांची समिती.

¤

या समितीने असा निष्कर्ष काढला की, सेनादलातील श्रेणींची सध्याची संख्या फार कमी आहे. बढतीच्या शक्यता त्यामुळे कमी आहेत. या साचलेल्या परिस्थितीत अधिकाऱ्यांच्या कर्तबगारीला योग्य आव्हान व पुरेशी प्रेरणा मिळत नाही. करिता, या श्रेणींची संख्या वाढविली पाहिजे !

हा विचार प्रथमदर्शनी कोणासही पटावा असाच आहे; पण तो अमलात आणण्यापूर्वी त्याचे व्यावहारिक परिणाम काय होतील, भविष्यकाळात कोणत्या अडचणी उभ्या राहतील असा विचार करायला हवा होता. पण १८–४–८२ च्या 'संडे ऑब्झर्व्हर' मधील लेखात श्री. बी. एम. सिंह यानी जी आकडेवारी दिली आहे ती पाहता असा पूर्वविचार झाला होता की नाही, याची शंका येते.

डिसेंबर ७९ मध्ये ज्युनियर कमिशन्ड अधिकाऱ्यांची (जमादार, सुभेदार इ.) एक लक्ष चौपन्न हजार नवी पदे एकदम निर्माण केली गेली. सुमारे एक महिन्याने बाराशेव्यायशी लेफ्टनंट कर्नल, पाचशेत्र्यायशी कर्नल आणि सव्वाशे ब्रिगेडियर ही नवी पदे निर्माण करण्यात आली. यात भर म्हणून मेजर या पदाचीच एक वेगळी वरिष्ठ वेतनश्रेणी निर्माण करण्यात आली.

यानंतर अवघ्या चार महिन्यात सव्वीस लेफ्टनंट कर्नल, एकशेअठरा कर्नल व अडतीस ब्रिगेडियर अशी आणखी जादा नवी पदे निर्माण करण्यात आली. नव्याने अधिकारावर आलेल्या इंदिरा सरकारने या विषयात जनता सरकारचे धोरणच चालू ठेवले. सेना व पूंजी यांस शरण जाणे ! २६ मे १९८० च्या आज्ञेत या वाढीचे जे कारण नमूद केले होते ते वर सांगितलेलेच कारण होते. सेनादलातील अधिकाऱ्यांसाठी व्यावसायिक प्रगतीच्या शक्यता वाढविणे !

¤

झाले हे सारे चागले झाले असेच कोणीही म्हणेल. व्यावसायिक बढतीची शक्यता वाढली की प्रेरणा (incentive) प्रबळ होईल. प्रेरणा प्रबळ झाली की कार्यक्षमता (efficiency) व कार्य (output) वाढेल असे गणित अगदी सरळ दिसते.

मात्र वरवर सरळ दिसणाऱ्या या गणिताचे उत्तर वाटते तितके सरळ नाही. पदाच्या या सरसकट वाढीने कार्यक्षमता व प्रत्यक्ष कार्य वाढेलच अशी हमी देता येत नाही. उलटपक्षी ती कमी होईल असा धोका संभवतो. असा धोका कसा व किती आहे हे समजण्यासाठी पदांच्या संख्येचे शास्त्र पाहणे आवश्यक आहे.

सेनादलात काय अथवा कोणत्याही संघटनेत, पदांची संख्या किती असणे योग्य होईल, याविषयी एक प्राथमिक तत्त्व असे की, जितक्या जबाबदारीच्या जागा, तितकी अधिकारपदे असावीत. म्हणजे जबाबदारीची कामे व जागा आणि अधिकारपदे यांचे आदर्श प्रमाण १:१ (एकास एक) असावे. सेनादलात नवी पदे निर्माण होण्यापूर्वी हे प्रमाण असेच एकास एक होते. आता मात्र इतकी पदे वाढवली आहेत की हे प्रमाण, जबाबदारीच्या एका जागेस समान श्रेणीची दोन पदे, असे झाले आहे.

हे प्रमाण असे अकस्मात् फुगवल्यामुळे अनेक गंभीर समस्या उभ्या राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यांपैकी काही समस्या वर्तमानकालीन तर काही भविष्यकालीन आहेत; पण या समस्यांचे गंभीर रूप पाहता त्यांचा तातडीने विचार झाला पाहिजे. 'माणूस'च्या वाचकांनी तर या समस्यांचा विशेष विचार करावयास हवा !

'एकास एक' हे प्रमाण 'एकास दोन' असे झाल्याने, जबाबदारीचे काम व ती जागा दुभगली गेली हा यातील सर्वांत मोठा धोका आहे ! एक उदाहरण पाहू. पूर्वी भूदलात लेफ्टनंट जनरलच्या जागा मर्यादित होत्या. पश्चिम, पूर्व, दक्षिण इत्यादी 'कमाण्डस्'चे जी. ओ. सी. इन्. सी., प्रत्यक्ष आघाडीवरील व सिमेवरील 'कोअर कमाण्डर', भूदलाच्या मध्यवर्ती कचेरीतील संचालक व सहसचालक–या जागापुरती ही लेफ्टनट जनरलची पदे मर्यादित होती. एका जागेस एक पद असे प्रमाण होते. आता लेफ्टनट जनरल या श्रेणीची पदे दुप्पट झाली; पण जबाबदारीच्या जागा तितक्याच राहिल्या. सैन्यासारख्या बदिस्त सघटनेत मनात आले की, वाढवल्या जबाबदारीच्या जागा असे करता येणार नाही. कमाण्डस् किंवा कोअर्स याची सख्या

वाढविता येणार नाही. म्हणजे सदर्न कमाण्डचा 'जनरल ऑफिसर कमांडिंग इन् चीफ' एकच राहणार ! लेफ्टनंट जनरल मात्र दोन होणार.

या दुसऱ्या लेफ्टनंट जनरलचे काय करायचे ? त्याच्याकडून कोणते काम करून घ्यायचे? त्याला दुसरे कोणतेतरी काम सांगावे लागणार. समजा, 'एरिया' किंवा 'सबएरिया' यांच्या पर्यवेक्षणाचे आणि तपासणीचे काम त्याला दिले तर त्यातून बरेच प्रश्न निर्माण होतील.

'जी ओ सी' ची तपासणी आणि या जादा लेफ्टनंट जनरलची तपासणी यात तसा फरक असणार नाही. असे झाले तर तपासणी–भेटींची संख्या वाढेल; पण त्यांचे महत्त्व कमी होईल.

तपासणी–भेटींच्या स्वरूपात फरक केला तर त्यांच्या दर्जात कमजास्तपणा येणार. भेटींच्या दर्जात कमजास्तपणा आला की दोन लेफ्टनंट जनरलच्या दर्जात कमजास्तपणा येणार. जी ओ सी चे पद वरचढ ठरणार. दुसऱ्याचे पद कमी दर्जाचे ठरणार. म्हणजे लेफ्टनंट जनरलची निम्मी पदे, उरलेल्या निम्म्यांपेक्षा कमी दर्जाची ठरणार. यामुळे लेफ्टनंट जनरल या पदाचा एकूण दर्जाच कमी होणार !

दर्जा कमी झाला की, त्या पदासाठी आज असलेली प्रेरणा (incentive) कमी होणार. वाढलेला पगार व पेन्शन अशी आर्थिक प्रेरणा तेवढी शिल्लक उरेल. खऱ्या कर्तबगार व पराक्रमी भूदल–अधिकाऱ्यांना ही प्रेरणा पुरेशी प्रबळ वाटणार नाही. काहींना ती अपमानास्पद वाटेल !

एका वेगळ्या रीतीनेही ही बढती अपमानास्पद वाटण्याचा धोका आहे. शिवाय आघाडीवरून अनुभवी व कर्तबगार अधिकारी कमी होण्याचा धोका आहे. हा धोका अधिक मोठा आहे. कारण तो देशाच्या सुरक्षिततेलाच धोका होऊ शकेल. कसे ते पाहा.

नेहमीचा नियम असा की, जागांपेक्षा पदे जास्त झाली की, पदांइतक्या जागा निर्माण करण्याकडे प्रवृत्ती होते. पार्किन्सनच्या नियमात म्हटलेच आहे, की 'जागा तितकी पदे' याऐवजी 'पदे तितक्या जागा' (तयार करणे), हे आधुनिक व्यवस्थापनाचे तंत्र आहे. वर आपण पाहिले की, देशातले सेनाविभाग (कमाण्ड्स), आघाडीवरचे भाग (कोअर्स) यात जबाबदारीच्या जागा वाढविणे हे कठिण, जवळजवळ अशक्यच आहे.

मग दिल्लीस सेनादलाच्या केंद्रीय कचेरीत व्यवस्थापकीय जागा अधिक संख्येने निर्माण कराव्या लागणार. या जागांवर ज्येष्ठतेने नेमणुका होणार. अशी सेवा ज्येष्ठता असलेले अधिकारी आज जी ओ सी किंवा कोअर-कमाण्डर आहेत. ज्येष्ठ व कर्तबगार अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष आघाडयांवरून काढून व्यवस्थापकीय जबाबदाऱ्यांत गुंतावे लागणार. आघाडी वा सेनाविभाग यांतून व्यवस्थापकीय कामाकडे जावे लागणे ही सध्या सेनाधिकाऱ्यांत कमीपणाची बाब समजली जाते. त्यामुळे एखाद्या मेजर जनरलला अशा बदलीत लेफ्टनंट जनरल होण्याची संधी मिळाली तरी तो नाराज होईल. खुद्द लेफ्टनंट जनरल या हुद्द्यांवर असलेला अधिकच नाराज होईल, हे उघडच आहे. याखेरीज, एकापेक्षा एक कर्तबगार अधिकारी आघाडयांवरून परत यावे यात देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने मोठी धोका आहे, तो वेगळा, आणि सर्वाधिक गंभीर, धोका आहे ! ☐


या पदवाढीने भविष्यकालीन असे दोन धोके उत्पन्न केले आहेत.

पहिला हा की, या वाढीने अधिकारी व जवान यांचे प्रमाण बदलणार आहे. आज हे प्रमाण १० सैनिकांत ४ अधिकारी व ६ जवान असे आहे. पदवाढीनंतर हे प्रमाण ६ अधिकारी व ४ जवान असे होईल. या बदलाचे दूरगामी परिणाम सेनादलातील शिस्त ढिली होण्यात जाणवतील. हाही धोका गंभीर आहे!

आणखी महत्त्वाचा धोका म्हणजे सेनादलांची वृत्ती बदलेल! आज ही संघटना एक ध्येयवादी संघटना आहे. थोड्याच काळात ती एक ट्रेड युनियन होईल असा संभव उत्पन्न झाला आहे. ही पदे एकदम वाढली. याने कामांचे महत्त्व कमी झाले. हे महत्त्व कमी झाले नाही असा समर्थनवाद (rationalisation) सुरू होईल. काम जास्त कसे आहे हे दाखवण्याची प्रवृत्ती वाढेल. या दिशेने जाता जाता लटक्या (psendo) व अनावश्यक कामांचीच गर्दी वाढविण्याची सवय लागेल. या साऱ्यात कागदी घोडे नाचविण्याचे अनुत्पादक (non-productive), बांडगुळी काम आपोआप वाढेल. पार्किन्सनने विस्ताराने समजावून दिले आहे त्याप्रमाणे हळूहळू या बांडगुळी कामाचाच पसारा अधिक होतो. या बांडगुळी कामाचे महत्त्व वाढते व खऱ्या कामावर या कामाचे वर्चस्व निर्माण होते. असे झाले की, ती संघटना येथे आपले सेनादल हेच एक मोठे हितसंबंधक्षेत्र (vested interest) तयार होते. ती एक स्वयंपूर्ण कॉर्पोरेशन (एलायसीसारखी) होते. लोकांवरचा तिचा बोजा सतत वाढता राहतो. लोकांबाबतची तिची कर्तव्यभावना (accountability) मात्र कमीकमी होत जाते. भारतीय सेवादलाची स्वयंपूर्ण कार्पोरेशन होण्याचा धोका आज क्षितिजावर दिसू लागला आहे. ☐


**तिसरी आवृत्ती**

**संपत आली**



**सांगत्ये ऐका**

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

अवती भवती । शरद कृष्णन

# □ एशियन गेम्स : दिल्ली सिध्द

एशियन गेम्स होणार की नाही, हे प्रश्नचिन्ह आता विरून गेले आहे. स्पर्धांना अजून सहा महिन्यांचा अवधी असला तरी एशियन गेम्स अखेरीस होणार याबाबत आता कोणताही संदेह नसल्याने क्रीडाक्षेत्रामध्ये स्वाभाविकच उत्साहाचे वातावरण आहे. या स्पर्धा भरवण्याबाबत प्रथम जेव्हा संमती देण्यात आली त्या वेळी सत्तास्थानी जनता पक्षाचे सरकार होते. नंतर चौधरी चरणसिंग यांचे काळजी-वाहू सरकार आले. आणि एशियन गेम्सची तयारी एकदम थंडावली. या स्पर्धांवर होणारा खर्च ही राष्ट्रीय हानी आहे असा दृष्टिकोन पंत-प्रधानानी स्वीकारल्यामुळे स्वाभाविकपणे, स्पर्धेच्या तयारीचे काम-काज एकदम थंडावले. पुढे इंदिराजीचे सरकार सत्तेवर आले. स्पर्धा भरवण्यास हे सरकार अनुकूल होते; पण आता प्रश्न वेळेचा होता. अल्पकाळात आंतरराष्ट्रीय स्पर्धांना आवश्यक असलेल्या क्रीडाविष-यक सुविधा उपलब्ध करून देता येतील का ? केवळ वर्षा-दोन वर्षांत ही तयारी होऊ शकेल का ? यासारखे प्रश्न चर्चिले जात असतानाच दुसऱ्या बाजूने स्पर्धांची तयारीही चालू होती. या तयारीची सूत्रे विद्याचरण शुक्ला यांच्या हाती आल्यावर स्पर्धेच्या तयारीला खरा वेग आला; परंतु शुक्लाजींची मंत्रिमंडळातून हकालपट्टी झाल्यावर त्यांना एशियन गेम्सच्या नियंत्रणमंडळातूनही बाजूला जावे लागले. त्यांच्या जागी आले बुटासिंग ! त्यांच्याबरोबर प्रसिद्धीप्रमुखही सिंग, खेरीज रामनिवास मिर्धा आणि अन्य उत्साही पदाधिकाऱ्यांचा ताफा सतत कार्यमग्न असल्याने आणि खर्चाच्या बाजूने सरकारने उदार धोरण स्वीकारल्याने स्पर्धांच्या कामास वेग आला. गेल्याच सप्ताहात पंतप्रधानांनी एशियन गेम्ससाठी चाललेल्या कामकाजाची स्वत: पहाणी केली आणि ज्या अपूर्व उत्साहाने हे कामकाज चालू आहे त्याचे तोंडभरून कौतुक केले ! अर्थात अजूनही पुष्कळ काम बाकी आहे. तथापी युद्धपातळीवर हे कामकाज चालू असल्याने नियोजित वेळेपूर्वी सर्व काम पूर्ण झाले असेल असा संयोजकांना विश्वास वाटतो.

### कायमच्या क्रीडा-सुविधा

एक क्रिकेटचा अपवाद वगळला तर आपल्या खेळाडूंचे व्हावे तसे कौतुक होत नाही. उत्तम खेळाडूंना सुयोग्य मार्गदर्शन मिळत नाही. त्याना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येत नाहीत. यश मिळाले नाही तर नावे ठेवण्यास सर्व सिद्ध असतात; परंतु यश मिळण्यासाठी जे मार्गदर्शन लागते, ज्या क्रीडासुविधा लागतात आणि खाजगी जीवनात जे स्वास्थ्य लागते त्यासाठी मात्र फारसे प्रयत्न होताना दिसत नाहीत. विविध खेळासाठी व व्यक्तिगत क्रीडा-नैपुण्यासाठी ज्या सुविधा एशियन गेम्सच्या निमित्ताने उपलब्ध करून देण्यात येत आहेत, त्यावर कोट्यवधी रुपये खर्च होत असले तरी या स्पर्धा होऊन गेल्यावरही तरुण खेळाडूंना या सुविधा उपलब्ध होणार असल्याने या खर्चाचे समर्थन करता येईल. खेरीज, खर्च झाला म्हणून जी प्रचंड ओरड केली जाते, तेवढा खर्च केला जात नाही. वाटेल ती चुकीची आकडेवारी या संदर्भात प्रसिद्ध झालेली दिसते. एशियन गेम्सचे संयोजन करणाऱ्या समितीने काढलेल्या पत्रकाप्रमाणे एकूण खर्च १०० कोटी रुपयाहून अधिक होणार नाही. तथापि एका जबाबदार साप्ताहिकाने चक्क १२०० कोटी रुपये या स्पर्धांसाठी खर्च होणार असल्याचे प्रसिद्ध केले ! वाजवी टीका केली तर समजू शकते; परंतु केवळ टीकेसाठी टीका करून या राष्ट्रीय प्रयत्नात गुतलेल्या मंडळीचा तेजोभंग करणे आपल्याला साफ नामंजूर आहे ! देश गरीब आहे हे खरे; परंतु एवढ्या खंडप्राय देशाने अशा स्पर्धा भरवण्याची जबाबदारी टाळणे केव्हाही समर्थनीय ठरले नसते. या स्पर्धा यशस्वीपणे भरवण्यात फार मोठा राष्ट्रीय सन्मान आहे. खेरीज क्रीडास्पर्धकांना उत्तेजन देण्याच्या दृष्टीने, या स्पर्धा टॉनिक-सारख्या उपयुक्त आहेत! क्रिकेटवाल्याचे जर आपण एवढे लाड करतो तर इतर क्रीडा–प्रकारात धडपडणाऱ्यांसाठी थोडीफार हालचाल केली तर बिघडले कोठे ? एवढ्या अवाढव्य देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंकडून ऑलेंपिकचे एखादे सुवर्णपदकही येऊ नये ही शोकांतिका नाही का ? ऑलेंपिक स्पर्धेमधील बोचरे अपयश दूर करायचे असेल तर खेळाडूंना उत्तेजन दिलेच पाहिजे ! आंतरराष्ट्रीय स्पर्धांतून आपले स्पर्धक पाठवलेच पाहिजेत आणि यासाठी होणारा खर्च, ही एक आवश्यक बाब मानली पाहिजे! हा विचार एकदा मान्य केला तर एशियन गेम्ससाठी खर्ची पडणारे १०० कोटी रुपये अनाठायी वाटत नाहीत. भारतासारख्या भुक्या, नंग्या लोकांच्या देशाला ही चैन परवडणारी नाही हा विचारही सर्वथैव चुकीचा नाही; पण त्याचबरोबर राष्ट्रीय सन्मानाच्या दृष्टीने काही गोष्टी कराव्याच लागतात ! एशियन गेम्स आपण यशस्वीपणे भरवू शकलो तर तोही एक राष्ट्रीय सन्मान आहे आणि हा सन्मान मिळवण्यासाठी आपण थोडीफार झीज सोसलीच पाहिजे !

या स्पर्धांचे प्रमुख असलेले ठिकाण जवाहरलाल नेहरू स्टेडियम हे पुढील महिनाअखेर पूर्ण होईल. केवळ फ्लड लाइटचे काम बाकी राहील आणि हे बाकी कामही सप्टेंबरअखेर पूर्ण होईल. या मैदा-नावर ७५ हजार प्रेक्षकांची सोय करण्यात आली असून एशियन गेम्सचे उद्घाटन, समारोप, अॅथलेटिक स्पर्धा व फुटबॉल सामने या-साठी हे मैदान वापरण्यात येईल. या मैदानावर सूर्यास्तानंतरही स्पर्धा होणार असल्याने, भरपूर प्रकाश उपलब्ध व्हावा यासाठी ५३ मीटर्स उंचीचे चार अतिभव्य टॉवर्स उभारण्यात येत आहेत. या प्रत्येक टॉवर्सवर असंख्य बल्बज् असतील. एका टेनिसकोर्टाएवढ्या आकाराच्या टॉवरवर हे बल्बज्चे जाळे पसरलेले असेल. असे चार बोर्डस असल्याने स्पर्धांसाठी आवश्यक असलेला परिपूर्ण प्रकाश उपलब्ध होऊ शकेल. विविध स्पर्धांचे निकाल घोषित करण्यासाठी एक तीन मजली इमारतीएवढा अतिप्रचंड बोर्ड उभारण्यात येत आहे. २० × ९ मीटर्सच्या या बोर्डावर स्पर्धांचे निकाल लगोलग घोषित केले जातील. हे निकाल इंग्रजी व हिंदी अशा दोन भाषां-मध्ये घोषित करण्यात येतील.

या बोर्डनजीकच वृत्तपत्रप्रतिनिधींसाठी जागा ठेवण्यात येईल,

तेथे त्यांना टेलिफोन व अन्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. बंदिस्त जागेमधील खेळांसाठी बांधून झालेले स्टेडियम, ही एक अभिमानास्पद कामगिरी मानावी लागेल. या स्टेडियममध्ये २५ हजार प्रेक्षक बसू शकतील. सपूर्ण युरोपमध्ये किंवा जपानसारख्या देशातही बंदिस्त जागेतील स्पर्धांसाठी एवढे मोठे स्टेडियम नाही! या स्टेडियमपेक्षा मोठी स्टेडियम्स केवळ अमेरिकेत आहेत. हे स्टेडियम आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धा भरविण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व अटी पूर्ण होतील अशा पद्धतीने बांधलेले आहे. अत्युत्कृष्ट प्रकाश-योजना असलेल्या वातानुकूलित स्टेडियममध्ये दूरदर्शनाच्या छाया-लेखकांसाठी खास मोक्याच्या जागा ठेवलेल्या आहेत. दूरदर्शनवर खेळ बघणाऱ्यांना जास्तीत जास्त समाधान मिळावे अशा दृष्टीने ही सोय करण्यात आली आहे. ऑलिम्पिक समितीच्या तीन सदस्यांनी या स्टेडियमला गेल्या सप्ताहात भेट देऊन स्टेडियमच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. जिम्नॅस्टिक्स, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन या स्पर्धांसाठी हे स्टेडियम वापरले जाईल. तालकटोरा स्विमिंगपूलमध्ये पोहण्याच्या विविध स्पर्धा होतील ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये असते त्या-प्रमाणे या तलावाचे पाणी किमान मर्यादेपर्यंत गरम करण्यात येईल.

एशियन गेम्ससाठी येणाऱ्या खेळाडूंसाठी विविध प्रकारचे ८५३ फ्लॅट्स् बांधण्यात आले आहेत. हे बांधकाम कायम स्वरूपाचे असल्याने गेम्स्नंतरही या फ्लॅट्स्चा वापर करता येईल, या फ्लॅट्स्-मधून ५ हजार खेळाडू व पदाधिकारी यांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. स्पर्धा संपल्यानंतर हे फ्लॅटस् आपल्याला मिळावेत यासाठी भली भली मंडळी वशिला लावून बसली आहेत अर्थात या फ्लॅटस्च्या वितरणाची जबाबदारी– कोणा एका व्यक्तीच्या हाती न ठेवता 'दिल्ली डेव्हलपमेन्ट कार्पोरेशन' या संस्थेकडे देण्यात आली आहे.

स्पर्धांचे स्वरूप स्पष्ट करणारे जे परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे त्याप्रमाणे आजवर कधीही झालेल्या नाहीत इतक्या भव्य प्रमाणात या स्पर्धा भरण्यात येत आहेत. एकूण २१ प्रकारच्या क्रीडा-स्पर्धांचा समावेश करण्यात आला असून त्यामध्ये हॅन्डबॉल, गोल्फ, यासारख्या स्पर्धा प्रथमच भरवण्यात येत आहेत. या स्पर्धा पार पडल्यानंतर ज्या सुविधांचा आपल्या स्पर्धकांना फायदा होणार आहे त्यामध्ये ॲथलेटिक्स स्पर्धकांसाठी असलेल्या सिंथेटिक ट्रॅकचा उल्लेख करता येईल. हॉकी खेळाडूंसाठी एस्ट्रो–टर्फ मैदान उपलब्ध होईल. बंदिस्त स्टेडियमचा बॅडमिंटन खेळणाऱ्या खेळाडूंना फायदा होईल. अन्य कोठे नाही तरी निदान दिल्लीत येऊन त्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या दर्जाप्रमाणे बनवलेल्या सुविधांचा फायदा घेता येईल. एशियन गेम्स् क्रीडाक्षेत्रामध्ये उत्साहाचा एक नवीन तरंग निर्माण करून जातील!

## भरपूर प्रसिद्धी – तिकिटांचे वाजवी दर

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडास्पर्धांसाठी ५–७ मोठ्या वृत्तपत्रांचे प्रतिनिधी पाठवले जातात; परंतु या एशियन गेम्सना जास्तीत जास्त प्रसिद्धी मिळावी म्हणून देशामधील सर्व प्रमुख प्रादेशिक वृत्तपत्र-प्रतिनिधींना पाचारण करण्यात आले आहे. दूरदर्शन व आकाशवाणी या दोन्ही माध्यमांतून या क्रीडास्पर्धांना योजनापूर्वक प्रसिद्धी देण्यात येत आहे. जास्तीत जास्त प्रेक्षकांना कमीत कमी खर्चामध्ये या स्पर्धेचा आनंद लुटता यावा या उद्देशाने तिकिटाचा किमान दर केवळ ५ रुपये म्हणजे सिनेमाच्या तिकिटाएवढा ठेवण्यात येणार आहे. तिकिटछपाईच्या कामाबाबत विलक्षण गुप्तता पाळण्यात येत असून नाशिकच्या सरकारी छापखान्यात तिकिटछपाईचे काम सुरू आहे. नकली तिकिटे बाजारात येऊ नयेत यासाठी विशेष दक्षता घेण्यात येत आहे. देणगीदारासाठी मुख्य स्टेडियममध्ये जागा राखून ठेवण्यात येणार असून पंधरा दिवसांसाठी साधारणपणे नऊ हजार पाचशे रुपये प्रत्येक देणगीदाराला एका जागेसाठी मोजावे लागतील. पाच दिवसांच्या क्रिकेट–कसोटीसाठी मोठ्या रकमा खर्ची घालणाऱ्या श्रीमान शौकिनांना ही १५ दिवसांसाठी १० हजाराची रक्कम काही तशी मोठी नाही! अन्य दराच्या तिकिटांसाठी सीझन–तिकिट नाही. रोजची तिकिटे रोज विकली जातील. उद्घाटन व समारोप यासाठी तिकिटाचे कमाल दर असून या दिवशी १०० रुपये, ३० रुपये व १० रुपये अशा दराने तिकिटविक्री करण्यात येईल. फुटबॉलच्या अंतिम सामन्यांसाठी २५ रुपयांपासून ५ रुपयापर्यंतची तिकिटे आहेत.

भारत या वेळी जवळजवळ सर्व स्पर्धांमध्ये भाग घेईल. भारतीय खेळाडूंना कितपत यश मिळेल याबाबत आत्ताच काही भाकिते करणे अवघड आहे. तथापी प्रयत्न मात्र जोरात चालू आहेत! विविध खेळाडूंच्या मार्गदर्शनासाठी १.५ कोटी रुपयाची रक्कम खर्ची पडणार आहे. अचूक मार्गदर्शन लाभल्यास ज्यांच्याबद्दल अपेक्षा आहेत अशा विविध खेळाडूंना यश मिळण्याची शक्यता वाटते. त्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या मार्गदर्शकाचे सहाय्य मिळवून खेळाडू तयार करण्याचे प्रयत्न जारी आहेत. सध्या विविध खेळाचे १२ विदेशी मार्गदर्शक आपल्या खेळाडूंना मार्गदर्शन करत आहेत. रशिया व पूर्वजर्मनी यांनी आपल्या ॲथलेटस्ना विशेष मार्गदर्शन करण्याचे मान्य केले आहे.


या स्पर्धांचे संयोजन करण्यासाठी २,६०० तांत्रिक अधिकाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येत आहे. दिल्लीमध्ये या स्पर्धा भरवण्याचा एक मोठा तोटा असा असतो की, मानाच्या मानकऱ्यांची यादी इथे फुगतच जाते! केंद्रीय मंत्री, खासदार, सरकारी अधिकारी या सर्वांना दिल्लीमधील प्रत्येक लहान–मोठ्या कार्यक्रमासाठी आपल्याला सह-कुटुंब, सहपरिवार बोलावले जावे असे वाटत असते. आता या सर्वांना बोलावणे केवळ अशक्य आहे आणि विशेष म्हणजे निमंत्रिताची यादी फुगली तर अर्थातच तिकीट घेऊन येणाऱ्यावर अन्याय होणारच. या दृष्टीने निमंत्रिताची यादी अत्यंत मर्यादित करण्यात आली आहे. अर्थात दिल्लीमधील कामाचे एकंदर स्वरूपच असे आहे की ही मर्यादित यादी आस्ते आस्ते फुगत जाते. या फुकट्या मंडळींना आवरणे हेही संयोजकांना एक मोठे आव्हानच आहे. कोणाचे गैरसमज होऊ नयेत यासाठी मान्यवरांना पत्रे पाठवून त्यांच्याकडे तिकिटांबाबत विचारणा करण्यात येत आहे खासदारांना मोफत पास मिळणार नाहीत; परंतु सवलतीच्या दराने तिकिटे दिली जातील. सह-सचिवापर्यंतच्या अधिकाऱ्यांनाही अशी सवलत देण्यात येईल. मंत्रीगणांना केवळ उद्घाटन व समारोप यासाठीच निमंत्रित केले जाईल. स्पर्धा-संयोजन आता अखेरच्या टप्प्यात आहे. या स्पर्धा आपण यशस्वीपणे भरवू शकू असा विश्वास संयोजकामध्ये निर्माण झाला आहे. घोडे–मैदान तसे जवळच असल्याने प्रत्यक्ष काय होते तेही लवकरच दिसेल!

## □ भारतीय हॉकीची दुर्दशा !

आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये गौरवशाली यश मिळवलेल्या भारतीय हॉकीची सध्या चांगलीच दुर्दशा झालेली दिसते ! हॉकी संघटनेचे पदाधिकारी आणि हॉकी–खेळाडू यांच्यामध्ये तणाव निर्माण झाला असून हॉकी फेडरेशनचे अध्यक्ष श्री. महाजन यांच्याविरुद्ध टीकेचे मोठे मोहोळ उठले आहे. कोणत्याही खेळाडूंना त्यांच्या कठीण काळातच सहानुभूतीची व मार्गदर्शनाची गरज असते. पदरी अपयश येत असताना पदाधिकाऱ्यांकडून मानहानी झाली तर खेळाडूंचे नीतिधैर्य खच्ची होण्याचा संभव असतो; परंतु हॉकी फेडरेशनच्या अधिकाऱ्यांना या गोष्टीचे जराही भान दिसत नाही. हॉकीसंघाचा कर्णधार सुरजितसिंग याने आपल्या निवृत्तीची घोषणा करताना हॉकी फेडरेशनकडून खेळाडूंची कशी मानहानी होते याची उदाहरणे दिली आहेत. तीस वर्षांच्या सुरजितने आंतरराष्ट्रीय सामन्यातून निवृत्ती स्वीकारली असली तरी पंजाब पोलिसांतर्फे आपण हॉकी खेळू असा खुलासाही केला आहे. भारतीय संघाचे नेतृत्व आपल्याकडे असले तरी आपली सतत उपेक्षा झाली असा आरोप त्याने केला असून हॉकी फेडरेशनच्या संघटकांनी वर्ल्ड कप सामन्यांसाठी भारतीय संघ निवडताना आपला विचार घेतला नाही. कराची येथे मार्चमध्ये जे सामने झाले त्या वेळीही कर्णधार असूनही माझी अशीच उपेक्षा करण्यात आली. स्पर्धेमध्ये खेळणाऱ्या खेळाडूंना नियमाप्रमाणे भत्ता द्यावा लागतो; पण खेळाडूंना असा भत्ता दिला गेला नाही आणि त्याबाबत विचारणा केली असता अपमानास्पद वागणूक दिली गेली, असा आरोपही त्याने संघटकांवर केला आहे. कर्णधार असल्याने खेळाडूंनी आपल्याकडे दैनंदिन भत्त्याबाबत विचारणा केली म्हणून आपण या संदर्भात साधी चौकशी केली तर शिस्तभंगाचा आरोप करण्यात आला. हॉकी फेडरेशनचे अध्यक्ष श्री. महाजन म्हणाले, ‘ भत्ते मागताय, प्रथम खेळ सुधारा, यश मिळवून दाखवा मग बघू! ’ हॉकी खेळण्यासाठी मैदानात उतरताना आम्हाला कधीही उत्तेजन दिले गेले नाही. उलट कराची येथील आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या वेळी आपला संघ पराभूत होणार हे गृहितच धरून महाजन यांनी परतीच्या तिकिटांची व्यवस्था केली. स्वतः महाजन मात्र खरेदी करण्यासाठी मागे राहिले होते. सुरजित सिंगच्या या विविध आरोपांची चौकशी झालीच पाहिजे. खेळाडूंना मिळणाऱ्या सुविधांचा मैदानावरील जय-पराजयाशी संबंध लावणे केवळ चूकच नाही तर खेळाडूंना नाउमेद करणारे आहे ! हॉकी फेडरेशनचा कारभार श्री. महाजन ज्या पद्धतीने चालवत आहेत त्याबद्दल राजस्थान हॉकी फेडरेशनने तीव्र नापसंती व्यक्त केली असून विनंती करूनही राष्ट्रीय फेडरेशनच्या जनरल बॉडीची मीटिंग गेल्या दोन वर्षांत न बोलवल्याबद्दल श्री. महाजन यांना दोषी ठरवले आहे ! फेडरेशनचे नियम धाब्यावर बसवून श्री. महाजन यांनी दोन सहसचिवांची व दोन उपाध्यक्षांची नेमणूक केल्याबद्दल राजस्थान हॉकी फेडरेशनने नाराजी व्यक्त केली आहे.

क्रीडासंघटना आणि खेळाडू यांचे संबंध वास्तविक पहाता जबाबदार पालक व पाल्य असे असावयास पाहिजेत; पण आपल्याकडील क्रीडासंघटक म्हणजे आपण संबंधित संघटनेचे मालकच आहोत असे भासवतात आणि खेळाडूंना नोकरांप्रमाणे वागवतात. त्यांच्यावर अनेक जाचक अटी लादतात ! खेळाचा दर्जा सुधारायचा असेल तर खेळाडूंबद्दल ममत्व असलेल्या संघटकांच्या हाती संघटनेची सूत्रे असणे आवश्यक आहे. भारतीय हॉकीसंघाची सध्याची अवस्था दयनीय आहे हे खरे. खेळाडूंना या गोष्टीची जाणीव नसते अशातला भाग नाही. तथापी या अपयशाचे विश्लेषण करून परिस्थितीवर मात करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. जबाबदार संघटकांनी त्यांना साथ देणे जरूर असते. तथापी खेळाडूंना त्यांचे भत्ते नाकारणे, त्यांची हेतुतः मानहानी करणे यासारख्या गोष्टी जर हॉकी फेडरेशनचे अध्यक्ष करत असतील तर ती विलक्षण संतापाची बाब मानावी लागेल! सुरजितच्या निवृत्तीमागे त्याची व्यक्तिगत कारणे असतील ती असोत; पण संघटनेबद्दलची व श्री. महाजन यांच्याबद्दलची त्याची नाराजी पुरेशा तिखटपणे व्यक्त झाली आहे यात शंका नाही.

□



**लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी**

**लेखक : पु. ल. इनामदार**

**मूल्य : २० रुपये**

**राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०**

श्यामचा संसार (कथा ३६ वी)

# आता वा. म.

## मराठी साहित्य संमेलन

फिरोझ रानडे

श्याम मसकत-ओमानहून काही दिवसांच्या रजेवर मुबईला आला होता. पाच-सहा परदेशांत राहून आल्यावर त्याला वाळकेश्वर मलबारहिल भागात येताच अगदी घरी आल्यासारखे वाटले होते खरं म्हणजे श्याम-राधाला त्या भागातच का पण मुबईलाच येऊन मुळी जेमतेम १०–१२ महिने झाले होते. तरीसुद्धा टॅक्सी केम्पस्–कॉर्नरवर येताच त्याला घरी येण्याचा–म्हणजे आपल्या लोकात येण्याचा भास झाला होता. माणूस किती चटकन एखाद्या जागी समरस होतो नाही? टॅक्सी वळता वळता श्यामच्या मनातले विचारही वळत होते.

पाच–सहा महिन्यांनंतर श्याम आल्यामुळे त्याच्या कुटुबात, त्याच्या नातेवाइकांत व त्याच्या मित्र–मंडळीत अगदी आनंदी–आनंद झाला होता. स्वत. श्याम ओमानच्या रखरखीत वाळवंटासारख्या एकट्या आयुष्यास कंटाळून गेला होता व असे अनपेक्षितपणे रजेवर यावयास मिळाले म्हणून खूप आनंदात होता!

ह्या सगळ्या आनंदाला एकच गालबोट लागले होते. होणार होणार म्हणून गाजलेले प्रती वा पत्री मराठी साहित्यसंमेलन वाजत-गाजत सुरू झाले होते व वाजत-गाजत संपले होते. ह्या संमेलनाच्या खुब्या इतर असंख्य वाचकांप्रमाणे श्याम व राधाने वाचल्या होत्या.

गेले पाच-सहा महिने श्याम आपल्या परीने मराठी साहित्याची सेवा करत होता. तो ज्या वेळी साहित्यसेवा करत नव्हता त्या वेळी दरवर्षी होणारी साहित्य–संमेलने व त्याच्या आधी राजकारणी लोकानीही लाजेने माना खाली घालाव्यात अशी निवडून येण्याकरता मोठमोठ्या साहित्यकाची वर्तने, मग अध्यक्षाचे लबे–चवडे भाषण, गलेलठ्ठ मंत्र्यांच्या मागे अवघडून बसलेले संमेलनाध्यक्ष ह्या सगळ्याकडे तो एक तमाशा–हिंदी अर्थाने तमाशा–म्हणजे एक करमणुकीची गोष्ट म्हणून पहात असे.

पण आता तो स्वत: काही टक्के साहित्यिक झाला होता व म्हणून ह्या मुंबईत होणाऱ्या साहित्यसमेलनास हजर रहाण्याची त्याची फार इच्छा होती; पण काही अपरिहार्य कारणामुळे त्याला उशीर झाला होता व हेच त्याच्या आनंदाला लागलेले गालबोट होते! आता साहित्यिक असल्यामुळे ते गालबोट त्याला फारच काळे–काळे वाटत होते

आपला सवता–सुभा निर्माण करण्याचा मराठी साहित्यक्षेत्रातला हा पहिलाच प्रयोग असला तरी मराठ्याच्या राजकारणात तो अगदी पेशवाई वा अगदी शिवशाहीपासून चालत आला आहे. अशी सवत्या–सुभ्याची सवय असल्यामुळे मुबईत होणाऱ्या ह्या प्रती वा पत्री समेलनाचे कोणाला दु:ख वा खेद झाल्याचे दिसत नव्हते. उलट पेशवाईतल्या राजकारणाचा उशिरा का होईना पण साहित्यावर व साहित्यकांवर परिणाम झाला आहे हे बघून सगळ्या मराठी बांधवास आनंदच झाला. राजकारणापासून व राजकारण्यांपासून कितीही दूर राहू म्हटले तरी रहाता येत नाही हेच खरे!

एवढा मोठा मराठी साहित्यिक व सांस्कृतिक जीवनातला ऐतिहासिक प्रसंग आपला फक्त एक दिवसाने चुकला ह्याची श्यामला फार रुखरुख लागून राहिली होती व ती रुखरुख त्याने आपल्या मित्रमंडळीस व राधाला बोलून दाखवली होती.

श्याम मुबईला येऊन फक्त दोनच दिवस झाले होते. पण आता असे वाटत होते की; कधी मुंबईच्या बाहेर आपल्या कुटुबियांना सोडून तो गेलाच नव्हता! दोन दिवसांतच त्याच्या घरच्या मंडळीचे दैनंदिन कार्यक्रम सुरू झाले होते. मुले महाविद्यालयात जाऊ लागली होती व राधा रद्दी वगैरे विकण्याच्या मागे लागली होती. मराठी साहित्य संमेलन होणार म्हणजे खूप चविष्ट काय काय वाचायला मिळेल म्हणून तिने आठ–दहा दिवस अगदी 'सकाळ' पासून 'संध्याकाळ' पर्यंतची सगळी वर्तमानपत्रे घेतली होती. आता श्यामच काही काम नसल्यामुळे रिकाम–टेकड्यासारखा झाला होता!

एके संध्याकाळी दूदवर चांगला लागलेला चित्रपट चांगला नाही म्हणून श्याम दूद बंद करून बाल्कनीत खुर्ची टाकून विचार करत बसला होता. नवरा पाच–सहा, महिन्यांनी बाहेर गावाहून येवो वा पाच–सहा दिवसांनी येवो, बायका मोठ्या खुषीत असतात. तशी राधापण खुषीत होती. ती शेजारपाजारच्या सेन्सॉरकडून 'U' प्रमाणपत्र मिळेल एवढी त्याच्याजवळ येऊन उभी राहिली. ती जवळ आली आहे असे बघून 'आपण असं केलं तर?' असे श्याम विचारता झाला.

'आता आणखी कसं करायचं म्हणता?' म्हटलं तर चावट म्हटले तर साधे असे प्रश्नात्मक उत्तर राधाने दिले.

'वाह्यातपणे बोलू नकोस! मी गंभीरपणे बोलतो आहे.' श्याम खरंच गंभीरपणे बोलत होता.

'मग वाह्यातपणा काय गंभीरपणे करता येत नाही काय?' आपल्या मनातले म्हटलं तर चावट वा म्हटले तर साधे विचार कळले ह्याचा राधाला आनंद झाला होता व त्या आनंदात तिने दुसऱ्या प्रश्नाचे पण तसेच उत्तर दिले होते.

शहाण्या व सुरत्या माणसाने बायकांच्याच काय पण बायकोच्याही नादी लागू नये म्हणतात ते अगदी खरे आहे असे श्यामच्या मनात आले. तेव्हा श्यामने राधाचा नाद सोडला व परत घरात येऊन दूदवर लागलेला· जितेंद्र व आशा पारेखचा जुना चित्रपट तो पाहू लागला.

श्यामच्या घरचे रात्रीचे जेवण लोकसभा, पार्टीची बैठक व साहित्यसंमेलन ह्याचे थोड्या थोड्या प्रमाणात कडबोळे असे तेथे सर्व तऱ्हेचे विषय चर्चेला येत. मतभेद रागारागाने मांडले जात व निंदा–टवाळीला ऊत येत असे. अर्थात हे चर्चेला जो विषय असेल त्यावर अवलंबून असे.

आता संध्याकाळचा विषय काढावयास हरकत नाही. ह्या विचाराने श्याम म्हणाला, 'राधा, परवा हे मुंबईचे जसे साहित्य–संमेलन भरवले गेले तसे वा म साहित्य–संमेलन भरवावयास काय हरकत आहे?'

'वा. म. म्हणजे काही चांगला अर्थ होत नाही.' राधाचे उत्तर. राधा साहित्यिक नसली तरी पुण्याची होती. वाईट शब्दाचा वाईट अर्थ तिच्या चटकन ध्यानात याव-याचा. आतापर्यंत श्यामने हा शब्द मनाशी बराच वेळा वापरला होता; पण त्याच्या डोक्यात वाम हा शब्द वाम–मार्गाकरता वापरतात व फार थोडे स्त्री-पुरुष त्या मार्गाने जातात व जे जातात त्यांच्याबद्दल फार चांगले बोलले जात नाही, हे काही लक्षात आले नव्हते.

'अग, वा. म. म्हणजे 'वाळकेश्वर–मलबार हिल मराठी साहित्य संमेलन, बोलताना तुला तो मोठा शब्द बुटका करून सांगितला एवढेच; पण लिहिताना व छापताना वा. म. नाही छापावयाचे, ते वाळकेश्वर–मलबारहिल असेच रुबाबात छापावयाचे ! समजलीस ?'

'म्हणजे ह्यांच्या विचाराची मजल छापण्यापर्यंत गेली आहे म्हणावयाची.' राधा मनात म्हणाली. त्यांची मुलगी अजू लग्न होऊन दिल्या घरी सुखी होती. ती असे त्या वेळी श्यामच्या विचार वा अविचार घोड्याना ती लगाम घालत असे. मुल, श्याम काही चटोर विनोद करत असला वा तसेच काही गंमतीचा विषय असला तर लक्ष देत. मुलं म्हणजे धाकटा मुलगा–कारण मोठा मुलगा जेवतानाही पुस्तक वाचत असे आता त्याला खरंच वाचनाची आवड होती, की तो आपले बोलणे टाळण्याकरता वाचतो ह्याचा उलगडा श्यामला कधीच झाला नव्हता. मोठा तसा वाचत होता व धाकट्याने बाबांच्या आजच्या विषयात काही दम नाही म्हणून भराभरा जेवावयास सुरुवात केली होती.

पण राधाने देवा-ब्राह्मणांसमोर अर्थे च कामे च वगैरे शपथ घेतली असल्याकारणाने श्यामच्या सर्व तऱ्हेच्या कामात तिला रस घेणे भाग होते; पण ह्या वेळी भाग घ्यावयाचा म्हणजे श्यामला वाममार्गाने जाऊ द्यावयाचे नाही हे तिच्या मनाने पक्के केले व त्या दृष्टीने ती म्हणाली,

'काही तरी काय बोलता ? वाळकेश्वर–मलबारहिल अशा भागाचे मराठी साहित्य-संमेलन कसे भरवता येईल ?'

'का ? काय हरकत आहे ?' श्यामला असं कोणी. विशेषतः राधाने विरोध केल्यावर फार चेव येत असे. त्या चेवात येऊन तो म्हणाला, 'आता मुख्य संमेलन रायपूर वा रायचूर ह्या गावी भरत असले तरी मुबईला वेगळे भरले होतेच की ? म्हणजे आता प्रत्येक गावाने वा गावातल्या विभागाने संमेलन भरवायला सगळ्यांनी तत्त्वतः मान्यता दिलीच आहे. तेव्हा आता वा. म. साहित्य संमेलन भरवण्यास मुबईच्या साहित्यिकांचा विरोध होणे शक्य नाही !' श्याम आपण फार महत्त्वाचा मुद्दा माडला आहे ह्या भावनेने बोलला.

आता श्यामशी काही तात्त्विक चर्चा करून उपयोगी नाही, हे राधाने ओळखले कारण श्यामची वृत्ती मराठी बांधवांप्रमाणे 'हाती घ्याल ते तडीस न्या' ह्या बाण्याची होती. त्यातून त्याना दुसऱ्या दिवशी दादरला मायाकडे जेवायला जायचे होते. माया फार उत्साही कार्यकर्ती होते व तेथे काही 'दिंडीबाज' अर्थात साहित्य-दिंडीबाज भेटण्याची खात्री होती व साधारणपणे कोणीही मराठी माणूस सवत्या-सुभ्याची कल्पना अगदी उत्साहाने उचलून घेतो ते राधालाही माहीत होते

खर म्हणजे आता मुंबईला भरलेल्या साहित्य संमेलनात जे काय बोलले गेले ते काय रायपूर वा रायचूर ह्या गावी बोलता नसते का आले ? बरं हा सवता-सुभा कोण निर्माण करत आहे ? तर ह्याच साहित्य संमेलनाची पूर्वीची अध्यक्ष मडळी ! जसं काही त्यांच्या वेळी सरकारी दान घेतलंच नव्हते वा त्याचे वेळी मंत्री-महोदय संमेलनाला आलेच नव्हते ! राधा आपली आपल्या मनाशी विचार करत होती; पण श्यामला वाटले की, तिला आपली वा. म. कल्पना पटली आहे. म्हणून तो आनंदात उठून सुपारी वगैरे खाऊन झोपायच्या खोलीत गेला. आजचे 'मरण उद्यावर टळले', राधा मनात म्हणाली.

आणि खरंच मरण उद्यावर पक्के झाले ! श्यामची वा. म. साहित्यसमेलनाची कल्पना सगळ्यांनी उचलून धरली. ते बघून श्यामला खूप आनद झाला. पण कल्पना उचलून धरली गेली तरी चर्चा होऊन फाटे फुटले नाहीत असे मात्र झाले नाही !

एक दिंडीबाज दादरकर म्हणाला, 'पण वाळकेश्वर वगैरे इतक्या लाब संमेलन भरवण्यापेक्षा दादरलाच का नाही ...'

'पण परवाच दादरला एक संमेलन झाले. आता परत तेथेच दुसरे कसे घेणार ?' आता श्यामच्या वाम समेलनाची कल्पना खपवण्याची सगळी जबाबदारी मायाने घेतली होती. नगरपालिकेचे लोक कसे पाण्याच्या नळाला फाटे फुटले की लगेच बंद करतात, त्याहीपेक्षा जास्त चपळाईने माया चर्चेत फुटणाऱ्या फाट्यांचा बंदोबस्त करत होती.

'दादरच्या संमेलनाप्रमाणेच आपल्याही संमेलनाला कोणाही मंत्र्याला येवू द्यावयाचे नाही.' माया अगदी ठामपणे म्हणाली. ती नेहमीच ठामपणे बोलत असे. आता मंत्र्यांची बाब होती म्हणून तिच्या बोलण्यात जास्तच ठामपणा आला होता.

'म्हणजे अगदी मंत्री आडनावाच्या लेखकांवर पण ही बंदी का ?' कोणी दिंडीबाजाने विनोद केला व स्वतःच मोठ्याने हसला.

खरच कितीही वर्षे व कितीही ठिकाणी साहित्यसंमेलने भरवली तरी मराठी विनोद खुजाच रहाणार, म्हणजे त्याची उंची कधी वाढणार नाही, असे श्यामच्या मनात आले. पण हा दिंडीबाज वा. म. संमेलनाचा चिटणीस असल्याकारणाने त्याच्या विनोदाचे कौतुक करणे भागच होते.

'दादरच्या लोकांना मंत्री चालत नाहीत, मग सरदार–दरकदार कसे चालतात ?' दुसऱ्या दिंडीबाजाने वरकडी केली व तो पहिल्यापेक्षा वरकडीने हसला. हाही कामाचा माणूस असल्याने त्याच्याही विनोदाला हसणे जरूर होते.

झाले. बोलता बोलता कार्यक्रम ठरला. स्वागताध्यक्ष म्हणून श्यामची निवड झाली. पाच–सहा महिने का होईना पण श्यामने साहित्य–सेवा केली होती. ती स्वागताध्यक्ष होण्यास रग्गड होती अध्यक्ष म्हणून श्रीमती कुबल यांची बिनविरोध निवड झाली. श्रीयुक्त कुबल जरी लोणची, तिखट, हळद वगैरे स्वैपाकातले साहित्य बनवत असले तरी श्रीमती कुबल खरोखरीचे साहित्य बनवत होत्या. त्यामुळे त्याची निवड बिनविरोध होणे योग्यच होते.

श्यामने आपल्या सुवाच्च अक्षरात ही सगळ्या पदाधिकाऱ्यांची नावे वगैरे लिहिली. परत कधी जमावयाचे ते ठरवून मंडळी

पांगली. श्याम–राधा घरी आले त्या वेळी मुले झोपली होती श्यामने समेलनाचे ते सगळे कागद समोरच्याच जेवण्याच्या मेजावर ठेवले व ती दोघे झोपायला गेली. त्या रात्री श्यामला वाम–स्वप्ने पडली हे वेगळे सांगायाची गरज नाही.

सकाळी उठून राधा चहा करत होती व शाम दात घासत होता. त्यांची कॉलेजला जाणारी मुले उपास–मोड करत होती. व तो करता करता श्यामने काल ठेवलेल्या संमेलनाच्या यादीतल्या माणसावर चर्चा करत होती. श्यामची मुले तरुण होती व सध्याच्या जग रहाटीप्रमाणे 'संतापी–तरुण' होती.

'हे बघ श्रीमती कुबल अध्यक्ष ...ते हे मुख्य वक्ते, हे श्रीयुत काही वर्षापूर्वीच्या संमेलनाचे अध्यक्ष...ह्या बाई... म्हणजे ही सगळी मंडळी ६५–७० वर्षाच्या पुढची आहेत. म्हणजे त्यातल्या त्यात ५४ वर्षाचे आपले बाबाच सगळयात तरुण !' श्यामचा मोठा मुलगा हसत हसत म्हणाला. तो आता हसत असला तरी तो जास्त संतापी–तरुण होता.

"बघ ना, वेगळे संमेलन भरवा, काही करा; पण हे म्हातारे लाडे काही तरुणाना म्हणत नाहीत की, तरुणांनो, तुम्ही भरवा ही संमेलने !" धाकटा पण काही कमी संतापी-तरुण नव्हता !

"परवाच्या दादरच्या संमेलनात तेच ! दलित वा अदलित सगळेच गलित !" परत मोठा मुलगा. हा आपली विनोदाची गादी नाही तरी निदान उशी चालवेल ह्या कल्पनेने श्यामला त्या स्थितीतही बरे वाटले.

"म्हणजे ह्याना राजकारण्याची मक्तेदारी नको; पण स्वत.ची मक्तेदारी मात्र सोडायला तयार नाहीत हे लोक ! खरं म्हणजे जसं मंत्र्यांना बोलावू नये तसे ह्या साठीपार लोकांनाही बोलावू नये; पण हे काही बाबांना बोलू नकोस. उगाच चिडायचे !" धाकटा म्हणाला.

"चिडण्याशिवाय ह्या मोठ्या लोकांनी केलंय काय आतापर्यंत ?" मोठा.

खरं म्हणजे त्यांचे बोलणे ऐकून श्यामला चीड आली होती; पण शेवटचे वाक्य ऐकून त्याने ती दाबली. मुलांची उपास-मोड सपली होती व ती महाविद्यालयात निघून गेली. श्याम आपल्या उपास-मोडीस बसला.

आता त्याची वीस-पंचवीस दिवसांची रजा मोठ्या गडबडीत जाणार होती. कारण स्वागताध्यक्ष म्हणून त्याचेकडे वर्गणी गोळा करणे, सभागृह ठरवणे वगैरे कामे होती.

प्रथम सभागृह ठरवणे आवश्यक होते. कारण आजकाल २–२, ४–४ महिने आधीच सभागृह पक्के करून ठेवतात. तेव्हा राधाला हाक मारून श्याम म्हणाला, "आपल्या भागातली चांगली सभागृहे कोणती आहेत ग ?"

'अेक सफाया भाभा आहे बॉडॅन रोडवर व दुसरे विली–विद्यामंदिराचे आहे म्हणे त्या गव्हमेंट हाऊससमोर !"

"मराठी साहित्य संमेलन कोणा मराठी माणसाच्या सभागृहात नाही का भरवता येणार ?" श्यामचा 'बाणा' जागृत झाला.

त्यावर राधा खळखळून पण वाईट अर्थाने हसली व म्हणाली, "वाट बघा मराठी माणसाच्या सभागृहाची ! अहो, परवाचे दादरचे सुद्धा रूपारेलमध्ये झाले होते! आता रूपारेल म्हणजे ना दलित, ना अ-दलित ! पण दुसरी सभागृहे सुद्धा कोणा पोद्दारची ना रुईयाची! किर्लोस्कर नाटक मंडळी होती; पण किर्लोस्कर सभागृह काही नाही मुंबईत !"

"हे खरंच म्हणा. मुबईत जन्म होतो पार्शी वा भाटिया इस्पितळांतून, शिक्षण होते पार्शी वा भाटिया महाविद्यालयांतून, कॅन्सर बरा होतो टाटात !" श्याम उदास होऊन म्हणाला. त्याचे शिक्षण कोणा पाठ्यांचे महाविद्यालयात झाले होते.

"बरं, त्याने काही बिघडत नाही. गृह त्याचे असले तरी भूमी तर आमची मराठी-लोकांची आहे ना ?" असे म्हणून तो उत्साहाने घराबाहेर पडला.

दुसऱ्या दिवशी अगदी सकाळी–सकाळी एका मंत्री–महोदयांच्या व्यक्तिगत–चिटणिसाचा दूरध्वनी आला. वा. म. साहित्य–संमेलनाबद्दल वर्तमानपत्रात आलेली बातमी मंत्री–महोदयांनी वाचलीच होती व श्यामला भेटीस बोलावले होते. नाही म्हटलं तरी श्यामला ह्याचा आनंद झाला होता. आपणच कोणाही मंत्र्याला बोलवावयाचे नाही असे ठरवले होते व आता त्याचे बोलावणे आल्यावर आपण आनंदून गेलो हे काही योग्य झाले नाही असे त्याच्या मनात आले; पण जगात असेच होते असे म्हणून त्याने आपल्या मनाचे समाधान करून घेतले.

बरोबर दहा वाजता तो वाळकेश्वर भागातल्या नारायण दाभोळकर मार्गावर असलेल्या मंत्र्यांच्या बंगल्यात गेला. तो तेथे जाताच त्याला मंत्री–महोदयांच्याकडे नेण्यात आले.

'काय फलाणे साहेब, वा. म. साहित्य-संमेलन भरवत आहात व आम्हा मंत्र्याना त्याला यायला बंदी ? निदान वाळकेश्वर भागातले रहिवासी म्हणून तरी आम्हाला येवू द्या की ?' मंत्री–महोदयानी विषयाला एकदम हात घातला ! हे मंत्री स्वत: फार मोठे साहित्यिक म्हणून प्रसिद्ध नसले तरी त्याना साहित्यात रस होता. त्याच्याकरता काही करावे अशी त्याची इच्छा होती. ते कोणत्याही राजकीय पक्षाचे असे नव्हते. त्यांची 'सारासार विचारां'चे म्हणून ख्याती होती.

महोदयाचा हा परखड प्रश्न ऐकून श्याम गोंधळला. मामाच्या घरी दिंडीबाजासमोर बोलणे वेगळे व आता मंत्र्यासमोर बोलणे ह्यात फार फरक आहे हे श्यामच्या लक्षात आले. तरी तो धीर करून म्हणाला, 'साहेब, जरा स्पष्ट बोलू का ?'

'जरूर बोला ! मी तुम्हाला मंत्री म्हणून बोलायले नाही. तुमचे सासरे माझे चागले मित्र. मला ह्या वा. म. संमेलनाबाबत खूप उत्सुकता आहे म्हणून तर बोलावले तुम्हाला.

'नाही, त्याचे होते काय की मत्री आले की, त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे स्तोम माजते. त्यांना उगाचच महत्त्व मिळते. त्याच्या हुजेरीचा संमेलनाच्या कामावर परिणाम होतो.'

'पण ते सगळयांच्याचबाबत होते. आता अध्यक्ष कोणी असो, समजा तेथे आणले पु. ल. देसपांडे आले तर त्याना महत्त्व मिळणारच. एवढेच कशाला, समजा आपले नारळकर आले वा भीमसेन जोशी आले तर त्यांना बाकी चार लोकापेक्षा तुम्ही जास्त अगत्य दाखवणार की नाही? आणि हे लक्षात ठेवा राजकीय शक्ती ही सर्वश्रेष्ठ आहे ! आम्ही काय आज आहोत उद्या नाही, माणसं बदलतील; पण ती शक्ती खरी !'

'पण राजकारण व साहित्य...' श्याम

'का ? जुनी उदाहरणे जाऊ देत; पण काकासाहेब गाडगीळ वा आपले नानासाहेब गोरे काय कमी प्रतीचे साहित्यिक आहेत ?

आता झोपडपट्टीबाबत भारंभार लिहिले जात आहे; पण त्याला प्रथम सुरुवात मला वाटतं गोऱ्यांनीच केली!'

पण हे नेहरू, दिल्ली-संमेलनाला हजर होते...'

'अहो, हे तुमचे नशीब समजा! साहित्य-समेलनाचा अध्यक्ष कितीही मोठा असला तरी देशाच्या पंतप्रधानाबरोबर व तेही नेहरू-सारख्या पंतप्रधानाबरोबर त्याची तुलना कशी करता येईल? आणि दिल्लीलासुद्धा नेहरूंनी काही केले नाही. ते नसते तरी अध्यक्षाकडे दुर्लक्षच झाले असते. दिल्लीची ती पद्धतच आहे. तुम्हाला नाव मिळवण्याकरता संमेलन दिल्लीला भरवावयाचे असते. मोठेपणा मिळावा म्हणून नेहरूंना बोलवावयाचे असते. त्यांचे तोटेपण सहन करायलाच पाहिजे.

'बरं ते असो. आम्ही नको, आमचा-म्हणजे सरकारचा पैसा नको; पण आमच्या शुभेच्छांना काही हरकत नाही ना? Wish you all the best' एवढे बोलून मंत्री-महोदय उठले तसा श्यामही उठला व बाहेर पडला.

आता सभागृहाची चौकशी करून झाली होती; पण त्याच्याकरता भक्कम पैसे पडणार होते. तेव्हा प्रथम पैसे गोळा करावेत म्हणून श्याम घराबाहेर पडला. तो मध्यवर्ती सरकारच्या कॉलनीत रहात होता. त्या कॉलनीत बहुतेक सगळे अ-मराठी होते. काही सात-आठ मराठी अधिकारी होते. त्याच्याकडे जाताच त्यांनी पटापटा दोन-दोन रुपये काढून दिले. आता ह्या दोन दोन रुपयात साहित्यसंमेलन कसे होणार? पण ते म्हणाले, ह्यापेक्षा जास्त तरी किती देणार? गणपती-उत्सव, कॉलनीची वार्षिक संमेलन-होळी वगैरे कार्यक्रमांना पण वर्गणी द्यावी लागते, असे त्यांचे म्हणणे! म्हणजे त्यांच्या हिशोबी साहित्य-संमेलन व होळी वगैरे एकाच मापाची! आम्ही मात्र ही मोठी क्रांतिकारी घटना मानतो.

त्या दोन रुपयाबरोबर त्या लोकांनी लाख मोलाचा सल्ला दिला होता. "ह्या आजू-बाजूला गगन-चुंबी इमारतीमध्ये चिक्कार श्रीमंत मराठी लोक रहातात. एक एक जण १०००, १५०० अगदी सहज देईल!" हाच तो लाख मोलाचा सल्ला! त्याप्रमाणे श्याम त्या गगन चुंबी इमारतीत चिक्कार श्रीमंत असलेल्या मराठी लोकांच्या शोधाकरता फिरू लागला. प्रत्येक इमारतीच्या प्रवेशाशी मोठाच्या मोठा नावफलक लावलेला असे - पण त्यात सगळे पंजाबी, सिंधी वा गुजराथी! क्वचित् एखादे सारस्वत वा कोकणी नाव दिसावयाचे!

असेच एक क्वचित सारस्वत नाव पाहून श्याम त्या गाळ्यावर गेला. दार मराठी गड्याने उघडले, पण आत गेल्यावर या, बसा असे काही तो म्हणाला नाही. तेव्हढ्यात बाईसाहेब आल्या. त्यांच्या अवतारावरून त्या जातीनेच काय पण वृत्तीनेही सारस्वत वाटत नव्हत्या! श्यामने धीर करून "Is Mr. P. N. in?" म्हणून विचारले. तिने "Yes, be seated" असे श्यामला सांगितले व आत जाता, "परदिप्-Some one to see you" म्हणून ओरडली. तेव्हढ्यात कचेरीच्या कपड्यात 'पर दिप' स्वत:च बाहेर आले. श्यामने आपले काम समजावून सांगितले. तेव्हा परदीप-म्हणजे मराठीत प्रदीप म्हणाले, "मी मराठी असलो तरी माझे सगळे शिक्षण कॉन्व्हेंटमध्ये व मग विलायतेत झाले. माझी बायको पंजाबी - So in no sense I am Maharastrian - पण आता तुम्ही एवढे आलाच आहात तर हे पाच रुपये घ्या!"

श्याम पावती वगैरे द्यावयाला लागला तर प्रदीपराव म्हणाले, "कश्याला पावती वगैरे देता? मी काही संमेलन attend करणार नाही!"

श्यामच्या पुष्कळ गगन-चुंबी इमारती फिरून झाल्या; पण मराठी माणूस अगदी औषधालाही सापडेना व जो सापडे तो साधारण परदीपसारखा! श्यामला प्रश्न पडला, मुंबई महाराष्ट्रात हे खरे आहे; पण मुंबईत महाराष्ट्र कुठे आहे? फक्त दादर व परळमध्ये?"

घरी आल्यावर श्यामने हे सगळे राधाला सांगितले. ती म्हणाली की, "आपण जर आपल्या शाळा-कॉलेजकरता अ-मराठी लोकांचे पैसे घेतो तर संमेलनाला काय हरकत आहे? उद्या मी पण येईन तुमच्या-बरोबर!"

म्हणून ती दोघे दुसऱ्या दिवशी एका गुजराथ्याच्या घरी गेली. राधा बरोबर होती म्हणून, त्या मराठी गड्याने त्यांना बसायला तरी सांगितले, असे त्या गड्याच्या चेहऱ्या-वरून वाटले. गुजराती आघोळ करत होता. त्याची बायडी बाहेर आली. श्यामने व राधाने आपल्या येण्याचे प्रयोजन सांगितले. तेव्हा ती "शेठ आघोळ करताहेत. थाबा थोडा वेळ!" असे म्हणाली, व आत गेली.

ती बाथरूमजवळ जाताच शेठजीनी आतूनच ओरडून गुजरातीत विचारले, "कोण आहे ग कांता?" कांताबेन म्हणाली, "ह्या रामा-लोकाचे काही संमेलन आहे म्हणे. त्याच्याकरता पैसे मागायला आले आहेत!"

"त्याना थाबा म्हणावे" शेट म्हणाला.

रामालोकाचे संमेलन म्हटल्यावर श्याम व राधा एकमेकांकडे पाहू लागले व काही न बोलताच उठले व चालायला लागले. लिफ्ट-मध्ये श्याम अगदी मरगळलेल्या आवाजात राधाला म्हणाला, "खरं आहे कांताबेनचं म्हणणे. मुंबईत मराठी लोकाचे कोणतेही कार्यक्रम, कोणतेही संमेलन म्हणजे रामा-गड्याचेच!" □


# टॉलस्टॉय - एक माणूस

दुसरी आवृत्ती

लेखिका : सुमती देवस्थळे

किंमत : ५५ रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०

# मधुस्मृती

## साम्यवादी राजवटीवरील एक रूपककथा ( पूर्वार्ध )

मूळ कथेचे नाव : Bee and the Rose / मराठी रूपांतर : फादर द्रागो, पुणे

वसंतऋतूची चाहूल लागताच त्याचा जन्म झाला. दिवसाचे बारा तास पुरविलेल्या मिष्टान्नाचे सेवन करीत तो भराभर वाढला. हळूहळू हातपाय हालवू लागला. आखडल्यासारखे होऊन त्याने त्याच्या घराच्या भिंतीबाहेर डोके खुपसले. चोहीकडे नजर फेकली. मोहोळाचे ते सुदर आणि स्वच्छ जग पाहून त्याला नवी उमेद आली. हळूच तो घराबाहेर पडला. स्वच्छंदपणे हिंडू लागला सुग्रास भोजनाचा वास येताच तो तिकडे वळला. चार–दहा पावले पुढे जाताच भोजनालयाच्या दरवाज्यातून एक सैनिक गरजला,

'४१९९९, भटकतोस कुठे ? चल, त्या कामगारांच्या रांगेत उभा राहा !'

सैनिकाचा अणकुचीदार भाला पहाताच तो घाबरला. निमूटपणे तो कामगारांच्या ओळीत उभा राहिला. हजारोची ती रांग; पण भरभरा पुढे सरकत होती. त्याला थोडे बरे वाटले.

सामूहिक जीवन म्हणजे घाई–गर्दीचे. बळी तो कान पिळी अशी अवस्था टाळण्यासाठी सैनिक-यंत्रणा. जेवण मिळेल तरच जीवन. पोटापाण्याचा प्रश्न म्हणजे जीवन–मरणाचा. सैनिक–बंदोबस्तातही ४१९९९ ला धक्काबुक्की करावी लागली. अवाढव्य भोजनगृहाच्या चौथ्या दारातून रांग आत शिरत होती. सैनिकांचे रागाने ओरडणे कानावर आदळत होते. 'प्रत्येकाला एकच पुडके. चला त्या दाराने बाहेर पडा !'

इतक्यात सुग्रास भोजनाचा वास त्याच्या नाकात शिरला. त्याने मध परागाचे ओझे नेणाऱ्याकडे मोठ्या आशेने पाहिले.

'असं काय हरखून पहातोस ? हे मिष्टान्न राजपुत्रासाठी. उद्यापासून तू असलेच भोजनसंग्रह करशील; पण खाशील मात्र निकृष्ट, सत्त्वहीन भाकर–तुकडा !'

त्याच्या स्वरात रागापेक्षा असहायता अधिक जाणवत होती.

भोजनगृहात शिरताच त्याने चौफेर नजर फिरविली. राजपुत्र एका ठिकाणी जमून पंचपक्वान्नावर ताव मारीत होते. आकंठ मधु प्राशन करत होते.

४१९९९ चा नंबर येताच सैनिकाने खादीचे एक पुडके त्याच्या अंगावर फेकून बाहेरची वाट दाखवली.

मधुस्मृतीचे अव्याहत पठण येथेही चालले होते. मोहोळाच्या चारी कोपऱ्यांतून मधुस्मृतीचे गुणगान दिवस व रात्र ऐकू येत असे. सातत्याने चाललेल्या त्या वुद्धिविभ्रमापेक्षा मोठ्याने एक कामगार ओरडला.

'मधुस्मृतीने सर्वांना समान हक्क दिले आहेत !'

राजपुत्रांनी वळून रागाने त्या कामगाराकडे पाहिले. सैनिकांनी चारी बाजूनी धावून त्याला कैद केले. न्यायालयात नेताच न्यायाधिशाने काही एक न ऐकताच निर्णय वाचला.

'राजपुत्राबद्दल द्वेष व्यक्त करणे, अजाण कामगार बालकासमोर दुर्वर्तन करणे, मधुस्मृतीबद्दल घृणा व्यक्त करणे या सर्व अक्षम्य अपराधांची शिक्षा बहिष्कार !'

'बहिष्कृताचे जगणे काही घटकाचेच ! मोहोळाबाहेर धावलेल्यांना कोठेही प्रवेश नसतो. जगण्याचाही अधिकार नसतो !' जवळच उभा असलेला सैनिक उद्‍गारला. ४१९९९ च्या छातीत धडकी भरली. बालकांना वचकात ठेवण्यासाठी हे योजले तर नसेल ? हा संशयही डोकावून गेला त्याच्या मनात !

'पि पी पिप'

शिटी वाजली. कामगार बालकांना कवायती करण्यास हाकलून नेण्यात आले. मधुस्मृतीचे नियम मोठ्याने वाचले जात होते.

'मधुसंग्रहाला गेल्यावर फक्त दोन काटेरी फुलाचा मध–पराग पटदिशी खाऊन टाकावा.'

'एका क्षणाचीही उसंत न घेता मोहोळासाठी सुबक फुलाचा चविष्ट असा मध–पराग आणावा.'

'वाटेत कोणाशीच बोलू नये !'

दोन दिवस विशेष असे काहीच घडले नाही. '४१९९९' आणि त्याच्या गटाचे मधुसंग्रहशिक्षण संपले. बाहेरच्या फुलांच्या जगात जाऊन मध आणण्यास त्याचे पंख लवलवू लागले. त्याने पंख हालवून पाहिले. पायातील शक्तीचा अंदाज घेतला आणि मोहोळाच्या प्रवेशद्वाराकडे येऊन उडण्यास झेप घेत असताना पाळतीवर असलेला सैनिक कठोर स्वरात ओरडला,

'४१९९९, कोठे चाललास ?'

आपल्या पहिल्याच प्रयत्नात अडथळा आलेला पाहून रागावलेला ४१९९९ किंचाळला.

'मध आणायला, भटकायला नाही जात !'

टोकदार भाला समोर धरून सैनिक जवळ आला. त्याच्या स्वरात बदल झाला नाही. तो म्हणाला,

'मार्गदर्शकाच्या सत्याशिवाय मधाचा शोध करणे गुन्हा आहे. मधुस्मृतीचे नियम विसरणे हा सुद्धा अपराध आहे. शिक्षा म्हणून तुला दुपारचे जेवण मिळणार नाही ! उपासपोटी राजवाड्याची सफाई कर !'

सूर्योदय होताच मधपरागाचा शोध लावून मार्गदर्शकांचा गट

परतला. हजारो कामगार रांगेने प्रवेशद्वारावर आले. शोधकांनी गोल गोल फिरून नाचून फूलमळ्याचे अंतर वर्तुळाच्या मोजणीने दर्शविले आणि सरळ रेषेत चालून दिशाही दाखविली. शेकडोंच्या झुंडी भराभर उडून तिकडे गेल्या.

४१९९९ आला तेव्हा एका शोधकाने दहा वर्तुळे मळ्याचे ठावठिकाण सुचविले. उत्तर दिशेला तोंड करून रेषा ओढली. त्याच्या पंखांना गुलाबाचा मंद सुगंध येत होता.

मोठ्या उत्साहाने ४१९९९ आपल्या पहिल्या दौऱ्यावर निघाला. फुललेल्या गुलाबांच्या हृदयात धडाधड बुड्या घेऊन मध-पराग हिसकावून घेतला. पिवळ्या परागाने पायावरचे कोश भरले. छातीवरील कोश मधाने भरला.

कित्येक किलोमीटर दूरवरच्या त्या गुलाब-बागेत आल्यावर त्याने फक्त दोनच फुलाचा मधपराग खाल्ला होता. अधिक खाणे नियमबाह्य होते. मधुस्मृतीचे श्रवण दौऱ्यावर येण्यापूर्वीच झाले होते. दोनापेक्षा अधिक फुलांचा मध-पराग खाऊ नये. फुले लहान असली, मधपराग कमी मिळाला किंवा,कडकडून भूक लागली असली तरी कोणत्याच फुलाशी बोलू नये. त्याचेकडे पाहू नये ।...

४१९९९ ची पहिलीच खेप. उडण्याचा आनंद धुंद करणारा. मोहोळातील दाटीवाटीच्या जीवनातून सुटका. तरी पण पंख दुखत होते. थोडीशी विश्रांती घ्यावी, आणखीन काही फुलांचा मधपराग खावा असे वाटत होते.

मधुस्मृतीचे स्मरण होताच भीतीने त्याची भूक उडवून दिली. क्षणाची उसंत न घेता तो मोहोळाकडे निघाला. मध-परागाचे सुखद ओझे आणताना त्याला धन्य वाटत होते.

प्रवेशद्वारातील सैनिकाने दटावणीच्या स्वरात विचारले,

'किती फुलाचा ?'

अनपेक्षित प्रश्नाने गोंधळलेल्या ४१९९९ ने उत्तर दिले,

'शंभरेक !'

'शहाणपणा करू नकोस, निश्चित आकडा सांग. किती आणि कोणत्या फुलाचा ह्याची नोंद झाली पाहिजे.'

'गुलाबाचा मध, पण संख्या मोजण्यास विसरलो. कोश मात्र भरून आणले आहेत,

'...........'

'माफी ही पहिलीच खेप आहे, क्षमा करा...'

सैनिकाने ४१९९९ ला कोठारीसमोर नेऊन उभे केलं. कोठारीने कठोर स्वरात म्हटले-

'लक्षात ठेव, निश्चित आकडा हवा. मधपरागसंग्रहात आकडे मोजण्यात मन गुतवून ठेव !'

कोठारी काही नवीन असे सांगत नव्हताच. मधुस्मृतीतील एक प्रकरण वाचून दाखवीत होता. येणारी जांभई आवरत ४१९९९ ने अदबीने मान खाली घातली.

'पुढच्या वेळेस नक्कीच निश्चित आकडा...

त्याचे वाक्य पुरे होऊ न देता कोठारी बोलू लागला-

'पुढच्या वेळेस म्हणजे उद्या नव्हे आत्ताच्या आत्ता कोठारात कोश रिते कर आणि २५० फुलांचा मधपराग वीस मिनिटांत आण. जा आता, नीघ लवकर !'

मुकाट्याने ४१९९९ कोठारीकडे धावला. त्याच्या मनातील उत्साह पार मावळला. निराशेच्या दडपणाचे ओझे खांद्यावर तेव्हापासून सतत त्याच्या पाठी चिकटून बसले आणि आज त्याच्या जीवनप्रवासाचा हा पहिलाच दिवस होता.'

सैनिकाची नजर चुकवून निषिद्ध क्षेत्रात फिरण्याची ४१९९९ ला हौस फार. जितका धोका तितकंच रोमहर्षक साहस आणि सुखसंवेदना जिंकण्याची भावना.

त्या दिवशी त्याने राजनिवासात फेरी मारली. सर्व सुखसोयींनी सुसज्जित राजवाडा बघून त्याने तोंडात बोटे घातली. दहाबारा चतुर्थ वर्गीय आपल्या पंखांचे पंखे बनवून राजवाडा वातानुकूलित करीत होते.

राजपुत्र आपली ढेरपोटे सावरीत मोठ्या मजेत फिरत होते. कामगारांना मोठ्या कष्टाने मिळविलेला मधपराग वाटेतच फस्त करीत होते. 'हजारो कामगारांच्या परिश्रमांवर ऐष-आरामात जगणारे हे मूठभर राजपुत्र यांना धड चालता येत नाही की डसण्याचा काटा नाही राणीच्या आश्रयास धावण्यास किंवा तिचा पिच्छा पुरविण्यास पंख मात्र आहेत. ही परावलंबी बाडगुळे, ४१९९९ ला भयंकर चीड आली. वाटले, कचाकच टोचून त्याची ढेरपोटे फोडून टाकावी...

पण मधुस्मृतीत लिहिले होते-

'कामगाराचे सामर्थ्य = सेवा तत्परता = जीवनाचे सार्थक्य.'

तो हळूच राणीगृहात शिरला. शेकडो कामगार राणीच्या सेवेत अविरत खपत होते. तिला मधपरागाची पक्वान्ने देण्यात, तिचे अंगांग चाटून साफ करण्यात, तिचे हातपाय दाबण्यात वीसेकजण गुतले होते.

मधपरागाच्या गुदामाजवळ हवेशीर बंगल्यात राणी राहात होती. चारीकडे कडक पहारा आणि दर सेकंदाला २०० पेक्षा अधिक वेळा पंख हालवून तिचे घर वातानुकूलित ठेवणारे शेकडो जण गुतले होते.

तो पुढे चालला. एकापेक्षा एक सुंदर असे चार-पाच राजवाडे रांगेने उभे होते. त्यावर ठळक अक्षरात लिहिलेल्या पाट्या होत्या- विधान-सौध, वसंत-विहार, रंजनगृह; पण त्या पाट्यावरच बारीक अक्षरात पुढील वाक्यही लिहिलं होतं, 'कामगारांना प्रवेश नाही !

'हे जंगी राजवाडे बांधले कुणी ?' त्याने स्वतःलाच विचारले. विचार करणे हे मधुस्मृतीच्या विरुद्ध आहे, तरी त्याच्या बंडखोर मनाला राहवेना. विचारांचे काहूर माजले.

'फुला-फळांनी बहरलेल्या झाडाला पाहिल्यावर मोहरून जाणारे कित्येक पण त्याच फुला-फळांना विविध रंगांनी, ढंगानी, चवीनी सजविण्यासाठी अहर्निश झटणाऱ्या पानांचा किंवा मुळांचा विस्तार करतो तरी कोण ? मोहोळातील मधपरागांचा एकेक रकाना भरण्यास किती कामगारांना आणि केवढे कठोर परिश्रम करावे लागतात ! एक रकाना मधाने भरण्यास ७५ मधाचे कोश रिते होत असलेले त्याने पाहिले होते. रकाना तुडुंब भरताच पंखेवाले येऊन मधातील पाणी उडवून देऊ लागतात. घट्ट होत असलेल्या मधाने रकाना पाऊणच भरतो. पुन्हा ४० मधाचे कोश पिऊन रकाना प्रसन्नपणे हसू लागतो. पुन्हा पखेवाले येतात...तीनशे मधकोश पिऊनच एकेक रकाना गच्च भरतो आणि ह्या मोहोळात मधाचे हजारो आणि त्यांच्या चार पटीनी परागाचे रकाने आहेत. त्यांना भरण्यासाठी किती

परिश्रम लागत असतील, त्याची कल्पनाच केलेली बरी ! आणि मध-परागाचे गुदाम भरण्याचे काम जोरात चालू असतानाच राणी व राजपुत्राचे अखंड मिष्टान्न भोजनही सतत चालू असते. परिश्रमाचे पर्वत कामगारांच्याच वाट्याला का म्हणून ?

मधुस्मृतीत लिहिले होते – 'चतुर्थ वर्गीयांनी आयुष्यभर नुसती निष्काम सेवा करावी...'

¤

बालपणाचा अल्पकाळ कर्तव्याची जाण नसलेला. म्हणून सुखाचा काळ. उद्याची कल्पना नसते म्हणून काळजीही नसते. भूत-भविष्याचे भान न राहून नुसत्या वर्तमानकाळातच जगण्याचे भाग्य बालपणातच असते. ४१९९९ ला कधीमधी वाटायचे, 'आपण उगाच वाढतो !' आयुष्याचे चक्र मागे फिरवून बाल्यावस्थेत स्थिर करता आले असते तर काय मजा आली असती ?

त्याचे बालपण काय चारचौघांसारखेच ! दिवसाला चार-पाच हजार अंडी घालून राणी विश्रांती घेत असे. बालसंगोपनाची जबाबदारी चतुर्थ वर्गीयावरच ! अंड्यासाठी रकाने तयार करणे, मोडतोड झालेल्यांची दुरुस्ती करणे, हजारो रकाने मधाने किंवा परागाने भरणे, अंड्यातून नुकत्याच बाहेर पडलेल्याना प्रत्येकी दहा हजार वेळा मध-परागाचा आहार देऊन वाढविणे, त्यांच्या खोलीची साफसफाई करणे, एक ना दोन, हजार कामे, अंड्यातून वळवळणाऱ्या किड्याच्या रूपातील ती बालके दिवसेंदिवस चरत असत. आपापल्या षटकोनी खोलीत मावणार नाहीत इतकी गलेलठ्ठ होताच स्वत.भोवती कोष रचून खोलीचे दार बंद करून घेऊन झोपी जातात. त्याचे दरवाजे सीलबंद केले जातात. चार दिवसांनी मेणाचे सीलबंद कवच फोडले जाते. वळवळणाऱ्या किड्याऐवजी पंख असलेला सहा पायांचा आणि व्यामिश्र डोळ्यांचा चतुवर्गीय बाहेर डोकावतो. पुढचे हातपाय संवेदक मिशांच्या साफसफाईसाठी, मधले हातपाय मध-परागाचे कोष भरण्यासाठी आणि गुदामात रिते करण्यासाठी, तर मागच्या पायांवर असतात केसाचे कोष; फुलांना परागदान करण्यासाठी आणि विशेषतः परागसंग्रहासाठी. त्याच्या जीवनाला अर्थ एकच - मधु-परागसंग्रह करणे !

कोष फोडून बाहेर पडताच मेणकारानी दुरुस्ती केली कामगारांनी सफाई केली आणि त्या घरात राणीने येऊन नवे अंडे घातले. कोष सोडताच कामगार बेघर झाला. मेणाच्या शहराच्या बाहेर राहून शहरवास्यासाठी राबू लागला.

काही दिवसानी राणीने निवडणुका लढवल्या. राजपुत्रांनी मोठ्या महत्त्वाकांक्षेने तिचा पिच्छा पुरवला. एकमेकांना मागे टाकीत राणीच्या मागे ते धावू लागले. प्राणपणाने लढू लागले.

हजारो कामगारांना आज प्रथमच राणीचे दर्शन झाले; पण तिचे लक्ष मात्र कोणाकडेच नव्हते. प्रत्येकाच्या मनात होता एकच हेतू, इतर सर्वांना मागे टाकून राणीची कृपा संपादन करणे. बरोबरी करणे, तिची कृपा मिळविणे.

त्या जीवघेण्या स्पर्धेच्या शेवटी राणीने एका सामर्थ्यशाली राजपुत्राची निवड केली आणि दुसऱ्याच क्षणी तो मरून पडला. त्याच्या चेहऱ्यावर जीवनसार्थक्याचे समाधान मात्र फुलले होते.

कामगारांनी लगेच मृत राजपुत्राचे शरीर मोहोळाबाहेर फेकून दिले. ते कुजून मातीत मिसळू लागले. राणीला मात्र त्याची खत वाटली नाही. मोठ्या उत्साहाने अंडी घालण्यात ती दंग झाली. तिची सेवा करण्याच्या व अंड्याची काळजी घेऊन नवी प्रजा वाढवण्याच्या घाण्याला शेकडो कामगारानी जुंपून घेतले.

नवनिर्मित पिढीत दोन-चार राण्याचाही समावेश होता. त्या डोळे उघडून कोषाबाहेर येण्याआधीच मेणाच्या सीलबंद कोषातून चोचून चोचून भावी राण्याना निर्घृणपणे मारून टाकले. कारण कोषातल्या नव्या राण्या नवे राज्य स्थापण्याची स्वप्ने पाहात नव्या घोषणा गुणगुणत होत्या; पण ती स्वप्ने साकारण्याची शक्ती त्यांच्यात येण्याआधीच त्यांची हत्या केली होती. हुकूमशाहीत नव्या राण्यांना आणि नव्या राजवटीच्या आशेला स्थान असते. वार्धक्यामुळे अंतकाळ जवळ आला हे जाणवले. राणी एखादी नवी राणी निवडते. फक्त तिलाच जगू देते. तिच्याकडून मधुस्मृतीशी विश्वासू राहण्याची शपथ घेऊनच स्वतः राजमातेचे मरण पत्करीत असते.

क्वचितच असे घडते की राणी नव्या राणीला वाढू देऊन आपण दुसऱ्या मोहोळ राज्याची स्थापना करण्यास दूर निघून जाते. तेही शोधकांनी मधुपरागाची सुबत्ता असलेल्या प्रदेशाची वर्दी आणली तरच.

¤

मधुपरागाची कोठारे संपूर्ण भरली होती. कारण दुसऱ्या दिवसापासून अंडी फुटणार आणि हजारो नवजीवाना सातत्याने खाद्यपदार्थ पुरवावे लागणार. गेले चार-पाच दिवस ४१९९९ आणि त्याचे शेकडो साथीदार मधुपरागाचे ओझे वाहून आणताना पंख दुखत असले तरी वारवार दौऱ्यावर पिटाळले जात होते.

अंधारी रात्र. फक्त रातकिड्यांच्या किरकिरीशिवाय कशाचाच आवाज नाही. मधुस्मृतीचे गुणगान मंद आवाजात चालू होते. राणी आणि कामगार सर्वच गाढ झोपेत होते. पंखेवाले मात्र मोहोळाला वातानुकुलित ठेऊन, हवेतील गारठा आत शिरू देत नव्हते.

अचानकपणे झाडाखाली काही आवाज झाला. तो कशाचा हे समजण्याआधीच शेकडो चतुर्थवर्गीयाचे पख व हातपाय जळाले. मोहोळाखाली मृताचा खच पडू लागला. आगीच्या झळीने शेकडोचे पख करपले. नाकातोडात धूर शिरून घुसमटू लागले

सैनिकांनी राणीला वर्दी दिली. राजपुत्र आणि राणीने आकंठ मधपराग सेवन करून मोहोळ सोडले. जाताना सैनिकाना आज्ञा केली. 'चागली झुंज द्या, शत्रूला हाणून पाडा. कामगारांना जागचे हालू देऊ नका. आत्माहुतीनेच त्यांना पोळ्याचे रक्षण करू द्या. मेणाच्या इमारती वितळू देऊ नका...' गडबडीने जातानाही नवे मोहोळ राज्य उभारण्यास आवश्यक तेवढे कामगार नेण्यास राणी विसरली नाही.

शेकडो सैनिकांनी निष्ठेने वैऱ्यावर हल्ला चढविला. भिल्लाच्या

**'चतुर्थ वर्गीयांनी आयुष्यभर नुसती निष्काम सेवा करावी....'**

काळचा घोगडीला चावा घेतला. मिल्लाच्या हातापायांना ढसल्यावर टोचलेली सुई उपसून काढताना शरीराची चिरफाड होऊन कित्येक मरून पडले. मधुस्मृतीवरील निष्ठा व्यक्त करण्यासाठी हजारो कामगार मोहोळाला चिकटून राहिले प्राणावर उदार होऊन मोहोळाचे रक्षण करू लागले.

घुसमटून टाकणारा धूर आणि जाळून भस्म करणाऱ्या अग्नीच्या भडकलेल्या ज्वाळांच्या पुढे कामगारांना हार खावी लागली. वैऱ्याने पोळी कापून काढली. मधाचे कोठार खरडून पिळुन काढले. घोंघावणाऱ्या, हल्ला करणाऱ्या सैनिकाना न जुमानता पलिता विझवून घोर अंधारात शत्रू नाहीसा झाला.

धुराने जीव कासावीस होत असतानाही, झळाने पंख करपण्याची भीती वाटत असतानाही ४१९९९ पोळीला चिकटून राहिला; पण पोळीच कुस्करून जाताना तो उडाला आणि जवळच दुसऱ्या एका फादीवर जाऊन बसला. त्याच्या मागोमाग शेकडोजण आले. हजारो सैनिक प्राणास मुकले होते, उरलेसुरलेले अंधारात वैऱ्याचा पाठलाग करणे अशक्य होऊन नाइलाजाने परतले. जवळच्या फाद्याना लटकले व सूर्यप्रकाशाची वाट पाहू लागले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच राणीकडून शोधक आले. त्यांनी सर्वांना गोळा करून नव्या मोहोळाकडे नेले. पोळीच्या अपहरणाच्या वेळी शेकडो कामगारानी मधपरागाने आपले कोष भरले होते ते सर्व रिते करण्याची आज्ञा देऊन राणी व राजपुत्रानी मोठी मेजवानी केली. मेणकारानी राजवाडे बाधण्यास उपाशी पोटानेच सुरुवात केली. शोधकांच्या सूचनेप्रमाणे हजारो कामगार मधपराग सग्रहासाठी पिटाळण्यात आले. पंधरा-वीस मिनिटातच मधपरागाचे कोष भरभरून मोहोळात येऊ लागले. ते फस्त करीत, निश्चित मनाने राणी आणि राजपुत्र नवराज्याची स्वप्ने पाहू लागले. अधिक मोठया व सुसंपन्न राज्यासाठी नवपिढी निर्माण करण्याचा विचार करीत राणी स्वयंवरासाठी राजपुत्राला आव्हान देऊ लागली आणि नवराज्याने रोपटे रुजविण्यासाठी कामगार आपल्या परिश्रमाचे खतपाणी घालू लागले.

राणीच्या आज्ञेवरून राजपुत्रानी नवी राज्य घटना तयार केली. पूर्वीच्या मधुस्मृतीचीच ती सुधारून वाढवलेली आवृत्ती होती. कर्म आणि दैव या कल्पनांचा आधार घेऊन मधुस्मृतीला अपौरुषेयत्वही दिले गेले. मधुस्मृतीचे पालन हेच मुक्तीचे द्वार आणि मधुस्मृतीविरुद्ध विचार करणेही कठोर शिक्षापात्र पाप ठरविण्यात आले.

मधुस्मृतीची ही आवृत्ती वाचून राजपुत्र खूष झाले राणीने राजपुत्रांना शाबासकी दिली आणि मधुस्मृतीचे श्रवण मनन झाल्यावर कामागारांनी माना खाली घालून विश्वासू राहण्याचे वचन दिले.

ப

आणि दुसऱ्याच दिवशी ४१९९९ ने मधुस्मृतीविरुद्ध वर्तन केले.

मधपराग संग्रहाच्या दौऱ्यावर गेला असता त्याचा साथीदार ४१९९८ दिसला. मधुसंग्रहात किंवा मोहोळात कोठेही एक दुसऱ्याशी बोलणे किंवा विचारविनिमय करण्यास मधुस्मृतीने बंदी घातली होती, तरी पण ४१९९९ ला राहवले नाही.

४१९९९ सरळ रेषेत मोहोळाकडे उडण्याचे सोडून गोल गोल फिरत उडत होता. तसे उडणेही निषिद्ध होते. ४१९९९ ने निरखून पाहिले. ४१९९८ चे कोष मधाने आणि परागाने भरले होते.

'काय झालं भाऊ ?'

सहानुभूतीच्या प्रश्नाने भाबावून जावून ४१९९८ तर नुसता पाहातच राहिला. कोणीही काहीही विचारले तर उत्तर देण्यात वेळ घालवू नये असाही दडक होताच. संपूर्ण जीवनात त्याच्याशी आपुलकीने कोणीच बोलले नव्हते. आपण नियम मोडीत आहोत याची जाणीव असूनही तो सांगू लागला—

'त्या काळरात्री मी मेणाचा राजवाडा वितळू नये म्हणून पराकोटीचा प्रयत्न करीत होतो. पंख चालवून आगीची झळ दूर ठेवीत होतो राजनिष्ठेने मी जागीच चिकटून बसलो. तेव्हा माझा उजवा पंख थोडा करपला. पुढचा उजवा हात पाय जळाला. त्यामुळे फक्त डाव्या डोळयाची आणि संवेदक मिशीची सफाई शक्य आहे. उजव्या बाजूचे काहीच दिसत नाही. म्हणून असे गोल गोल फिरत जावे लागत आहे. सुदैवाने मधले आणि मागचे पाय ठीक आहेत. मधपरागसंग्रहात काहीच अडचण पडत नाही. नवे राज्य स्थापायचे ना, मी मरेपर्यंत काम करीन !...' जवळ जाऊन ४१९९९ ने त्याचा उजवा डोळा आणि संवेदक मिशी साफ केली. कृतज्ञतापूर्ण नजरेने पाहात ४१९९८ ने डावा हात उजव्या हाताला मिळविण्याचा प्रयास करीत नमस्कार केला. ४१९९९ ने आपुलकीने म्हटले, 'तुझा करपलेला पंख नीट करता आला असता तर...इतका भार कशाला वाहात आहेस? मला दे थोडा. मोहोळाच्या प्रवेशद्वारावर येताच मी परत तुझ्या कोशात ठेवीन !'

'नको नको ! मला मदत करीत असलेले कोणी पाहिले तर तुला कठीण शिक्षा होईल !'

त्याच्या प्रतिकाराला न जुमानता ४१९९९ ने अर्धाअधिक भार वाहून घेतला. ओझे हलके झाले तरी उजव्या बाजूला गिरक्या घेत घेत ४१९९८ मंदगतीने मोहोळाकडे निघाला. आपल्या पंखाची स्थिती जाणून मधुसंग्रहाला वेळ लागेल या भीतीने त्याने भोजन केले नव्हते. उपासपोटीच अत्याधिक प्रयास केल्याने त्याला भोवळ आली. तो जमिनीवर उतरला आणि मोहोळाच्या दिशेने सरपटू लागला. डोळयांना अंधारी आली. ४१९९९ ने उशीर होत असलेला पाहूनही ४१९९८ याची सोबत सोडली नाही. ४१९९८ कळवळून विनवू लागला,

'माझ्यासाठी थाबू नकोस. तुला उशीर होत आहे. हात जोडतो. तू लवकर जा. माझी काळजी करू नको! मी येईन उडत, पडत; पण मधपरागाचे कोठार भरण्यास नक्कीच येईन !"

४१९९९ ऐकत नाही हे पाहून अंगातली सर्व शक्ती एकवटून तो उच उडाला. त्याची मदत घेत घेत मोहोळाच्या प्रवेशद्वारापर्यंत मोठ्या प्रयासाने आला. ४१९९९ ने त्याचे कोश पूर्ववत मधपरागाने भरले आणि मोठ्या उत्साहाने ते दोघेही प्रवेशद्वारातून आत शिरले; पण...

'४१९९८ ला मोहोळात प्रवेश नाही.' कठोर स्वरात कोठारी ओरडला आणि कापऱ्या आवाजात ४१९९८ म्हणाला,

'पण मी मधपरागाचे कोश भरून आणले आहेत !'

'प्रश्न विचारला तरी बोलायचे नाही हा नियम माहित आहे ना? वीस मिनिटांत तू ३०० मिलिग्रॅम मधपराग आणू शकला नाहीस

आणि शकणारही नाहीस. चल हो मोहळा बाहेर!'

'पण मी १० मिनिटात १५० मिलिग्रॅम नक्कीच आणू शकेन. मला नवराज्याच्या भरभराटीला हातभार लावण्याची संधी द्या. मेहेरबानी करा, हे भरून आणलेले कोश तरी रिते करू द्या!'

दीनवाणी विनंती करीत ४१९९८ पुढे सरला हे पाहून रागाने लालबुद होत कोठारीने टाळी वाजवली. चारपाच सैनिक धावले आणि त्यांनी त्याला अलगद अुचलून मोहोळाबाहेर फेकून दिले.

हे पाहून ४१९९९ ला फार राग आला. 'मधुस्मृती निष्ठेचे हेच फळ!' पण पुढे होऊन सैनिकांना अडविण्याचे धैर्य मात्र त्याला झाले नाही. सैनिक म्हणजे राज्याचे रक्षक. मोहोळाचे अेकचतुर्थांश मधपराग अुत्पादन त्यांच्यासाठी खर्च केले जाते. राणीचे आवडते ते! त्यांना विरोध...!'

आपण फार मोठी कामगिरी पार पाडल्याच्या धन्यतेने सैनिक आपल्या जागी परतले. कोठारीची करडी नजर आता ४१९९९ कडे वळली.

'मधुस्मृती विरुद्ध वागण्याचा उद्धटपणा केलास ना?'

लगेच सैनिक हत्यारे अुपसून धावले. चळचळा कापत ४१९९९ दीनवाणे विनवू लागला,

'मला क्षमा करा. ४१९९८ ने साठविलेला मधपराग व्यर्थ जाऊ नये म्हणून मी त्याला मदत केली!'

'मदत करणे म्हणजेच स्वतःचे कर्तव्याकडे दुर्लक्ष करणे.'

'माझी चूक झाली, माफ करा. पुन्हा तसे कधीच करणार नाही अशी शपथ घेतो.'

अेका सैनिकाने धावत जाअून मधुस्मृती आणली. तिच्यावर हात ठेऊन शपथ घेताना ४१९९९ चे पाय थरथरत होते. तिकडे लक्ष जाअून कोठारीने विचारले,

'इतका कशाला घाबरला आहेस?'

'नाही मधुराज्यात भीती कसली? फार वेळ गारठ्यात अुभा राहिल्याने पाय लटपटत आहेत!'

'भर दुपारचे अून सर्वांना जाणवत असता तुलाच कशी थंडी वाजत आहे?'

'..................'

'मधुस्मृतीचे पालन केलेस तर तुला कशालाच भिण्याचे कारण नाही. मधपरागाच्या संग्रहाचे कर्तव्य करण्यात जीवनाचे सार्थक कर! आपली लोकशाही आहे. लोकांसाठी सरकार आणि सरकारासाठी लोक. मोहोळाचा तुला काय लाभ आहे असा प्रश्न विचारण्यापेक्षा मोहोळाला तू कसा अुपयोगी पडू शकशील याचा विचार कर. याबद्दल मधुस्मृतीत लिहिलेलेच आहे. म्हणूनच विचार करण्याची गरजच नाही. भावनाना कधीच किंमत देऊ नको सहानुभूतीच्या भावनेने कर्तव्यपालनाला धोका आहे आणि लक्षात ठेव, फुलांचे आकडे मोजण्याचे विसरू नको. आकडे मोजण्यात मन गुंतविलेस तर विचाराचे आणि भावनाचे सापळे तुला कधीच पकडू शकणार नाहीत. जा कोश रिते कर कोठारात!'

कोठारातून परतला तेव्हा शोधकाची सूचना घेण्यास ४१९९९ थोडा वेळ थांबला. पाषाणहृदयालाही पाझर फुटेल अितक्या दीनवाणे ओरडणारे अनेक स्वर त्याच्या कानांवर पडले. ४१९९८ चा आवाजही त्याने ओळखला. शेकडो कामगार मोहोळात येअू देण्याची भीक मागत होते. कालच्या त्या दुर्धर प्रसंगात मोहोळसैन्याचे रक्षण करताना त्याचे हातपाय तुटले होते किंवा जळाले होते. कोणाचे पंख करपले होते, तर कोणाचे कोश जळाले होते; पण ते सर्व वीस मिनिटांत ३०० मिलिग्रॅम मधपराग आणण्यास असमर्थ आहेत ह्या कारणासाठी बहिष्कृत झाले होते.

त्यांचे आवाज ऐकू येअू नयेत म्हणून ४१९९९ ने कानात बोटे घातली तरी त्याच्या हृदयांत सहानुभूतीची भावना मूळ धरू लागली. कोठारीने बजावले होते, महत्त्व भावनांना देअू नकोस. मधुस्मृतीचे नियम पाळ! आकडेमोजणीसारखा रामबाण अुपाय नाही...!'

मधपरागाच्या जलद खेपा करण्यात आणि आकडे मोजण्यात दिवस कसाबसा गेला. पण रात्र मात्र खायला उठली. ४१९९८ आणि इतर बहिष्कृत कामगारांचा वारंवार विचार येवू लागला. अस्वस्थ करू लागला. मोठमोठ्याने मधुस्मृतीच्या नियमांची उजळणी करण्यात त्याने सारी रात्र घालवली. सहानुभूतीचा मिणमिणता दिवा विझवून टाकला.

दुसऱ्या दिवशी शोधकांनी दाखविलेल्या दिशेने उडण्याआधी त्याने मोहोळाभोवती एक गिरकी घेतली. पाय वर करून मरून पडलेल्या शेकडो कामगारांत त्याने ४१९९८ ला बरोबर ओळखले. त्याला मुंग्या लागल्या होत्या. त्याचे पंख आणि हातपाय तोडून नेत होत्या. ते पाहून त्याच्या डोळ्यात पाणी उभे राहिले. 'भावनांकडे लक्ष द्यायचे नसते' तो मोहोळापासून दूर उडून गेला. मग साठवलेल्या फुलाचे आकडे मोजण्यात भावनांचे जग लपवून टाकू लागला. काही दिवसांनी भावना गेल्या. पण रात्रीच्या एकांतात प्रक्षुब्ध विचार करण्याची सवय मात्र जडली.

'पोळीचे बांधकाम आता पूर्ण झाले आहे. बांधकाम, मेणकाम करणारे कामगार पटापट मरत आहेत. ते मारले का जात आहेत? राणीने हजारांनी अंडी घालण्यास सुरुवात केली आहे. नवी पिढी लवकरच जन्मी येईल. आणि जुनी पिढी ... तिचे काय होईल?

'नव्या पिढीसाठी अविरत परिश्रम करून हजारो कामगार मधपराग गोळा करीत आहेत, गुदाम भरीत आहेत. त्या प्रयासात त्यांचे पंख फाटत आहेत. हातापायाना दुखापत होत आहे...आणि अशा प्रकारे निकामी झालेले शेकडो मधुवाहक मोहोळाबाहेर फेकले जात आहेत...उद्या जर माझेही पंख फाटले तर...मलाही तीच गती! बहिष्काराच्या भीतीने त्याच्या सर्वांगावर काटा उभा राहिला.

'आयुष्यभर मोहोळासाठी खपल्यावर हेच का प्रतिफळ?

'निष्काम सेवा. सरकारासाठी लोक ...'

'मधुस्मृती कोणाच्या फायद्यासाठी लिहिली गेली? कोणी लिहिली?'

'मधुस्मृती हजारो वर्षे चालत आली आहे. ती समाजव्यवस्थेच्या

**'आयुष्यभर मोहोळासाठी खपल्यावर हेच का प्रतिफळ?'**

स्थर्यासाठी आहे. ती वेदप्रमाण आहे. हजारो सुज्ञांनी स्वीकारली आहे. आमच्या पूर्वजांची ती संस्कृती आहे. सर्वांच्या हितासाठी मधुस्मृती आहे ...'

'नाही, नाही, मूठभरांच्या सुखासाठी ती निर्माण केलेली आहे...'

'मधुस्मृतीची टीका करणे घोर पाप आहे. मधुस्मृतीच्या ध्येयाबद्दल संशय व्यक्त करणे म्हणजे मरणदंडाला पात्र असा अपराध... श्रद्धा तारते संशय मारतो. विश्वासाने विश्वास वाढतो ! ...'

विचाराचे वादळ शांत करण्यास ४१९९९ पुन्हा पुन्हा मधुस्मृतीच्या नियमाची उजळणी करीत रात्र काढी. पहाटे थोडी झोप लागायची आणि तेव्हा सैनिक येऊन सर्वांना मधुसंग्रहासाठी पिटाळून लावीत...

¤

निरभ्र नीलगगन, भरयौवनात वसंतकाल. दशदिशांना आनंद, उत्साह. जिकडेतिकडे फुलांनी बहरलेल्या वृक्षवेली. मनमोहक दृश्ये, मंद सुगंध आणि कर्णमधुर संगीत.

सकाळच्या प्रसन्न वातावरणात गोल गोल नाचत गिरक्या घेवून शोधकांनी मधपराग मुबलकपणे मिळण्याच्या दिशेने चालून शेकडो कामगारांना पिटाळून लावले. मधपरागाचा संग्रह हळूहळू वाढत होता. नवनवे गुदाम तयार केले जात होते. प्रत्येक कामगार मोठ्या उत्साहाने नव्या पिढीच्या स्वागतासाठी कष्ट उपसीत होता.

पण अपवाद मात्र एक होता, ४१९९९. रात्रभर त्याला एका प्रश्नाचे उत्तर स्वीकार करणे कठीण होते. म्हणून सापडत नव्हते. प्रश्न होता माझ्या कबाडकष्टांच्या जीवनाचा अर्थ काय ?

निद्रानाशाने त्याचे डोळे चुरचुरत होते. डोके बधिर झाले होते. त्याला कित्येकदा वाटले, आपण सदैव बाल्यावस्थेतच राहिलो असतो तर किती बरे झाले असते ! संपूर्ण जीवनच निरर्थक ठरवून टाकणाऱ्या ह्या प्रश्नाला तोंड देण्याचे टळले असते.

बालपणाची आठवण होऊन तो प्रजोत्पत्ती कार्यालयाकडे वळला. 'बालपणाच्या खोलीत डोके खुपसून पडून राहावे. वर्तमानकाळ आणि भविष्यकाळापासून दूर दूर पळून जावे. शक्य झाले तर त्या बालपणाच्या जगातच मरून पडावे...' पण सैनिकांनी त्याची वाट अडवली. फक्त राणी आणि तिच्या परिचारिकांनाच तेथे प्रवेश होता

'४१९९९ सूर्योदय झाला. मधपराग आणण्याचे कर्तव्य विसरू नको.'

कोठारी खेकसला, सैनिकांनी ४१९९९ ला हातापायाला धरून फरफरा ओढीत प्रवेशद्वाराजवळ आणून सोडले. शोधकाने गुलाबाच्या मळ्याचे ठावठिकाण सुचविले. आणि ४१९९९ मोठ्या नाखुषीने तिकडे उडत गेला. पहिल्या दोन फुलाचा मधपराग त्याने खाल्ला. पण आज मध बेचव वाटला. हृदयात विषण्णता भरभरून येऊ लागली. सैनिकांचा त्याला भयंकर राग आला. पण क्रोध निषिद्ध आहे ना ?

'भावनांना काडीची किंमत द्यायची नसते. आकडे मोजणे हाच एक रामबाण उपाय ..'

भावनांना आणि विचारांना दडपून टाकण्यास तो मोठमोठ्याने मधपराग घेतलेल्या फुलांचे आकडे मोजू लागला. धडाधडा उड्या मारून फुलांतून मधपराग हिसकावून घेऊ लागला. शेवटी तो एका नुकतेच उमलत असलेल्या सोनेरी गुलाबात शिरला व धसमुसळेपणाने पराग ओरबाडून घेऊ लागला.

'कोण आहे ? न विचारता आत येऊन दंगा कोण करतात ?'

एका कोमल कंठाने प्रश्न विचारला. प्रश्न ऐकताच तो थांबला आजपर्यंत हजारो फुलांचा मधपराग त्याने लुटला होता. पण कोणीच त्याला अडवले नव्हते की असा प्रश्न विचारला नव्हता. ४१९९९ ने तिकडे दुर्लक्ष केले. तो मध घेऊ लागला.

'अहो, तुम्हाला विचारते मी हे काय आहे ?'

दटावणीच्या स्वरात समोरून प्रश्न आला. त्याने उत्तर दिले.

'फुलाचा मधपराग नेणे हा आमचा धर्मच आहे.. आजपर्यंत कोणीच मला अडवले नव्हते.'

'कारण स्पष्टच आहे. तुमच्याबद्दल त्याना काहीच वाटले नसेल.'

'म्हणजे मी समजलो नाही.'

'तुमच्या डोळ्यांत काही तरी विशेष आहे. त्यात खोल पाहाताच माझ्या हृदयात काही तरी सुंदर आणि सुखद झाले आहे. आणि ते भरभरा वाढण्यास उत्सुक झाले आहे..'

'मधसंग्रहात कोणाशीच बोलायचे नसते. मधपराग दिल्याबद्दल नजरेनेही कृतज्ञतेचा नजराणा देणे भावविवशतेचे लक्षण आहे. भावनांच्या जाळ्यात गुरफटल्यास मोहोळासाठी जगणे अशक्य होते... ४१९९९ स्वत:लाच बजावत पुटपुटला !

'अहो, असे काय संशयी दृष्टीने पाहाता ? मी काही चेटकीण नाही!'

'.........'

'आपली ओळख तरी द्याल का ?'

'मी ४१९९९.'


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.
—डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

'काय ? ४१९९९ हे काय नाव आहे ? हा तर झाला आकडा!'

'मला याच आकड्याने आज्ञा केली जाते.'

'आपले काम काय काय असते हो ?'

'दर वीस मिनिटांनी ३०० मिलिग्रॅम मधपराग गोळा करून गुदामात भरणे !'

'मधुसंग्रहकार तुम्ही, मी तुम्हाला मधुकर म्हणून हाक मारीन. चालेल ना ?... आवडेल नाव ?'

'नाव देण्या-घेण्यास सक्त मनाई आहे ! मला ४१९९९ म्हणून हाक मारा ... नाही. नको मला हाक मारू नका. माझ्याशी बोलू पण नका!'

'असे कसे होईल ? नाही मी तुम्हाला मधुकर म्हणूनच हाक मारीन. म-धु-क-र किती गोड नाव आहे नाही ? म-धु-क-र !'

'मला उशीर होत आहे. वीस मिनिटात गेले पाहिजे !'

'तुमच्या राज्यात कडक हुकूमशाही अंमलात आहे असे दिसते. जा लवकर जा... पण जाण्याआधी माझे नाव तरी विचारून घ्याल ? मी सोनाली ... सो-ना-ली !'

स्वखुशीने सोनालीने आपला मधुपराग मधुकराच्या कोशात भरला. गोड हसून प्रेमभरित नजरेने त्याला निरोप दिला. मधुकराचे पाय जागचे उचलेनात !

मधुस्मृतीची आठवण होताच त्याचे हृदय धडधडू लागले. झट-दिशी वळून तो फुलाबाहेर पडला. मोहोळाच्या दिशेने भरारा उडू लागला; पण मन मात्र सोनालीभोवती घुटमळत राहिले.

'सोनाली ... किती शोभणारे नाव ! स्वभावही तसाच-प्रेमळ आणि उदार ! जवळ असेल नसेल तेवढा सगळा मधपराग माझ्या कोषात कोंबला ! माझ्या कार्याला शोभेल असे नावही तिने मला दिले ...

आजपर्यंत मला नाव नव्हते. मी होतो फक्त एक आकडा-४१९९९ ! केव्हाही आणि कसाही कमी करता येणारा. इतकेच नाही, क्षणात खोडूनही टाकता येणारा !

आकड्यांच्या चिखलातून उचलून सोनालीने मला नामरूप दिले. स्वत्वाची जाणीवही करून दिली. साजेलसे नाव देऊन स्वाभिमानही जागा केला !

मधुकर ... म-धु-क-र, तिच्या मंजुळ आवाजाने माझे मन सारखे मोहरत राहिले आहे. हृदय आनंदाने नाचत आहे.

संध्याकाळ झाली. दिवसभराच्या परिश्रमाने थकलेल्या हजारो कामगारांच्या गर्दीत झोपण्याचा प्रयत्न करणाऱ्या मधुकरला एकटेपणा जाणवू लागला. वर-खाली, डावी-उजवीकडे चारी बाजूंनी साथीदार गाढ झोपेत घोरत होते. मधुस्मृतीच्या नियमांचे हलक्या आवाजातील संगीत चालू होते.

मधुकरला मात्र झोप येत नव्हती. आजचा अनुभव -प्रेमाचा अनुभव -कोणाला तरी सांगावेसे मनापासून वाटत होते.

प्रेम काय सांगितल्याने कळत असते ?

अनुभव नसलेल्यांना समजावून सांगायचे तरी कसे ?

माझ्या भोवतालच्या हजारोंपैकी एकानेही प्रेम अनुभवले नसणार! मधुस्मृतीने प्रेम व सहानुभूती या भावनांना चिरडून टाकण्याचे शिकविले आहे ना ? तेव्हा कोणाशी, काय व कसे बोलणार ?

आजपासून ह्या हजारोंपैकी मी नव्हे. मी एकटाच ... हे एकलेपण मलाच सहन करीत राहावे लागणार ! ... नाही, मी एकटा नाही. सोनाली आहे ना ! मोहोळाच्या त्या अंधारातही सोनालीची मूर्ती त्याच्या मनःचक्षूंपुढे स्पष्टपणे उभी राहिली. त्याच्या हृदयाचे ठोके जलद पडू लागले.

भुरकन उडून सोनालीच्या मांडीवर डोके ठेवून पडलो तर ... चटदिशी झोप लागेल.

पहिल्याच भेटीनंतर तो दहा-बारा वेळा सोनालीच्या हृदयात शिरून हितगुज करून आला होता. तिने उदार हस्ताने जवळ असेल तेवढा मधपराग तो नको नको म्हणत असतानाही त्याच्या कोशात भरला होता. त्याच्याशी प्रेमाने हसली-बोलली होती.

सोनालीशी केलेला प्रेमसंवाद तो आठवू लागला.

"सोनाली, तुझी आठवण येताच भावना उचंबळून येतात; पण तुझ्याजवळ नसताना मात्र त्या झोपी जातात."

"नुसत्या उचंबळत्या भावनात प्रेम नसते. भावना वाऱ्यासारख्या ...कधी वादळी, कधी मंद, कधी सुगंधमय सुखावह झुळूक."

"हृदयाला हेलावणाऱ्या भावनाशिवाय प्रेमाचे अस्तित्व जाणवेल तरी कसे ?"

"प्रेमाला भावनांचा आधार लागतो हे खरे आणि तितकेच खरे. की प्रेमाचे बळ प्रतिक्षणी केलल्या निष्ठेच्या निर्धारात असते. एक-निष्ठा आणि स्वसमर्पण यांचा सुंदर संगम हे प्रेमाचे फळ ! तेथे सुखद भावनांची फुले उमलत नसली तरी चालेल."

"तरीपण भावनाच्या मोजमापानेच प्रेमसागराची खोली आणि लांबीरुंदी मोजण्याची धडपड चाललेली असते ना ?"

"प्रेमाची वाढ स्वतःच्या भावनांच्या भोवऱ्यात गुरफटण्यात नसते. स्वतःचे सुख आणि सुरक्षितता पाहाणारा खरे प्रेम करीतच नसतो. प्रियकराच्या हितासाठी सर्वस्व समर्पण करण्यात प्रेम असते !"

"तुला देण्यासारखे माझेजवळ आहे तरी काय ?"

"मला काही मिळावे म्हणून का मी प्रेम करीत आहे ?"

"तर मग हे स्वसमर्पण कशासाठी ?"

"अटी असल्यास प्रेमाचा व्यापार होत नाही का ?"

"खरेच माझ्याकडून तुला कोणतीच अपेक्षा नाही ?"

"हो, आहे ना एकच अपेक्षा !"

"कोणती ?"

"प्रतिप्रेमाची !"

"फक्त ? नक्की ?"

"हो, केवळ प्रतिप्रेमाची अपेक्षा आहे !"

आशापूर्ण नजरेने घायाळ करीत तिने त्याच्या डोळ्यांत पाहिले. तिच्या स्वरात जितकी आर्जवता होती तितकीच दृढताही होती. संथपणे वाहणाऱ्या गंगेची गंभीरता होती. तोही क्षणभर गंभीर झाला. नंतर मोठ्याने हसून त्याने विचारले,

"ही अट पूर्ण करण्यास मी नाकारले तर ?"

ती मात्र गंभीरच राहिली. शांत स्वरात तिने उत्तर दिले-

"स्वखुशीने दिलेल्या प्रेमात सहजता असते. संपूर्ण सुखसमाधान देण्याची शक्ती असते."

(उत्तरार्ध पुढील अंकी)

पुस्तके

# लाड–खोटे, खोटे–लाड

एका सुखवस्तू घरातली, लाडात वाढलेली मुलगी तशाच एका घराण्याची सून होते. जीवनातले खाच-खळगे लग्नानंतर अपरिहार्यपणे पुढे येतात. पडत्या काळात घर सावरण्यासाठी ती मुलगी बोलपटातलं काम स्वीकारते. मग 'प्रभात'चे चित्रपट – त्यातून नावलौकिक, हिंदी चित्रपटातही सहज समावेश – साहित्यअकादमीचं पारितोषिक, पद्मश्री, 'युनेस्को'ची जागतिक महिला परिषद, अनेक परदेशदौरे – कधी कामानिमित्त, कधी सहज ! जीवनातले चढ–उतार जिने पाहिले, स्वभावानुसार त्यांना सामोरं जाऊन त्यांच्यावर यशस्वी मात केली आणि सामान्य माणसांनी नोंद घ्यावी असं वेगळं जीवन जगली त्या ज्येष्ठ मराठी अभिनेत्रीचं – दुर्गाबाई खोटयांचं-आत्मचरित्र 'मॅजेस्टिक'नं जानेवारी ८२ मध्ये प्रसिद्ध केलं आहे.

आत्मचरित्राची सुरुवात होते 'त्यांच्या बालपणापासून म्हणजे जेव्हा दुर्गाबाई बानू लाड होत्या तेव्हापासून ! लाडाचं घर रंगवताना दुर्गाबाई इतक्या समरस होऊन गेल्या आहेत की, जणू काही अजून त्या लाडांच्याच घरात वावरताहेत ! कांदेवाडीतलं ते लाडांचं मोठं आणि अस्ताव्यस्त घर म्हणजे ना वाडा, ना महाल, ना कोठी, ना बंगला अशा शब्दात एकदा घराची ओळख झाली की, मग दुर्गाबाई त्या घराचा अक्षरशः कोपरानकोपरा जिवंत करतात. म्हणजे, ओटीवरच्या खांबावरचे घोड्याचे मुखवटे, पडवीतून मधल्या माडीकडे जाणारा जिना, पडवीतले कुलुपबंद अवाढव्य हडपे आणि त्यातल्या मौल्यवान वस्तू ! पडवीच्या मागे कूड. कुडाला चारी बाजूनी खिडक्या, खिडक्यांना रुंद कट्टे. त्या कट्टयावर बसून फुलाच्या माळा ओवणाऱ्या नाही तर तुळशी मोडणाऱ्या लाडाच्या घरातल्या लेकी–सुना !

तिथून आत गेल्यावर भलंमोठं देवघर. त्यातलं सुंदर शिसवी मखर, मंगेशाचा मुखवटा, देवघर उजळून टाकणाऱ्या समया आणि रंगीबेरंगी सोवळी नेसून, नाकात नथी घालून पूजेला बसणाऱ्या लाडाच्या सुवासिनी. देवघरासमोरचा झोपाळा – त्याच्या पितळी साखळ्या, त्यावरचे कीर आणि मोर. एक ना दोन ... अशा असंख्य बारीकसारीक गोष्टीतून दुर्गाबाई लाडाचं घर जिवंत करतात दुर्गाबाईंचं वैशिष्टय म्हणजे फक्त त्या घराच्याच वर्णनात गुंतलेल्या नाहीत. घरात रहाणारी माणसंसुद्धा 'त्या डोळ्यासमोर लख्ख उभी करतात ! लाडाच्या घरातलं केंद्रसरकार - काकीबाय, बानूच्या तीन सख्ख्या काकी, तैनातीत रहाणारी आत्या आणि सर्वांत महत्त्वाचे ते बानूचे आई–वडील ! पाश्चात्य जीवनपद्धतीची ओढ असलेली करारी, शिस्तप्रिय आई आणि प्रेमळ वडील.

असं हे लाडांचं घर दुर्गाबाईंनी मन लावून रंगवलं आहे. तरी देखील कोणतेही संदर्भ मुद्दाम घासून-पुसून चकचकीत केलेले नाहीत. हे लिखाण इतकं सहज आहे की, मनात होतं ते उतरवलं येवढंच ! संपूर्ण आत्मचरित्रात म्हणूनच हा 'नॉस्टॅलजिया' सतत जाणवतो, मनावर ठसतो. 'लाडाचं घर' वाचणं हा एक प्रसन्न अनुभव आहे. आत्मचरित्र वाचून झाल्यावर एक प्रश्न मात्र मनात येतो की, बाईंनी येवढे मानसन्मान मिळवले लोकप्रियता मिळवली; पण लाडांच्या घरात जे सुखद क्षण मिळवले ते मात्र हरवले! ही रुखरुख वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षीदेखील बाईंना जाणवते की काय ? आत्मचरित्रातल्या 'नॉस्टॅलजिया'चं कारण हेच असावं.

यानंतरचा भाग आहे दुर्गाबाईंचं शिक्षण – शाळा, कॉलेज आणि नतर लग्न ! इतर सामान्य मुली ज्या शाळांत शिकत असत तिथे बानू शिकली नाही. ती कॅथेड्रलसारख्या मिशनरी शाळेत गेली. शाळेतल्या बाईंनी व्हिक्टोरिया राणीचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवला. व्यक्तिमत्त्वाची जडणघडण इथेच सुरू झाली. 'कॅथेड्रलमध्ये जाऊ लागल्यापासून माझ्यात एक प्रकारची आढ्यता आली' असं बाई सांगतात. सागरगोटे, झिम्मा, लंगडी खेळणाऱ्या मुलांपासून बानू अलगद वेगळी झाली. मग कॉलेजमध्येही तेच. सेंट झेवियर्स मध्ये बानू सगळ्या कार्यक्रमात पुढे ! 'मिस् लाड' हे कॉलेजातलं मोठं आकर्षण होतं. आपण 'कोणी' तरी आहोत ही श्रेष्ठत्वाची भावना त्या वेळच्या बानूच्या वर्णनातून सहज लक्षात येते. आत्मचरित्राच्या ओघात एक गोष्ट लक्षात येते की, श्रेष्ठत्वाची भावना हा बानूचा स्वभाव असेल किंवा नसेल; पण तिच्या मम्मीने विशिष्ट पद्धतीने केलेल्या upbringing चाच तो परिणाम होता. लाडाच्या घरातले जावई फॉरिन रिटर्न्ड असणारच ! हे बानूच्या मम्मीनं ठरवलेलं असल्यामुळंच बानू कॉलेजातल्या समवयीन मुलांपासून दूर राहिली असेल का ?

### लटका बचाव

दुर्गाबाईंच्या चरित्रात त्या काळच्या प्रतिष्ठित समाजाच्या प्रतिष्ठेच्या कल्पना अशा सहज लक्षात येतात. याचं एक बोलकं उदाहरण म्हणजे त्या स्वातंत्र्यपूर्व काळाचं या आत्मचरित्रात आलेलं चित्रण ! स्वातंत्र्याचं वारं घराघरात शिरलं होतं, तेव्हा लाडांच्या घरात पाटर्या, क्लब चालूच होते !

कॅथेड्रलमध्ये जाणारी बानू 'मला देशसेवा करायची आहे' असं म्हणते तेव्हा तिच्या हेडबाईच फक्त चक्रावल्या नाहीत तर तिचे मम्मी–डॅडी सुद्धा घाबरतात! बानूला रुक्षपणे फैलावर घेतात. नॉनकोऑपरेशन चळवळीत जायचं असेल तर कपडालत्ता, पैसा, गाडी मिळणार नाही हे स्पष्ट बजावतात. विचार करण्यासाठी एक महिन्याची मुदत देतात. या महिन्याचं चित्रण करताना दुर्गाबाई म्हणतात, "विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्यानंतर देशासाठी काय करायचं याची मला कोणी कल्पना दिली नाही. मोठे नेते आले की, धावपळ करणं आणि ते गेले की गप्प बसणं एवढंच दिसत होतं. योजनाबद्ध, शिस्तबद्ध काहीच नव्हतं!" दुर्गाबाईंचं हे म्हणणं मात्र उगाचच बचाव केल्यासारखं वाटतं. देशसेवेसाठी शाळा सोडून काय करायचं हे त्या वेळी कुणाला सांगायची गरजच नव्हती. योजनाबद्ध काही नव्हतं हे म्हणणं देखील एकांगीच आहे. मुरलेली सुखासीनता सोडून द्यायला दुर्गाबाईंची त्या वेळी मानसिक तयारी नव्हती असंच वाटतं ! हा दोष असेल तर घरातलं भपकेबाज वातावरण त्याला कारण होतं. बानूची आई त्या वेळच्या स्वातंत्र्य-

चळवळीला पाठिंवा देण्यासाठी खादीच्या साड्या नेसत असे तेव्हा बानूचे वडील म्हणत, "काय गोणपाट नेसतेस ? काहीतरी dainty नेस !" तर अशा वातावरणात बानू घडली. अशा प्रतिष्ठेला बळी पडूनच बानूच विश्वनाथ खोटयांशी लग्न झालं आणि बानू 'दुर्गाबाई खोटे' झाली !

लग्नानंतरच्या भागात खोटयांचा धंदा बुडाल्यामुळ जगण्यासाठी दुर्गाबाईंनी बोलपटात काम स्वीकारलं. हा बोलपट (फरेबी जाल) कोसळला; पण त्याच बोलपटातलं दुर्गाबाईंचं काम पाहून शांतारामबापूंनी 'अयोध्येचा राजा' साठी दुर्गाबाईंना बोलावलं. त्यानंतरची चित्रपटकारकीर्द काळानुसार या आत्मचरित्रात येते. या काळात घडलेले महत्त्वाचे प्रसंग म्हणजे दोन मुलं–बकुल–हरिनचा जन्म, श्री. खोटयांचं निधन, त्यानंतर काही वर्षांनी श्री. रशिद याच्याशी पुनर्विवाह. दरम्यान बकुल–हरिनची लग्नं. बकुलची परदेशी बायको, तर हरिनचा विवाहानंतर काही वर्षांनी झालेला अचानक मृत्यू ! त्या वेळी दुर्गाबाईंच्या मनावर जे आघात झाले असतील त्याची आत्मचरित्र वाचून सहज कल्पना येते !

त्यानंतर बकुलच्या तीनही मुली शिक्षणानिमित्त परदेशात. दुर्गाबाईंचा नातजावईही परदेशी! नंतरच्या आयुष्यात दुर्गाबाई आपल्या कुटुंबापासून कुठे तरी दूर गेल्या हे सहज लक्षात येतं.

आयुष्याच्या उतारवयात दुर्गाबाईंना अनेक मानसन्मान मिळाले–ज्याबद्दल त्या कृतार्थ आहेत; पण तरीदेखील दुर्गाबाईंचं कादेवाडीतलं लाडाचं घर काही त्यांच्या डोक्यातून गेलेलं नाही ! जिराडला मोठी जमीन घेऊन, त्या शांत वातावरणात बाई पुन्हा लाडांचं घर आठवतात!

## न–दु खी

आत्मचरित्राच्या शेवटच्या भागात 'आता मागं वळून...' मध्ये दुर्गाबाईंचे काही स्वभावविशेष स्पष्ट होतात. त्या म्हणतात, "अति तेथे माती' हे अगदी साधं सरळ सुभाषित माझ्या जीवनातील अनेक कृतीत ढोबळपणानं दिसून येतं."

वेळेचं बंधन बाईंनी पराकोटीच्या निष्ठेनं पाळलं. आता स्टुडिओत वेळेवर न जाणं म्हणजेच प्रतिष्ठेचं लक्षण ! स्टुडिओत नुसत्या बसून काढलेल्या वेळाबद्दल दुर्गाबाईंना रुखरुख आहे. मूल्याचे बदलते संदर्भ त्यांना अस्वस्थ करतात. 'जे आयुष्य वाट्याला आलं त्याबद्दल दुर्गाबाईंची प्रतिक्रिया म्हणजे 'I am not unhappy ...!' इतके स्थिर मानसन्मान मिळूनही "स्थिर होण्यासाठी, कोणाशी जमवून घेण्यासाठी पुरेसा अवधी मिळाला नाही" ही बाईंची रुखरुख म्हणूनच स्पर्शून जाते. बाईंचं सारंच आयुष्य धावपळीत गेलं, ज्याच्याबद्दल विचार करायला सुद्धा त्यांना वेळ मिळाला नाही ! आपण कोणाच्या भावना, संबंध जतन केले नाहीत, जोपासले नाहीत मग आता सरत्या काळात मुद्दाम माझा कोणी विचार करावा ही अपेक्षा चुकीची नाही का ? असं बाई विचारतात. जीवनाची आखलेली चौकट नक्की करतात.

'मी–दुर्गा खोटे' हे दुर्गाबाईंचं आत्मचरित्र १३ जाने. ला बाईंच्या जन्मदिवशी-संक्रांतीला प्रसिद्ध झालं.

पुस्तकाच्या आरंभी, स्वगतात त्या म्हणतात,ही आत्मकथा तिळगूळ म्हणून वाचकाच्या हाती देते. काळे तीळ, गोरे तीळ, तिळात मिसळवले तीळ !" या तिळगुळाचा आस्वाद घेतल्यावर तिळातला कडवटपणा जाऊन जिभेवर गुळाचा गोडवा शिल्लक रहातो हे नक्की !

दुर्गाबाईंसारख्या काही मान्यवर व्यक्तीचे साहित्य–गुण अशा आत्मचरित्राच्या रूपानंच फक्त पुढे येतात. दुर्गाबाईंच्या या आत्मचरित्रात लिखाणातली सफाई विशेषत्वाने जाणवते. आपलं परीक्षण करून घेऊन आपले चांगलेच गुणविशेष दाखवून देण्याची सफाई यात नाही. 'आयुष्य असं घडत गेलं' असं त्या प्राजळपणे व्यक्त करतात.

दुर्गाबाईंनी अजून लिहावं असं वाटायला लावणारं हे आत्मचरित्र आहे.

–मेधा देशपांडे

मी दुर्गा खोटे
लेखक–श्रीमती दुर्गा खोटे
मॅजेस्टिक प्रकाशन
पृष्ठे : १८८, किंमत : ३५ रु.

□

---


## – नवीन दाखल झालेली पुस्तके –

१. एक होता कार्व्हर–(चरित्र) सौ. वीणा गवाणकर
२. राब–(कादंबरी) अनंत मनोहर
३. दिल्ली दिनांक–(राजकीय कादंबरी) गंगाधर इंदूरकर
४. र धों. कर्वे–(चरित्र) य. दि. फडके
५. रारंगढांग–(कादंबरी) प्रभाकर पेंढारकर
६. तुही इयत्ता कंची–(कविता) नामदेव ढसाळ
७. नवरत्ने हरपली रणांगणी–(पानिपतयुद्धपार्श्वभूमीवरील कादंबरी) कै. वासुदेव बेलवलकर
८. देवाची माणसं–(व्यक्तिचित्रे) भीमराव कुलकर्णी

1. **The Revenue Stamp** (Memoirs)–Amrita Pritam (Jnanpith award winner)
2. **The Record-breaking Sunil Gavaskar** (Cricket) **C. D. Clark**

*We are going to declare, on the back of our widely circulating books, the names and addresses of those readors who never return our books or write off our dues !*

**दि फिनिक्स लायब्ररी**

**७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.**

एका तालेवार दिग्दर्शकानं 'सद्गति' ही कथा स्वीकारली याचा आनंद व अभिमान वाटतो; पण हा प्रयत्न याहीपेक्षा त्याला यशस्वी करता आला असता याबद्दल यत्किंचितही शंका वाटत नसल्यामुळे मन खट्टू होतं..,

# 'सद्गति' आणि प्रेमचंद

डॉ. श्रीरंग दा. संगोराम

सत्यजित रे यांनी प्रेमचंदांच्या 'शतरंज के खिलाडी' आणि 'सद्गति' या दोन लघुकथावर बनविलेले चित्रपट नुकतेच दूरदर्शनवर सादर झाले आणि त्याबरोबर हिंदी साहित्याबद्दल विशेष आस्था न बाळगणाऱ्या महानगरीय मराठी माणसापर्यंत मुन्शी प्रेमचंद हे नाव झटकन पोहोचलं. तसं पाहिल्यास मागच्या वर्षी प्रेमचंद-जन्मशताब्दीच्या निमित्तानं या लेखकाच्या साहित्यावर मराठीत कमी-अधिक लिहिलं गेलं; परंतु एकूण मराठी वाचक, समीक्षक व लेखक प्रेमचदांपासून दूरच राहिले आहेत !

यंदाच्या जन्मशताब्दीचे मानकरी मामा वरेरकर यांच्या कृपेनं शरदबाबू केव्हाच महाराष्ट्रात पोचले आणि मराठी साहित्याभिरुचीवर आपला प्रभाव अंकित करते झाले; परतु शरदबाबूंचे समकालीन असलेल्या प्रेमचंदाना मात्र महाराष्ट्रात कुणी आणलं नाही. राष्ट्रभाषेचा प्रचार होत राहिला; आचार झाला नाही. तसं झालं असत तर १९२० नंतर गाधी-आंबेडकराच्या छायेत वावरणाऱ्या महाराष्ट्राला जातिवंत साहित्यात दलित व ग्रामीण संवेदना कशी व्यक्त होऊ शकते याचा एक वस्तुपाठ मिळाला असता आणि हा विशिष्ट प्रवाह अवतरण्यासाठी १९४०-६०-७० असे टप्पे मोजत बसावे लागले नसते. या पार्श्वभूमीवर एका जागतिक कीर्तीच्या आणि तेही बगाली दिग्दर्शकानं प्रेमचदाच्या 'सद्गति' या लघुकथेत मला श्रेष्ठ साहित्यकृतीची सर्व तत्त्व आढळली असं जाहीरपणे मुलाखतीत सागणं याला वेगळं महत्त्व आहे.

या घटनेचा आधार घेऊन प्रेमचंदांच्या कथासामर्थ्याचा एक लघुपरिचय सादर करावा आणि नंतर 'सद्गति' या कथेचे मूळचे व चित्रपटगत रूप समोरासमोर ठेवून पाहण्याचा प्रयत्न करावा हा प्रस्तुतच्या लेखनामागचा हेतू.

मुन्शी प्रेमचंद (१८८०-१९३६) हे 'कादंबरी-सम्राट' म्हणून ओळखले जातात. त्यांनी १६ कादंबऱ्या, ३०० च्या आसपास लघुकथा आणि 'माधुरी', 'जागरण' 'हंस' या पत्रिकांचे संपादक या नात्यानं भरपूर समीक्षात्मक आणि वैचारिक लेखन केल आहे. प्रथम ते उर्दूत लिहीत असत. १९१५ नंतर ते हिंदीतून लिहू लागले. वयाच्या ४१ व्या वर्षी राष्ट्रीय विचाराच्या आड येणारी शिक्षणाधिकाऱ्याची उत्तम पगाराची सरकारी नोकरी त्यानी सोडली. एकीकडे उच्च दर्जाचं वाङ्मय निर्माण करीत असतानाच एक लढाऊ राष्ट्रीय पत्रकार म्हणून त्यांनी आपलं कर्तव्य चोख बजावलं. अनेकदा सरकारी जप्ती आली, पण ते डगमगले नाहीत ! त्यांनी स्वतःच्या मालकीचा छापखाना चालविला; पण रोजच्या रोज नोकरांना प्राप्तीतील समान वाटा भारतात समाजवाद येण्याच्या आधीच्या काळी ते देत असत.

त्या काळी महिना ९०० रु. देणारी पण तेजस्वी साहित्यनिर्मितीच्या आड येणारी सिनेमातील नोकरी त्यानी काही दिवसांतच सोडली. गरिबाबद्दल कणव, शोषण व अस्पृश्यता याबद्दलची चीड, निष्कलंक उत्कट राष्ट्रप्रेम, कमालीची साधी राहणी आणि विशेष म्हणजे सवर्णीयामध्ये आढळणाऱ्या नीच मनोवृत्तीबद्दल अपराधी भावना यांची एकत्रित मूर्ती म्हणजे प्रेमचंद ! त्यांची ही सर्व वैशिष्ट्ये त्यांच्या वाङ्मयात उतरली आहेत. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांत सवंग परिणामांना थारा नाही. ईश्वरभक्तीचा विजय, नकली आस्तिकतेचा बडिवार इथं आढळणार नाही. त्याचप्रमाणं पारलौकिकतेचं स्तोम, लैंगिकता, प्रेमाचे चोचले यांनाही प्रेमचद-साहित्यात स्थान नाही! निखळ जीवनानुभव, कठोर वास्तव आणि मानवत्वाचा विजय यांचं प्रत्ययकारी दर्शन आपल्याला त्यांच्या साहित्यात घडतं.

आजवर मराठी जनतेला प्रेमचंद हे त्यांच्या प्रसिद्ध 'गोदान' कादंबरीमुळं आणि इतर कादंबऱ्यामुळं परिचित झालेले आहेत; परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, प्रेमचंद हे आपल्या कादंबऱ्यांपेक्षा लघुकथांमधून खऱ्या अर्थी यशस्वी झाले आहेत. सामाजिक आशय आणि साहित्याचे माध्यम याचा यशस्वी संयोग त्यांच्या लघुकथांतून जितक्या प्रकर्षानं जाणवतो तितका कादंबऱ्यांतून जाणवत नाही. अर्थात् त्यांच्या सर्वच लघुकथा यशस्वी आहेत असा याचा अर्थ नाही, हे सांगणे नकोच !

मराठीत कथा आली १९२५ च्या आगेमागे आणि तीही (दिवाकर कृष्ण सोडल्यास) कृत्रिम रंजन-बोधन परंपरा घेऊन. प्रेमचंदानी पहिली सर्वांग परिपूर्ण लघुकथा लिहिली १९१० मध्ये. त्यांनी शुद्ध साहित्यिक कसोटीवर उतरणाऱ्या ग्रामीण व दलित कथा १९३६ च्या पूर्वीच दिल्या आहेत. त्यांच्या निवडक कथामध्ये पाल्हाळ, बोधवाद, कलाटणीतंत्र वगैरे दोष आढळणार नाहीत. त्यांत सामाजिक आशयही आहे व कलामूल्याची स्वाभाविक जपणूकही आहे. कथेच्या क्षेत्रात हरिभाऊंना जे जमलं नाही ते प्रेमचंदाना फार सहजपणे जमून गेलेलं दिसतं. त्याचबरोबर दिवाकर कृष्णांची तरल भावकथा, फडक्यांची रंजनकारी कथा आणि खांडेकरांची कोटिक्रमान भारावलेली तथाकथित जीवनवादी कथा यांच्या तुलनेत प्रेमचंदाची कठोर वास्तवावर ठाकलेली यशस्वी लघुकथा पाहिली म्हणजे त्यांच्या महात्मतेचं प्रत्यतर येतं. भारतीय समाजातील विषमता, दारिद्र्य, स्वार्थांधता, शोषण यांचं प्रभावी चित्रण त्यांच्या कथासाहित्या

तून घडतं. त्याचप्रमाणं मनुष्यस्वभावाचे कंगोरे आणि कमतरता यांचं मार्मिक निरीक्षण त्यानी केलेलं दिसतं. पिढ्यानपिढ्या अत्याचार सहन करणाऱ्या शोषितांच्या मनात हा लेखक खोल डोकावला आहे, आणि त्यानं त्याच्या आतरिक आक्रोशाला वाट मोकळी करून दिली आहे. शरच्चंद्रांप्रमाणे त्यांची कथा आपल्याला अश्रूंनी भिजवत नाही. केवळ अश्रू हा तिचा आधार नाही. त्यामागे महाकवी वाल्मिकीच्या जातीची निषेधाची धार आहे. त्यामुळं ही कथा कधी आपल्याला अस्वस्थ करून सोडते तर कधी अंतर्मुख करून टाकते. त्याची 'सद्गति' ही याच प्रकारची कथा आहे.

## लघुकथांतले प्रेमचंद

प्रेमचंदांनी सुरुवातीस बटबटीत देशभक्तिपर अशा तुरळक कथा लिहिल्या पण जिला खऱ्या अर्थी लघुकथा म्हणता येईल अशी त्याची कथा 'बडे घर की बेटी' (कुळवंताची कन्या) १९१० मध्ये प्रकाशित झाली. अस्सल ग्रामीण वातावरण, डोळ्यासमोर प्रत्यक्ष उभी राहणारी हाडामासाची पात्रं, त्या काळाचं प्रतिनिधित्व करणारा एक जिवंत अनुभव आणि लेखकाची सदाबहार मिश्किल शैली यामुळं ही कथा ७२ वर्षांपूर्वीची असेल यावर विश्वास बसणार नाही. मोठ्याश्या खेड्यातील श्रीमंती ओसरलेल्या पण जुनी मूल्यं जपणाऱ्या एका जमीनदाराच्या (बेनीमाधव) कुटुंबातील घटनेवर आधारलेली ही कथा आहे. लेखक वर्णन करतो– असं ऐकिवात आहे की, एके काळी या दरवाजावर हत्ती झुलत असे. आता त्याची जागा एका मरतुकड्या म्हशीनं घेतली होती. दूध मात्र खूप द्यायची, कारण कुणी ना कुणी लोटी घेऊन उरावर बसलेलाच असायचा.' या एका वाक्यात जमीनदाराचं गतवैभव आणि आताची ओढगस्त याचं चित्र उभं राहतं. बेनीमाधवाचा एक मुलगा श्रीकंठसिंह बी. ए झालेला ( पूरे इलाके में वह अकेला ग्रेज्युएट था ! ) आणि दुसरा लालबिहारी सिंह दंडबैठका आणि कुस्त्या करून शेती बघणारा. श्रीकंठ नोकरीसाठी अलाहाबादला राहून दर शनिवारी घरी यायचा. एकदा श्रीकंठची बायको आनंदी आणि तिचा रागट दीर याच्यात मोठी रसकस होऊन घर मोडण्याची पाळी येते, आणि शनिवारी संध्याकाळी श्रीकंठशी सल्ला मसलत करायला आलेल्या गावकऱ्यांच्या समोर शोभा होण्याची पाळी येते. श्रीकंठ हा एकत्र कुटुंबपद्धतीचा पुरस्कर्ता. किती तरी मोडणारी घरं यानं जोडलेली. (इसीलिए गाँव की ललनाएँ इन्हे अपना शत्रु समझती थी!) आणि आज हा प्रसंग. शेवटी आनंदीचं उदार मन व दिराचा पश्चात्ताप यामुळं हा युद्धाचा प्रसंग टळतो. या कथेत एकही वाक्य व एकही शब्द अनावश्यक वाटत नाही. कथा बीजाचं उद्घाटन आणि समरप्रसंगातून अंतिम परिणतीपर्यंतचा त्याचा विकास इतका स्वाभाविक आणि इतका गतिमान शैलीत झाला आहे की कालसापेक्षतेच्या दृष्टीनं पाहता कुणीही चकित व्हावं !

प्रेमचंदांच्या कथांमध्ये जीवनातील अनेकविध अनुभवांचं चित्रण झालेलं आपल्याला दिसतं. जमीनदार, शेतकरी, ऑफिसर, वकील डॉक्टर, भटजी, शिक्षक, कारकून सावत्र आई इग्रजाळलेली नवशिक्षित तरुणी, अस्पृश्यतेचा अन्याय सहन करणारे देशबांधव अशी वेगवेगळ्या थरातील पात्रं त्यांच्या कथातून आपल्याला भेटतात बहुतेक कथाना अस्सल ग्रामीण पार्श्वभूमी लाभलेली आहे. उदाहरणार्थ, 'विटी दाण्डू' या खेळाचं निमित्त घेऊन त्यांनी एक उत्कृष्ट ग्रामीण लघुकथा लिहिली आहे. खेड्यातल्या पोलिसपाटलाचा मुलगा आपला अनुभव सांगतो आहे. विटीदांडू खेळण्यात नेहमी दंग असणारा हा मुलगा.त्यांच्या विट्टी–क्लबात 'गया' नावाचा एक हरिजन पोरगा आहे. खेळात कमालीचा तयार एकदा हे दोघे खेळत असताना गयाचे बरेच डाव या मुलावर चढतात. पण हा डाव न देता पळून जाऊ लागतो. तेव्हा गया त्याच्या पाठीत दाडू हाणतो आणि स्वत.च घाबरून पळून जातो. पुढे हा मुलगा इंजीनियर बनून त्या खेड्याची पाहणी करण्यासाठी येतो. विटीदाडू खेळण्यासाठी त्याचे हात शिवशिवू लागतात. तो गयाला बोलावणं पाठवतो. ते दोघे गावाबाहेर जाऊन खेळतात; पण गया सारखा हरायला लागतो. इंजीनियर मनातल्या मनात खूष होतो. पण दुसरे दिवशी गावात विटीदांडूची मॅच असते. गयानं त्यात भाग घेतलेला असतो. इजीनियर दुरून हा खेळ पाहात असतो. त्या खेळातील गयाचं चापल्य आणि तडफ पाहून हा कमालीचा अस्वस्थ. त्याला कळून येतं की, काल गया माझ्याबरोबर खेळला नाही. त्यानं केवळ बहाणा केला. ऑफिसर म्हणून मी मोठा असेन पण खेळाडूच्या नात्यानं तो मला आपल्या बरोबरीचा मानत नाही. या बाबतीत मी त्याच्या सहानुभूतीलाच पात्र ठरणार. कथेतलं शेवटचं वाक्य आहे–'वह बडा हो गया है, मैं छोटा हो गया हूँ।' जिज्ञासूंनी ही 'गुल्लीडंडा' कथा (मानसरोवर भाग १) मुळातून वाचून पाहावी म्हणजे तिचे वाङ्मयीन सामर्थ्य प्रत्ययाला येईल.

अशीच त्यांची 'ईदगाह' नावाची कथा आहे. बालमानसशास्त्र आणि जीवघेणी गरिबी याचं अत्यंत प्रत्ययकारी चित्रण या कथेत आढळतं. आईवडिलांना पारखा झालेला पाच वर्षांचा हमीद, आपल्या आजीजवळ, अमीनाजवळ राहतो घोर दारिद्र्य, ईदचा सण आलेला. सर्व बालगोपाल नटूनथटून जवळच्या शहरातील जत्रेला जाणार. हमीदलाही जायचय. आजी त्याला फक्त तीन पैसेच देऊ शकते (काळ १९३३). परंतु हमीदनं जत्रेतून खेळणं आणलं नाही. आपल्या आजीसाठी एक लोखंडी चिमटा आणला. तवा उतरताना आजीची बोटं भाजतात म्हणून ! कथेचा शेवट आहे–'आणि एक चमत्कार झाला, हमीदच्या चिमट्याहूनही विचित्र असा. बालक हमीदनं म्हाताऱ्या अमीनाची भूमिका घेतली. म्हातारी अमीना छोटा हमीद बनली. अश्रू ढाळीत पदर पसरून ती हमीदला दुवा देऊ लागली. हमीदला हे कोडं कसं उलगडणार ?' जागतिक पातळीवर श्रेष्ठ ठरावी अशी ही लघुकथा आहे.

## दोन अपूर्व कथा

प्रेमचन्दाची 'कफन' ही कथा तर त्यांच्या कीर्तिचा कलशाध्यायच ठरलेली आहे. कठोर वास्तवाचं कमालीच्या तटस्थतेनं केलेलं चित्रण हे या कथेचं वैशिष्ट्य. हिंदीतील नवकथा 'कफन'चं ऋण मानायला विसरत नाही. एका खेडेगावातील घीसू आणि माधव या हरिजन पिता–पुत्राची घोर दारिद्र्यामुळं मेलेली मनं हा या कथेचा विषय. कुठलही काम न करता आकाशवृत्तीनं जगणं हा या दोघाचा शिरस्ता. अगदी माधवची बायको बुधिया झोपडीत प्रसूति-

वेदनेनं किंचाळत असताना हे शांत मनानं शेजारच्या शेतातून चोरून आणलेले बटाटे भाजून खात बसले आहेत. कुणीही आत जायला तयार नाही. कारण तोपर्यंत दुसरा जास्त बटाटे खाईल ! बुधिया मरते तेव्हा गावातून पैसे गोळा करून हे दोघे कफन (प्रेतवस्त्र) आणायला निघतात. पण त्यांना कोणताच कपडा पसंत पडत नाही. शेवटी (जणू पूर्वी ठरल्यागत) हे दारुच्या गुत्त्यात शिरतात आणि भरपूर खातात आणि पितात. उरलेलं अन्न माधव भिकाऱ्याला देतो आणि 'देण्या'चा आनंद आयुष्यात पहिल्यांदा अनुभवतो. वास्तवाचं विदारक चित्रण करणारी शेतकरी जीवनावरची त्यांची 'पूस की रात (पौषाची रात्र), हीही एक अत्यंत चटका लावणारी लघुकथा आहे. या कथेत भारतीय शेतकऱ्याच्या दुर्दैवाच अल्पाक्षर रमणीय शैलीत चित्रण आहे. हल्कूनं रात्री पिकाची राखण करताना घोगडी हवी म्हणून किडुकमिडुक करून तीन रुपये बायकोकडे ठेवले आहेत. परंतु सावकाराचा तगादेवाला येतो आणि हल्कूला रात्रभर कुडकुडत राहण्याची पाळी येते. आपल्या कुत्र्याशी गप्पा मारत, त्याला कवेत घेत वेळ काढण्याचा प्रयत्न करूनही तो थकतो आणि शेवटी वाळक्या पानाची शेकोटी करुन झोपून जातो. सकाळपर्यंत शेत जनावरानी फस्त केलेलं असतं चिडलेल्या बायकोला हल्कू म्हणतो; 'बरं झालं उद्यापासून थंडीत राखण तरी करावी लागणार नाही.' या कथेच्या मागे भारतातील सर्व शेतकऱ्यांच्या वेदनेची वैचारिक पार्श्वभूमी आहे. पण कथेच्या प्रकट स्वरूपात ती एक निखळ कलावस्तू म्हणूनच पेश झाली आहे. या महान लेखकामध्ये अशी अपूर्व शक्ती होती.

प्रेमचंदांचं शब्दसामर्थ्य असं जबरदस्त आहे की पात्रं, प्रसंग आणि कथेमागील भावभूमी आपल्या डोळ्यासमोर प्रत्यक्ष उभी राहतात त्यांच्या प्रतिमात्मक सामर्थ्याचं दर्शन 'ठाकुर का कुआं' (पाटलाची विहीर) या कथेत आपल्याला प्रकर्षानं घडतं. या कथेत 'एक गाव एक पाणवठ्या'ची समस्या इतक्या यशस्वीपणे साहित्यरुपात अवतरली आहे की, एकूण दलित साहित्यातील श्रेष्ठ कथामध्ये तिची गणना कुणीही करावी. ही अवघी साडेतीन पानाची कथा आहे. तिचं पहिलंच वाक्य पहा 'जोखूनं लोटा तोंडाला लावला आणि भपकन त्याच्या नाकात वास शिरला.' पुढं तो गंगीला म्हणतो, 'कसलं पाणी आणलयंस हे, इथं घशाला कोरड पडलीय आणि तू सडकं पाणी देतीयेस.'

गंगीनं अंदाज केला, जरूर कोणतं तरी जनावर विहिरीत मरून पडलं असेल. आता काय करायचं ? नवरा तर आजारी, त्याला चागलं पाणी द्यायला हवं. शेवटी रात्री नऊच्या सुमारास दबकत दबकत गंगी पाटलाच्या विहिरीवरून पाणी 'काबीज' करून आणायला निघते. लेखक वर्णन करतो, 'कथेतला राजकुमारदेखील अमृत चोरुन आणताना इतक्या सावधगिरीनं गेला नसेल. 'गंगी कळशी भरून घेणार इतक्यात पाटलाचं दार उघडतं. वाघाचा जबडा देखील इतका भयंकर नसेल. कळशी विहिरीतच सोडून गंगी धूम ठोकते आणि घरी येऊन पाहते तो जोखू तेच घाण पाणी पितो आहे.

या कथेचं यश हे की कथावस्तू अशी या कथेत नाहीच. एक जिवंत अनुभव आहे आणि तो लेखकान आपला संयम कुठेही ढळू न देता साक्षात उभा केला आहे.

प्रेमचंदाच्या ऐतिहासिक कथांमध्ये 'शतरंज के खिलाडी' ही फार वरच्या दर्जाची कथा आहे. ऱ्हास पावलेल्या मोगल साम्राज्याच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली कमालीची यशस्वी अशी ही उपरोधकथा ! सत्यजित रे यानी या कथेवर चित्रपट केल्याचं सर्वांना विदित आहेच. त्याचप्रमाणं सर्वसामान्य जीवनानुभवाच्या दृष्टीनं 'चोरी', 'बडे भाईसाहब' 'गिला' या त्यांच्या कथा अतिशय दर्जेदार ठरल्या आहेत 'गिला' (तक्रार) या कथेमध्ये आपल्या सुधारकी पतीबद्दल जुन्या वळणाच्या पत्नीनं आपली प्रेमळ तक्रार नोंदवली आहे. तिनं कृतककोपानं केलेलं स्वगत भाषण म्हणजे ही कथा. कथेच्या क्षेत्रात असे नवे प्रयोगही प्रेमचंदांनी केले आहेत. या व इतर अनेक दृष्टीनी प्रेमचंद हे आपल्या समकालीन हिंदी लेखकांपेक्षा किती तरी पुढे होते, हे लक्षात येतं.

## सद्‌गति—कथा आणि चित्रपट

'सद्‌गति' ही कथादेखील लेखकाच्या एकूण वाङ्मयीन कर्तृत्वाच्या दृष्टीनं एक प्रातिनिधिक कथा आहे. तत्कालीन दलित समाजाच्या दारुण परिस्थितीवर विदारक प्रकाशझोत टाकणारी ही कथा आहे. आजही या परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. त्यामुळं ही कथा विसाव्या शतकातील भारतातील सामाजिक संबंधाची एक प्रातिनिधिक कथा ठरते. दुखी नावाचा चांभार हा या कथेचा नायक आहे. त्याला आपल्या मुलीचं लग्न करायचं आहे. लग्न चांगल्या मुहूर्तावर झालं नाही तर मुलीला सुख मिळणार नाही ही त्याची धर्मभोळी श्रद्धा. गावात पंडित घासीराम यांच्याशिवाय कोण मुहूर्त काढून देणार ? दुखी त्यांच्याकडं जायचं ठरवतो; पण त्यापूर्वी त्याच्या स्वागताची तयारी केली पाहिजे. झुरिया (दुखीची बायको) त्याला पाटील—वस्तीतून खाट आणायला सागते. त्यावर चिडून तो म्हणतो, 'वेडी की शहाणी ? अग, चिलीम पेटवायला जिस्तव मिळायची मारामार, जरा पाणी प्यायला मागितलं तर मिळायचं नाही आणि म्हणे खाट आण ! त्यांची खाट म्हणजे काय तुला आपल्या घरच्या गोवऱ्या—लाकडं वाटली की काय, कुणीही उचलून घेऊन जायला !'

पुढे लेखकानं पंडितजीचं वर्णन केलं आहे—'पंडित घासीराम म्हणजे महान भगवद्‌भक्त.. झोपेतून उठताच देवपूजेला लगायचे. मुखमार्जन होता होता आठ वाजायचे आणि मग खऱ्या पूजेला आरंभ व्हायचा. या पूजेतला पहिला टप्पा म्हणजे भांग घोटण्याची तयारी. पण अर्धा तास चंदन उगाळणं,... त्यानंतर पूजा—आरती वगैरे. तोपयत दहा वाजलेले असतात. पंडितजी पूजा आटोपती घेतात आणि भाग प्राशन करून सदरेवर येतात. या वेळपर्यंत दोन चार यजमान आलेलेच असत. ईशपूजेचं फल असं ताबडतोब मिळत असे. हीच पंडितजीची 'शेती' होती !' ........दुखीनं त्याना पाहिलं. आणि ती तेजस्वी मूर्ती पाहून त्याचं हृदय श्रद्धेनं भरून आलं. काय ते तेज ! छोटेखानी गोल—मटोल देह, तुळतुळीत डोकं, गोबरे गाल आणि ब्राह्मतेजानं तळपणारे डोळे !'

आपल्यातर्फे कसलीही शेरेबाजी न करता लेखकानं योग्य तो परिणाम कसा साधला आहे हे वर दिलेल्या एक—दोन. नमुन्यावरून लक्षात येईल. पुढं या कथेत पंडितजी त्याला संध्याकाळी येईन असं सागून सारवणे,

झाडणे, लाकूड फोडणे असली कामं एका मागून एक फर्मावतात आणि म्हणतात ही कामं कर तोपर्यंत मी जेऊन घेतो, मग थोडी विश्राती घेतो आणि मग तुझ्याकडे येतो.' अशा प्रकारे या कथेमध्ये लेखकानं पंडितजीच्या रूपानं उच्चवर्णीय शोषक समाजाचं एक प्रातिनिधिक चित्र उभ केलं आहे. मुलीच्या कल्याणासाठी उपाशीपोटी वेठीचं काम करणाऱ्या दुखीबद्दल कणाचीही सहानुभूती पंडितजी किंवा त्यांची बायको यांना वाटत नाही. चिलीम पेटवण्याकरिता तो विस्तव मागायला घरात येतो त्यावर तो घरात कसा शिरला याच गोष्टीचा पंडिताइनला राग येतो. ती डोक्यावर पदर ओढून विस्तव फेकणे त्यातला एक तुकडा त्याच्या डोक्यावर पडतो, पण त्याची तिला काहीच पर्वा वाटत नाही. शेवटी लाकडाची गाठ फोडण्याच्या प्रयत्नांत भूक–तहानेनं व्याकूळ झालेला दुखी भोवळ येऊन पडतो आणि गतप्राण होतो. त्याला चिलीम देऊ करणाऱ्या गोंडानं हे सर्व पाहिलेलं असतं. तो दुखीच्या जातवाल्यांना ताकीद देतो की, कुणोही प्रेताला हात लावायचा नाही ! नाही तर पोलीस तुम्हाला पकडतील ! शेवटी दुखीची बायको आणि काही स्त्रिया खूप रात्र पडेपर्यंत आक्रंदन करतात आणि निघून जातात. त्याचं रडणं ऐकून ब्राह्मणवस्तीतील भूदेवाची झोपमोड व्हायला लागते. पंडिताईनला तर एव्हानाच प्रेताची दुर्गंधी यायला लागते. पंडितजी यावर भाष्य करतात, 'चांभाराचं प्रेत आहे ना ते ! भक्ष-अभक्षाची काही परवा असते का या नालायकांना !' कथेच्या शेवटी पडितजी दुरून प्रेताच्या पायात दोरीचा फास अडकवतात आणि ते ओढत ओढत नेऊन वेशीच्या बाहेर टाकून देतात. घरी येऊन लगेच स्नान करतात, दुर्गापाठ करतात आणि सर्व घरभर गंगेचं पाणी शिंपडतात !

सत्यजित रे यानी या कथेला चित्रपटरूप देताना आपल्या परीनं मूळ कथेला न्याय देण्याचा प्रयत्न केला असला तरी घटना व व्यक्तिरेखा यांच्या तपशिलाच्या दृष्टीन पाहिल्यास ते मूळ कथेपासून दूर गेले आहेत असं जाणवतं. मूळ कथेत हे तपशील पुढील-प्रमाणे आढळतात :–

लेखकानं एकीकडं पंडितजी व पंडिताइन यांचा दांभिकपणा, स्वार्थ, दुष्टता, उग्रपणा आणि दुसरीकडं दुखीचा धर्मभोळेपणा, सेवाभाव, लाचारी आणि पिढ्यान-पिढ्या रक्तात मुरलेली अपराधी भावना यातील विरोध टोकदारपणे चित्रित करून ट्रॅजेडीची परिणामकारकता वाढवली आहे; परंतु चित्रपटातले पंडितजी पुरेसे उग्र वाटत नाहीत. या संदर्भात पडितजीच्या हिंदी उच्चारांकडे ( जाणकाराकरवी ) रे यांनी का लक्ष पुरवले नाही किंवा 'वासांसि जीर्णानि 'च्या श्लोकात 'गुण्हाति' असा उच्चार त्यांचा ढोंगीपणा सूचित करण्याकरिता मुद्दाम ठेवला किंवा कसे हे सामासिक (मार्जिनल) मुद्दे आहेत. मुद्दा आहे व्यक्तिरेखेचा ! पंडितजीच्या बाह्य व्यक्तित्वाचं वर्णन मूळ कथेत असं आहे – 'छोटासा गोल–मटोल आदमी, चिकना-सिर, फूले (गोबरे) गाल, ब्रह्मतेज से प्रदीप्त आँखें ।' या भटजीच्या डोळ्यातलं ब्राह्मतेज म्हणजे त्यानं आणलेलं उसन अवसान आहे आणि ते बटबटीतपणे प्रकट झालं पाहिजे हे यावरून कळून येतं. हाही मुद्दा क्षणभर बाजूला ठेवून पंडिताची स्वभाववैशिष्ट्यं पाहिल्यास मूळ कथेतला पंडित वेगळा वाटतो. एक तर तो शीघ्रकोपी आहे. दुखीच्या घरी त्याच्या आगमनाची पूर्वतयारी होत असताना दुखीची बायको म्हणते, "अहो, पण त्यांना शिधा द्यावा लागेल ना ! आपल्या ताटातून दिला तर चालेल ना ?" यावर दुखी म्हणतो, "छे, छे ! भलतंच ! असलं काही करू नकोस. बाबाजी थाळी उचलून आदळतील ! त्यांना फट म्हणता राग येतो. एकदा का रागात आले की, बायकोची देखील गय करीत नाहीत ! आपल्या पोराला एकदा इतका चोप दिला यानं की अजून दुखरा हात घेऊन हिंडतोय !"

मूळ कथेतल्या वर्णनातून आपल्याला हे जाणवतं की, हा गृहस्थ नंबर एकचा दांभिक, स्वार्थी, निर्दय, अहंकारी, गरिबाच्या धर्मभावनेवर आपली पोळी भाजून घेणारा आहे आणि माणुसकीची किंमत देऊन पै–पैची बचत करणारा आहे. दुखीला त्यांनी जे गाठीचं लाकूड फोडायला सांगितलं आहे त्याबद्दल कथेत एक सूचक वाक्य आहे – 'या लाकडावर आजवर अनेक भक्तानी आपली शक्ती पणाला लावली होती.' पंडित जेवायला बसलेला असताना दुखी विस्तव मागायला येतो तेव्हा घर भ्रष्ट झाल्याची तक्रार करणाऱ्या बायकोला हा म्हणतो, 'अग, काम तर आपलंच करतोय ना ! कुणी मजूर असता तर चार आणे (त्या काळातले) मोजावे लागले असते !' यावरून हा भटजी किती चिकट आणि दयाहीन आहे हे लक्षात येते. चित्रपटात हा संवाद आहे; पण त्यामागच्या हलकटपणाचं संप्रेषण (कॉम्युनिकेशन) पुरेसं झालेलं नाही.

## ज्वारीचे रोडगे

तसंच 'पंडिताइन 'ला दुखीवर काहीशी दया आल्यामुळं ती नवऱ्याला सांगते – "या प्राण्याला थोड खायला द्या. बिचाऱ्याला भूक लागली असेल !" यावर प्रेमचंदांचं वाक्य काय आहे पाहा – "पंडितजीने इस प्रस्ताव को व्यावहारिक क्षेत्र से समझकर पूछा – रोटियाँ हैं ? " अर्थ हा की बायकोची ही सूचना आपल्या एकूण व्यवहारज्ञानाच्या चौकटीत बसते आहे, हे कळल्यावरच तो या गोष्टीला तयार होतो. त्याचच एक पुढचं वाक्य आहे – "पातळ फुलक्यानी या हलकटांचं पोट भरत नाही. याना ज्वारीचे रोडगेच हवेत !"

या सर्व वर्णनावरून पंडिताचं जे रूप मनात साकारतं, त्याचं दर्शन चित्रपटात किती प्रमाणात होतं हा प्रश्न आहे. प्रेमचंदांनी पंडिताचं व्यक्तिरेखाटन चोख, एकजिनसीपणानं केलं आहे. त्यात अंतर्विरोधाला कणाचीही जागा सोडलेली नाही ! तुलनेच्या आणखी एका मुद्द्यावरून हे स्पष्ट होईल. दुखी मरतो तेव्हा ही बातमी हां हा म्हणता गावभर पसरते आणि चांभारवस्तीतही गोंडाकरवी पोचते. तो सर्वांना एकत्र करून वॉर्निंग देतो, – "मुडदा उचलायला जाल तर खबरदार ! आता पोलिसचौकशी होईल. ... मुड्याला हात लावाल तर पकडले जाल !"

यानंतर लगेच पंडितजी तिथं पोचतो. त्याला तिथच सोडून दुखीचा बायको कपाळावर हात मारीत आणखी सात-आठ बायाच्या बरोबर जाते आणि पडिताच्या दारी येऊन धाय मोकलून रडू लागते. इकडं पडितजीन खूप धमकावणी दिली, समजूत काढली आणि शेवटी विनवण्या केल्या (बहुत धमकाया, समझाया, मिन्नत की) तरीही कुणी हलला नाही !

कथेतून हा समरप्रसंग जसा डोळ्यांसमोर उभा राहतो तसा चित्रपटात उभा राहात नाही. चित्रपटामध्ये दुखीच्या मृत्यूची बातमी खुद्द पंडिताच्याकरवी सागण्यात आली आहे. अपराधी चेहऱ्यानं तो तियल्या बायांना एक–दोन पुसटत्या वाक्यांत या बातमीचं फक्त रिपोटिंग करतो. यावरून मूळ कथेतील तपशिलाशी फारकत तर दिसतेच; पण एकूण व्यक्तिरेखेच्या सेंद्रियतेला तडा जातो. 'सद्गति' या कथेतील व्यक्तिरेखा लाभलेला पडित अपराधी आवाजात बोलूच शकणार नाही. प्रथम तो स्वत.हून सागायला जाणारच नाही आणि जेव्हा सागेल तेव्हा धमकावणीच्या स्वरात प्रेत उचलायचा हुकूम देईल! समस्त सामाजिक परकोटयाचं भक्कम संरक्षण लाभलेल्या ब्रह्मवृन्दाचा तो प्रतिनिधी आहे. त्यानं त्या लोकाची समजूत काढणं आणि विनवणी करण हे सूर्याची पिल्लं दिसल्यामुळं आलेलं आहे. तर अशा प्रकारे मूळ कथेशी फारकत घेऊन दिग्दर्शकानं कोणती कलात्मकता साधली आहे, कळत नाही. बर, पडिताला दयाळू दाखवला आहे म्हणावं तर उपाशी पोटी लाकूड तोडणाऱ्या दुखीला दुरून ( मूळकथेत जवळ उभा राहून ) जोर जारात हात चालवायचा हुकूम देत राहिलेला पडितही आपल्याला चित्रपटात दिसतो.

## शेवटचा प्रसग

पडिताच्या मनात हरिजनाबद्दल जो द्वेष भरून राहिला आहे त्याच प्रत्यतर लघुकथेच्या शेवटच्या प्रसगातून येते आणि सागायच म्हणजे दिग्दशकानं हा प्रसग चित्रपटातून कटापच करून टाकला आहे. तो प्रसग असा – मध्यरात्रीपर्यंत झुरिया आणि इतर बायका हुबरडा फोडीत राहिल्या. इथे लेखकानं एक थेलकं वाक्य टाकलं आहे– भूदेवाना (=ब्राह्मणमंडळीना ) झोप लागण कठीण होऊन बसलं!

पडिताइन म्हणते– 'आतापासनं घाण यायला लागली हो!'

पंडित म्हणतो– 'चामार होता ना लेकाचा. भक्ष–अभक्षाचा काही विधिनिषेध असतो का या नालायकाना ?'

पंडिताइन–' पण मी म्हणते या बायांना किळस कशी येत नाही ? '

पडित – 'सगळे भ्रष्ट आहेत अन् काय?'

हा प्रसग एकूण कथेतील विरोधाला किती टोकदार करून टाकतो हे वेगळं सागायची गरज नाही.

पंडितजीच्या संदर्भातील जाता जाता सुचलेला आणखी एक गौण मुद्दा सांगून या मुद्द्यापुरतं थाबावं. चित्रपटातले पंडितजी घरी आलेल्या ' यजमाना'ना गीतेतील श्लोकावर प्रवचन देतात. एक तर प्रवचानचं चित्रण अगदी बेंगरूळ झालं आहे. कारण ३–४ डोक्याच्यासमोर ' वासासि जीर्णानि'चं प्रवचन म्हणजे लुटपुटीचं वाटतं. दुसरं असं की, खेडेगावातील यजमान माणस भटजीकडं कशासाठी जातील ? मुहूर्त विचारायला, हरवलेली गाय सापडेल का हे विचारायला किंवा जन्मपत्रिका बनवून घ्यायला किंवा भविष्य विचारायला वगैरे. चित्रपटातला वरील प्रकार जास्त प्रायोगिक वाटला.

आता चित्रपटातील काही इतर बाबीबद्दल थोडक्यात बोलून थाबायचं आहे.

१) पंडितजीप्रमाणेच दुखीची व्यक्तिरेखा लेखकानं कसून रेखाटली आहे. दुखीला आपल्यावर अन्याय होतो आहे याची जाणीवच स्पर्श करीत नाही. हे असच चालायचं, हे त्याच्या मनानं पक्क घेतलं आहे. असं का म्हणून विचारायची त्याला जरूरच वाटत नाही. म्हणून विस्तव देण्याच्या वेळचा भट पति–पत्नीतील तिखट संवाद ऐकून कथेतला दुखी स्वतःलाच दोष द्यायला लागतो. त्याचं हे स्वगत आपल्या काळजाला जाऊन भिडतं पण चित्रपटात या सवेदनेचा उपयोग करून घेण्यात आलेला नाही.

२) वाण्याकडून शिध्याचं सामान आणायच्या बाबतीत दुखी झुरियाला सूचना देतो की, तू स्वतः सामान आणू नकोस. तू आणलेलं त्यांना चालणार नाही. गोंडाच्या पोरीला बरोबर घे. सामान तिच्याकडे दे. या बारकाव्यातून लेखकानं अस्पृश्यतेचे अदृश्य सूक्ष्म पदर कसे खोल खोल रुतलेले आहेत याचं सूचन केलेल आहे. पंडिताला झुरियान आणलेलं सामान चालत नाही, पण गोंडान शिवलेलं चालतं. यातील तर्कहीनते कडं लेखकाल लक्ष वेधायचं आहे. चित्रपटात या तपशिलाकड दुर्लक्ष झालं आहे.

३) दुखीच्या मृत्यूनंतर चित्रपटात 'इफेक्ट' निर्माण करण्याकरिता पाऊस पाडला आहे, पण याची जरूरी खरोखरीच इतक्या कलात्मक निकडीची होती काय ? हा अगदी शांताराम–टच वाटतो.

४) चित्रपटात झुरिया एकटीच पंडिताच्या घरी येते. प्रेमचंदानी मात्र तिच्याबरोबर आणखी सात–आठ बाया दिल्या आहेत. कुठल्याही 'वस्ती'च्या लोकरीतीच्या दृष्टीनं हेच जास्त स्वाभाविक वाटतं. नवऱ्याचा आकस्मिक मृत्यू, रात्रीची वेळ, अशा स्थितीत दिग्दर्शकाच्या आदेशाशिवाय ती एकटी जाणार नाही.

५) ब्राह्मण वस्तीत हरिजनाचं प्रेत पडलेलं आहे; आणि तेही विहीरीकडे जाण्याच्या रस्त्यावर. लोकांनी तो रस्ताच वर्ज्य केला आहे. आणि एक म्हातारी पंडितजीला विचारते आहे,– 'अहो तो मुडदा हलवताय ना ? गावातल्यांनी पाणी प्यावं म्हणताय का नाही ? या छोटयाशा प्रसंगातून कथेच्या परिणामाला गडदपणा प्राप्त झालेला आहे. परंतु चित्रपटात हा प्रसंग आलेला नाही.

६) दुखीच्या मृत्यूची बातमी ऐकून सैरभैर होणाऱ्या झुरियाच्या मागं चांभार वस्तीत एवढी गाईगुरं एकदम कशी उगवली या 'इफेक्ट'ची खरोखरीच गरज होती का?

७) आता शेवटचा मुद्दा; मात्र किंचित विस्तारानं. आतापर्यंतच्या विवेचनात प्रेमचंद साहित्याचे एक लक्षणीय, विलोभनीय असे वैशिष्टय सागायच राहून गेलं. त्याच्या साहित्याला मिश्किलपणाचं आणि उपरोधाच लेण लाभलेलं आहे. प्रेमचंदाच्या साहित्य मैफलीतील जणू तो तानपुऱ्यासारखा जाणवणारा समातर स्वप्न-प्रवाह आहे. या उपरोधिकतेन त्याच्या वाङ्मयातील अश्रूला रोखून धरलं आहे. वाचकाला अस्वस्थ आणि अन्तर्मुख करण्यास त्याच्या या वैशिष्टयाचा उपयोग झालेला आहे. भारतीय समाजातील यच्चयावत दुःखिताच्या ( त्यात शेतकरी, दलित, विधवा, विवाहिता, गरीब आणि श्रीमत सुद्धा आले) दु.खाकडं आणि जीवनातील विसगतीच्याकड हा लेखक तटस्थ झाल्याच्या नजरेनं बघत आहे आणि उपरोधिक शैलीतून तिचं बाह्यात्कारी रूप आपल्यापुढ ठेवत आहे. या लेखाच्या पूर्वार्धात सोदाहरण उल्लेखिलेल्या लघुकथामध्ये तर लेखकान आपल्या बाजूनं एकही 'रिमार्क' दिलेला नाही. फक्त चित्र समोर ठेवून तो बाजूला राहिला आहे. 'सद्गति' कथा वाचताना लेखकाच्या या वैभवाच जे दर्शन आपल्याला घडत तिचं प्रत्यतर चित्रपटातून प्राप्त होत नाही. उदाहरणार्थ,

(अ) हीच पंडितजीची 'शेती' होती हा उल्लेख, (आ) गोंडाच्या मुलीला बरोबर घेऊन सामान आणायला सांगण्याची खबरदारी दुखी घेतो, (इ) भांग घोटणं हा पूजेचाच भाग होता हा उल्लेख, (ई) अनेक भक्तांनी या लाकडावर आपली शक्ती पणाला लावली होती हा उल्लेख, (उ) प्रेताच्या संबंधी पंडित व त्याच्या बायकोतील संवाद इत्यादी. अशा प्रकारचा उपरोध क्ष-किरणाप्रमाणे सत्याचे स्वरूप उघडं करतो आणि रसिकाला एक आगळी जीवनानुभूती मिळवून देतो. चित्रपटाद्वारे दर्शकाच्यावर अशा प्रकारचा काही परिणाम घडून येतो असे जाणवले नाही. पंडितजीचं उठणं, बसणं, बोलणं वागणं या सर्वांतून त्याचं काळं रूप जसं कथेतून जाणवतं तसं चित्रपटातून जाणवत नाहीत.

एकूण तोलामोलाची साहित्यकृती आणि तिचं पडद्यावरचं दर्शन सर्वस्वी समाधानकारक असणं हा वाक् आणि अर्थ याच अद्वैत जमून येण्यासारखा दुर्लभ योग असतो. अस्सल कलाकृतीचं काही एक सेंद्रिय संपूर्णत्व, एक प्रकारचा एकजिनसी रूपबंध असतो. नृत्यात भलताच अंगविक्षेप रसहानिकारक वाटतो, संगीतातील बेसूरपणा व बेतालपणा आस्वादाला बाधक ठरतो. कलामध्ये कृत्रिम ठिगळांना वाव नसतो. साहित्यकृतीचं ही असंच आहे. एखादी लघुकथा तेव्हाच सुफलित होते जेव्हा तिला ही सेंद्रिय एकात्मता प्राप्त झालेली असते. ती त्याच मनोभूमिकेतून 'ॲप्रीशिएट' करणे आवश्यक असते. एका तालेवार दिग्दर्शकानं 'सद्गति' ही कथा स्वीकारली याचा आनंद व अभिमान वाटतो पण हा प्रयत्न याहीपेक्षा त्याला यशस्वी करता आला असता याबद्दल यत्किंचितही शंका वाटत नसल्यामुळं मन खट्टू होत. आणि असा एक विचार मनाला चाटून जातो की, रेबाबूंनी प्रेमचंदांच्या इंग्रजीत अनुवादित झालेल्या काही रचनावरच संतुष्ट न राहाता मूळ हिंदीतून बराचसा प्रेमचंद बघितला असता (हे का त्यांना अवघड होतं?) तर किंवा कम-से-कम 'सद्गति' तरी तिच्या मुळातील बारकाव्यांसह अभ्यासली असती तर विभूतीभूषण भट्टाचार्यांची कादंबरी आईच्या भाषेतून वाचल्यामुळं 'पथेर पाचाली'मध्ये त्यांना जे यश मिळालं ते 'सद्गति'मध्येही मिळालं असतं. □

# श्रमिक संघटना

पृष्ठ ३ वरून

व श्र. सं एकच होती) जंगलाच्या पडित जमिनीसाठी सत्याग्रहाचे आंदोलन केलेले नाही आणि या आंदोलनामध्ये एकजुटीने सर्व आदिवासी, भूमीहीन शेतकरी भाग घेत. सरकारी आश्वासनातून जमीन मिळत नाही. सत्याग्रहाने देखील जमीन प्रत्यक्ष वाटपाला निघत नाही म्हणून फॉरेस्टवाल्यांना व गावातील कारभाऱ्यांना लाच न देता हिंमतीने आपसात वाटून जमीन कसायचा निर्णय घेऊन आदिवासींनी जमिनी कसून पीक घ्यायला सुरुवात केली. पिंपराणी गावातही श्र. सं. ला मानणारे लोक होतेच. फक्त एकदा आदिवासी स्त्रियानी पिंपराणी व इतर गावात मोर्चाने जाऊन दारुची मडकी फोडून टाकली होती दारुच्या बाबतीत शहादे तालुक्यात अनेक गावाना 'सप्लाय' केन्द्र म्हणून उपयोगी पडणारे पिंपराणी गाव आहे. तिथली दारू श्र. स च्या स्त्रियांनी खलास केल्याचा राग पिंपराणीतील कारभारी मडळीना आला होता. पण ही घटना सोडली तर आदिवासीच्यात काम करणाऱ्या श्र सं. नेचे पिंपराणी किंवा इतर गावातील आदिवासीशी कधी वितुष्ट आले नाही.

पण १९७९ सालापासून भारतीय कष्टकरी संघटनेच्या नावाखाली लक्ष्मण कदम, डॉ टाटीया या मंडळीना एकाएकी स्फुरण चढले. पिंपराणीजवळची जमीन फक्त भिल्लांनाच मिळाली पाहीजे, आदिवासीच्या पावरा, धानका, इत्यादी इतर जमातीना नको अशी जमातवादाला शोभणारी भूमिका घेऊन या तथाकथित भारतीय कष्टकरी संघटनेच्या पुढाऱ्यानी पिंपराणी व इतर एकदोन गावातील लोकाना बिचकावले. श्र स. नेते तर प्रामुख्याने प्रथमपासून भिल्ल आहेतच पण कोणतीही जातजमात, धर्म असा फरक न करता वर्ग म्हणून गोरगरिबाना सघटित करण्याचे श्र सं नेचे मार्क्सवादी धोरण असल्याने पावरा, धानका व इतरानाही भिल्लाबरोबरच या पडीत जमिनीच्या मागणीसाठी श्र. सं ने आंदोलनात उतरवून जमिनी कसल्या होत्या. पण जमातवाद हे फूट पाडण्याचे जालीम औषध असल्याने त्याचा वापर भा. ज. प. च्या ह्या पुढाऱ्यांनी केला यात आश्चर्य वाटायला नको यामधून आदिवासी आदिवासीत भांडण सुरु करण्यात एका मर्यादेपर्यंत हे पुढारी यशस्वी झाले हे मान्य करावेच लागेल त्याचबरोबर आदिवासीच्या आपसातील खाजगी भांडणाना राजकीय रंग फासून, त्या भांडणाचा फायदा म्हणून काही आदिवासीना खेचून घेण्यातही हे पुढारी यशस्वी ठरले.

असा हा भारतीय कष्टकरी संघटनेच्या गौरवाच्या इतिहासाचा प्राध्यापकांनी अंधारात ठेवलेला भाग आहे. भारतीय कष्टकरी संघटनेने 'संघर्षाबरोबरच विकास आणि रचनात्मक कामाच्या माध्यमाने नवा विश्वास निर्माण केला आहे' तो असा आहे!

श्र सं. नेला 'विकास व उत्थान' मान्य नाही. 'कारण आदिवासी माणूस शिकला व पुढारला तर त्याला कायमचे संघर्षाचे हत्यार बनविता येणार नाही, ही श्र. सं ची भीती आहे' वगैरे मालमसाला प्राध्यापकानी चपखलपणे वापरला आहे. परंतु आश्रमशाळांची मागणी करण्यासाठी शहाद्यास लहान मुलामुलींचा पहिला मोर्चा श्र. सं ने काढला. अक्कलकुवा तालुक्यातील पहाडी भागात दोन गावात तरूण मडळीच्या मुलानी शाळा चालविल्या, तंत्रशाळाची मागणी करून नाशिक शहर दुमदुमून सोडले (महा. राज्य. आदि. परिषद, नाशिक), दरवर्षी आश्रमशाळेतील भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवून मुलामुलींना दाखल करून घेण्यास भाग पाडले आणि मुख्य म्हणजे 'माणूस' म्हणून हक्काने जगण्यासाठी जागृत करण्याचे शिक्षण रोज चालू आहे, या गोष्टी प्राध्यापकाच्या रचनात्मक अगडबंबात बसत नसाव्यात.

आणखी एक मुद्दा. 'श्र. सं. च्या १०-१२ बाहेरून आलेल्या पूर्णवेळ कार्यकर्त्याशी लक्ष्मण कदम एकटा लढतो आहे'! एक तर बाहेरून 'वगैरे शब्द राष्ट्रीय एकात्मतेच्या शीर्षकाखाली प्राध्यापक उपस्थित करतात यावरून त्यांची राष्ट्रसकल्पना शहादे भागातील मातब्बर मालदाराच्या मेंदूपलीकडची नाही दुसरे असे की वाहरू सोनवणे, गुलाब ठाकरे, रूपसिंग शेवाळे, चंदरसिंग, नारायण, प्रदीप मोरे, रायसिंग, विठ्ठल पटेल, हिरकणी सोनवणे, जयसिंग माळी हे श्र सं. चे कार्यकर्ते बाहेरचे आहेत काय? श्र. सं. नेचे उरलेले शहरातून मध्यमवर्गातून आलेले कार्यकर्ते हे जर बाहेरचे असतील तर मग 'एकटा लढणारा' लक्ष्मण कदम कुठला आहे? या एकट्या लढवय्यामागे असणारे भाजप व शेतकरी संघटनेचे शरद जोशी), डॉ. टाटीया कुठले आहेत? प्रा. पांडेंची शेतमजूर व शेतकऱ्यांची एकजूट करण्याची कल्पना (भारतीय कष्टकरी सघटना व शेतकरी संघटना) भ्रामक नसून धोकेदायक आहे एवढेच आम्हाला सागायचे आहे. □

रंगभूमी

# शनिवार–रविवार

'महानिर्वाण, महापूर, बेगम बर्वेच्या यशा-नंतर सतीश आळेकराचे एक साधे, सोपे, सरळ नाटक' ही जाहिरात वाचून मला आश्चर्याचा एक तीव्र झटका येऊन गेला. त्यात 'बेगम बर्वे' च्या बाबतीत 'यश' चा उल्लेख केल्याचाही थोडासा भाग होता. तर या झटक्यातून प्रकृती थोडीशी सुधारल्यानंतर मी नाटकाला जाण्याचे धाडस केले.

नाटकाचे लेखक–दिग्दर्शक सतीश आळेकरानीच सांगितल्याप्रमाणे हे नाटक म्हणजे एक happening आहे. पस्तिशी–चाळिशीच्या दरम्यान पोहोचलेले एक मध्यमवर्गीय जोडपे. बारा वर्षे सर्व प्रकारचे प्रयत्न करूनही निपुत्रिक राहिलेले नवरा-ईश्वर (सतीश आळेकर) बँक–मॅनेजर–दिवसभर बँकेत काम करणारा, संध्याकाळी परतल्यावर पेग चढविणारा, मग बायकोबरोबर दररोज-प्रमाणेच झोपून सकाळी पुन्हा बँकेला जाण्याच्या तयारीत बायको–सुमन (शोभा पत्की) नवऱ्याला जेवण करून देऊन त्याची बँकेत पाठवणी केल्यानंतर 'कुल्ले वर करून मोहिनी अथवा बुवा वगैरे वाचत, आणि 'यूं हसरतों के दाग' ऐकत पडणारी, संध्याकाळी प्रथम अनिच्छेने नंतर आवडीने नवऱ्याला त्याच्या पिण्यात कंपनी देणारी आणि मग रात्री त्याच्याबरोबर झोपणारी, असे हे चाकोरीचे जीवन जगणारे जोडपे. सोमवार सकाळ ते शनिवार संध्याकाळ त्यांची ही चाकोरी चालूच! शनिवार संध्याकाळ ते रविवार संध्याकाळ हा या चाकोरीपासून वेगळा ठरणारा काळ! त्या काळातील कार्यक्रम वेगळा, कदाचित त्याचीही चाकोरी बनून गेलेली; पण ही पहिल्या चाकोरीपेक्षा वेगळी ईश्वर आणि सुमन यांच्या चाकोरी-बद्ध जीवनात असेच 'शनिवार-रविवार'-प्रमाणे वेगळे ठरणारे हे happening (म्हणूनच नाटकाचे नाव 'शनिवार–रविवार!') केवळ लग्नाच्या अपघाताने ईश्वर आणि सुमन एकमेकांना बांधले गेलेले, त्यात ते निपुत्रिक. स्वतःचे वैफल्य, ते लपविण्यासाठी दुसऱ्यावर दोषारोप करणे, त्यातून दोघांचे उडणारे खटके, या खटक्यामधून दुसऱ्याच्या मागावर राहून त्याला पकडण्याचा प्रयत्न, मधूनच सूर जुळत आहेत असे वाटून दोघांमध्ये निर्माण होणारी काहीशी जवळीक आणि दोघांच्या मनात एकमेकाच्या काल्पनिक लफड्याबद्दल निर्माण झालेला संशय अशा सगळ्या पार्श्वभूमीवर या जोडप्याच्या आयुष्यात दोन आगंतुक–intruders–येतात.–गंमत (चंद्रकांत काळे) आणि बबी टाकसाळे (मधुरा चुणेकर). त्यानंतर हे सगळे नाटक वास्तव आणि भास यांच्या दरम्यान तळयात–मळयात करीत राहते. नाटकाच्या अखेरीस ईश्वर (खरे म्हणजे सतीश आळेकर–ब्रेख्तच्या अलिप्ततावादाला जागून) नाटकाबाहेर येतो आणि संपूर्ण नाटकाचे इसापनीतील तात्पर्य सांगतो, 'बाबांनो, संसाराच्या सोन्याची माती होऊ नये, असे वाटत असेल तर हे संशयपिशाच्च चार हात लांब ठेवा बरे!' (या वेळी मला 'स्वर्ग नरक'नावाच्या हिंदी चित्रपटाची आठवण झाली. त्यातही हेच आळेकरी नाटक हिंदी फिल्मी फॉर्म्युला वापरून सादर केले होते आणि अखेरीस उतू जाणारे दूध वगैरे दाखवून हाच संदेश दिलेला होता!)

मिकी आणि मेमसाब, महानिर्वाण, महापूर आणि बेगम बर्वे या सतीश आळेकरांच्या आधीच्या चार नाटकांच्या पार्श्वभूमीवर 'शनिवार-रविवार'चा विचार करता या साऱ्या नाटकांमधून एकच आळेकरी नाट्य-सूत्र सापडते. जाहिरातीतील मजकुराला जागून 'शनिवार-रविवार'ला आळेकरांनी जोडलेले आधी उल्लेखलेले तात्पर्य हा एकमेव सोपेपणा सोडल्यास 'शनिवार-रविवार'-मध्येही आधीच्या नाटकांसारखीच आळेकरी गुंतागुंत सापडते. या सर्व नाटकांमधील एक समान सूत्र म्हणजे स्त्री-पुरुषामधील आकर्षण! ('बेगम बर्वे'मध्येही बर्वे 'तो' असला; तरी महत्त्व आहे त्याच्या बेगम-पणाला–स्त्रीपणालाच!)या आकर्षणाचे पैलू दाखवताना मनोविश्लेषण आणि मध्यमवर्गीय बूर्ज्वा संकल्पनांवर आघात (क्वचित प्रस्थापित मूल्यांची हेटाळणी आणि टवाळी) या दोन चाकांवरून स्वतःची अत्यंत छोटीशी कथा–खरे तर कल्पनाच पुढे नेणे असे या सगळ्या नाटकांचे स्वरूप. या आशयासाठी कधी कीर्तन (महानिर्वाण,), कधी मुलाखत ('महापूर'मधील history taking), कधी जुने संगीत नाटक (बेगम बर्वे) अशी बाह्य स्वरूपे आळेकरांनी बदलली असली तरी नाटकाचा आविष्कार हा भास आणि वास्तव यांच्या दरम्यान तळयात-मळयात करणारा असेच त्याचे सर्व नाटकामध्ये स्वरूप आहे. भासाचा आभास निर्माण करण्यासाठी आळेकरानी 'शनिवार-रविवार'मध्ये आधी उल्लेख केलेल्या गंमत आणि बबी या दोन आगंतुकांचा उपयोग करून घेतला आहे. या दोघांचे सुमन-ईश्वरच्या घरी होणारे अवेळी आगमन, त्यांची नाचती-गाती हालचाल, त्यांनी काही पटणाऱ्या, काही न पटणाऱ्या सांगितलेल्या घटना आणि दोघांचे अचानक निघून जाणे या साऱ्यामधून त्यांच्यावर वास्तवतेचा आरोप प्रेक्षक करू धजणार नाहीत.

तर हा सर्व प्रकार आळेकरांनी आपल्या नेहमीच्याच संवाद-पद्धतीने सजविला आहे. आळेकरी पद्धतीने केलेले विनोद, लग्न वगैरे विषयाना दिलेले आळेकरी तडाखे हे सगळे प्रकार या नाटकातही भेटतात.

नाटकात आळेकरानी 'ले दि प्रभू' अशी तिहेरी भूमिका उचलली होती. त्यांनी सादर केलेला ईश्वर, चंद्रकांत काळयाचा गंमत आणि शोभा पत्कीची सुमन या तिघानीही नाटकाच्या अभिनयखाती जमा केलेली सर्व ठेव एकरकमी खर्चाकडे वळविण्याचे कौशल्य मधुरा चुणेकरांनी दाखवले. खास उल्लेख करावासा वाटतो तो चंद्रकांत काळयाचा! आतापर्यंत 'यमूचे रहस्य'सारख्या एखाद्या एकांकिकेचा अपवाद वगळता चंद्रकांत काळे थिएटर अॅकॅडमीच्या नाटकामधून चमकले ते गायकी आणि अभिनयनाच्या दुहेरी जोरावर! 'शनिवार-रविवार'मधील तोतरा गंमत म्हणजे काळयाच्या गायकीवरील संकटच! पण त्याच्या वावळट मुद्रेसकट आणि गबाळ्या वेशासकट चंद्रकांत काळयानी या गमतीत जान आणली.

चटयासारख्या क्षुद्र वस्तूच्या साहाय्याने बँक मॅनेजरच्या सुखवस्तू घरकुलाचा सेट उभारल्याबद्दल नेपथ्यकार दिलीप मंगळवेढेकरांचे अभिनंदन!

–सदानंद बोरसे

चित्रपट

# बेमिसाल

एखाद्या सिनेमाचं नाव वाचल्यावर जसं तो सिनेमा आवर्जुन पहावासा वाटतो, तसं काही काही वेळेस सिनेमाच्या श्रेयनामावलीतली काही नावही आपलं नाव प्रकर्षानं वेधून घेतात. 'बेमिसाल' या सिनेमाच्या बाबतीत असे संयोग एकदम जुळून आलेले ! म्हणजे सिनेमाचं नाव छान, अमिताभ-राखी विनोद मेहरा ही छान छान नावं आणि त्याच्याच जोडीला दिग्दर्शक म्हणून हृषिकेश मुखर्जी याच नाव. हृषिकेश मुखर्जी म्हटलं की आपोआपच 'सत्यकाम', 'अनुपमा', 'आशीर्वाद', 'अभिमान', 'गुड्डी' असे एकेक, 'खूबसूरत' सिनेमे डोळ्यांसमोर उभे राहतात. त्यामुळे नकळतच उंचावलेल्या अपेक्षा घेऊनच आपण हा सिनेमा बघायला जातो. आतापर्यंतची चित्रपटव्यवसायातील कामगिरीची पार्श्वभूमी लक्षात घेता बेमिसाल हृषिदांच्या आतापर्यंतच्या करियरमध्ये 'बेमिसाल' ठरेल असं वाटत होतं, पण प्रत्यक्षात मात्र भलताच अपेक्षाभंग पदरी येतो.

'आमी शी ओ शोखा' या बंगाली सिनेमावर आधारित असलेल्या 'बेमिसाल'च्या कथेची नांदी होते काश्मीरच्या पार्श्वभूमीवर. काश्मीरच्या रम्य निसर्गात भटकताना सुधीर (अमिताभ बच्चन) आणि प्रशांतची (विनोद मेहरा) गाठ पडते कविताशी (राखी). मिल तेही आँखे दिल हुआ दिवाना किसीका' अशी दोघांची अवस्था होते. होता होता हे प्रेम लग्नाच्या पायरीपर्यंत येऊन धडकतं आणि इथेच या मित्राच्या त्यागाची पहिली कसोटी लागते. कारण सुधीर आणि प्रशांत मित्र असले तरी लहानपणापासून एकत्र राहिलेले असतात आणि त्यामुळे दोघांमध्ये राम लक्ष्मणाची जोडी फिकी पडावी असं प्रेम असतं. चोऱ्यामाऱ्या करणाऱ्या अनाथ सुधीरला लहानपणापासून प्रशांतच्या वडिलांनी (ओम पुरी) सांभाळलेलं असतं आणि ते कुठल्याही प्रकारचा भेदभाव न करता प्रशांतबरोबर सुधीरलाही मेडीकलचं शिक्षण देतात. त्यामुळे दोघेहीजण कविताला वेगवेगळ्या वेळेस गाठून सुधीर प्रशांतशी तर प्रशांत सुधीरशी लग्न करण्याचं प्रपोझल मांडतात. पण त्यातही सुधीर आपलं चोरीमारीचं पूर्वायुष्य कविताला सांगतो आणि त्याच्या आयुष्याची काळी बाजू उघडी करून दाखवतो. साहजिकच सुधीरच्या त्यागाचं पारडं खाली जातं. मग कविता फारसा विचार न करता प्रशांतशी लग्न करून मोकळी होते. लग्नानंतर प्रशांत उच्च शिक्षणासाठी अमेरीकेला जातो आणि तिकडून तो परत येतो तेव्हा पहिल्या सालस, सज्जन प्रशांतचा त्याच्यात कुठे मागमूसही राहिलेला नसतो! त्याच्यापुढे एकच ध्येय असतं—कमीत कमी वेळात जास्तीत जास्त पैसे मिळवायचे आणि श्रीमंत व्हायचं. त्यामुळे तो गर्भपात, सिझेरियन ऑपरेशन्स असे बेकायदेशीर मार्ग हाताळतो आणि पैशाच्या मागे लागताना या गोष्टींचा अतिरेक कुठे टाळावा हे न कळल्यानं पोलीसांच्या जाळ्यात अडकतो. हे सुधीरला कळल्यानंतर प्रशांतसाठी त्याग करण्याचा जसा काही आयुष्यभर मक्ता घेतला आहे, अशा थाटात सुधीरची धावपळ सुरू होते. प्रशांतविरुद्धचा सगळा पुरावा तो आपल्याकडे गोळा करतो आणि पोलीस स्टेशनमध्ये जाऊन आपणच गुन्हा केल्याचा कबुलीजबाब देतो. खानदानकी इज्जत वाचवतो आणि दहा वर्षांसाठी तुरुंगात जातो.

आता या सगळ्यात तीन तास कसे काय भरून निघणार ? किंवा हे सगळं फारच व्हेजिटेरियन झालं, तेव्हा तोंडीलावणं म्हणून थोडसं तरी नॉनव्हेज असावं म्हणून सुधीरचा भाऊ अधीर (अमिताभ बच्चन) आणि रवी दत्त (शीतल) यांचं एक उपकथानक यात घुसडलं आहे. रवीची शिकवणी घेणारा अधीर हा एक साधाभोळा मास्तर ! तर रवीचं लक्ष शिकवण्यापेक्षा इतर भलत्याच गोष्टीत असतं. पण अधीर वश होत नाही पाहिल्यावर ती त्याच्याविरुद्ध जाळं टाकते. या गोष्टीचा अधीरच्या मनावर परिणाम होतो आणि तेव्हापासून सुधीर रवीचा सूड घेण्यासाठी तळमळत असतो हा सूड पूर्ण झाल्यावर (या सूडप्रकारातही अनेक कच्चे दुवे आहेत) ते प्रकरण तिथच संपतं आणि मूळ कथानकाशी त्याचा काहीही संबंध राहात नाही. त्यामुळे मूळ कथानक म्हणजे एक फार मोठा पेच वाटतो.

सुरुवातीला टिपीकल हिंदी प्रेमकहाणीप्रमाणे चाललेली ही कथा इंटरव्हलनंतर बरीचशी भरकटत जाते. पहिल्यांदा हलकीफुलकी असणारी ही कथा नंतरच्या घटनांच्या गोंधळामुळे गंभीर होते. त्यामुळे या कथेत एकसूत्रीपणा किंवा एकसंघता राहात नाही. तसंच मूळ कथानकाशी संबंध नसलेलं उपकथानक (याद्वारे अमिताभच्या खात्यावर एक डबल रोल जमा करण्याचा मोह हृषिदानाही आवरलेला नाही) कारण नसताना लांबल्यामुळे कंटाळवाणं होतं. परदेशहून परत आलेल्या प्रशांतच्या स्वभावात इतका जमीन अस्मानाचा फरक पडतो, हे वास्तवाला धरून फारसं पटत नाही त्यापेक्षा त्याचा स्वभावाचा कल थोडासा असाच प्रकारचा आहे, याची थोडीशी झलक तरी सुरुवातीला कुठे तरी यायला हवी होती. सुधीर आणि प्रशांत इतके जीवलग दोस्त नर्सिंगहोमचे पार्टनर पण प्रशांतच्या बेकायदेशीर कृत्यांची कल्पना सुधीरला इतक्या शेवटी यावी हे खटकतं आणि या गोष्टीची आधी कल्पना असते म्हणावं तर तो मित्र कर्तव्यानं वेळीच प्रशांतला का आवरत नाही हे कळत नाही. असे अनेक छोटे छोटे कच्चे दुवे हृषिदांच्या चाणाक्ष नजरेतनं सुटावेत याचं आश्चर्य वाटतं.

पटकथेत फारसा जोर नसला तरी डॉ. राही मासूम रझा यांचे सवाद मात्र आकर्षक वाटतात,

यातली अमिताभची भूमिका मात्र नेहमीच्या 'अॅंग्री यंग मॅन'च्या ठराविक साच्यातील नाही वरून अगदी बेफीकीर असणारा पण आतून पूर्वायुष्याच्या कटू आठवणींनी उदास असलेला-अशी सुधीरची व्यक्तिरेखा काहीशी जॉली काहीशी गंभीर आहे. अर्थातच ती साकार करण्यात अमिताभ कुठेही कमी पडत नाही. अमिताभ—राखी—विनोद मेहरा या तिघांचीही वयं आता जाणवायला लागली आहेत आणि त्यामुळे सुरुवातीच्या प्रेमिकांच्या भूमिकेत ते फारसे सूट होत नाहीत. पण नंतर मात्र थोडेसे प्रौढ झाल्यानंतर ते योग्य वाटतात. रवी दत्त झालेली शीतल या नटीमध्ये फारसा दम नाही. 'बेमिसाल'च्या शूटींगच्या वेळी शीतलने या

चित्रपटात आपणच नायिका असल्याचं विधान केल्याने राखी आणि शीतल यांचं चांगलच वाजलं होतं. पण सिनेमा पाहिल्यानंतर या विधानात काहीच तथ्य नसल्याचं जाणवतं.

आर. डी. संगीतही या सिनेमात निष्प्रभ ठरल्याने संगीतही या चित्रपटाला तारू शकलेलं नाही. काश्मीरचं सौंदर्य टिपत कॅमेऱ्याने आपल्याला काश्मीरची सैर मात्र छान घडवून आणली आहे. राहता राहिलं दिग्दर्शन अगदी एखाद दुसऱ्या प्रसंगाचा अपवाद वगळता या चित्रटाचं दिग्दर्शन हृषिदांनी केलं आहे, हे मुद्दाम आठवायला लागतं. ◻

# चित्रपटाबाहेर....

नुकताच गांधीच्या जीवनावरचा चित्रपट पूर्ण झाला. आता त्यापाठोपाठच विठ्ठलभाई झवेरी निर्माण करीत असलेल्या जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनावरील डॉक्युमेंटरी फिल्मबाबत फिल्मी वर्तुळात चर्चा होत आहे. वास्तविक अशा प्रकारची डॉक्युमेंटरी फिल्म तयार करण्याची योजना दहा वर्षापूर्वीच आखली गेली व गेली दहा वर्षं विठ्ठलभाई झवेरी या डॉक्युमेंटरीसाठी विविध प्रकारचे कष्ट घेत आहेत. ही फिल्म तीन विभागात करण्याचा विचार असून पहिला भाग पूर्ण झाला आहे. यात १८५७ ते १९१७ या काळातील महत्त्वपूर्ण घटनांचा समावेश करण्यात आला आहे, स्वत: इंदिरा गांधीनी या फिल्मचा पहिला भाग पाहिला असून त्याबद्दल समाधान व्यक्त केलं आहे. दुसऱ्या भागात १९४७ पर्यंतचा काळ घेतला आहे. तर तिसऱ्या भागात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा काळ घेण्यात आला असून या भागाच्या चित्रिकरणाला लवकरच सुरुवात होईल. झवेरी यांनी आतापर्यंत अनेक तुरुंगामधून चित्रिकरण केलं असून नेहरूंच्या उपलब्ध आवाजाचाही यात फार मोठ्या प्रमाणावर वापर करून घेण्यात आला आहे. ◻

हिंदी सिनेसृष्टीत चान्स मिळावा यासाठी दाक्षिणात्य नटनट्यांचे कायमच प्रयत्न चाललेले असतात आणि कित्येकांनी हिंदी सिनेसृष्टीत आपलं बस्तान चांगलं बसवलं. पण कमल हसन आणि रती अग्निहोत्री या दोघा दाक्षिणात्य नटांना घेऊन काढलेल्या 'एक दूजे के लिए'नं एक वेगळीच हवा निर्माण केली. १९८१ चा सुपरहीट सिनेमा म्हणून हा सिनेमा गाजला. कमल हसन व रती अग्निहोत्री दोघांवरही ऑफर्सचा अक्षरश: वर्षाव झाला आणि हिंदीत कमल हसनला एवढी मागणी आहे, हे पाहिल्यानंतर दाक्षिणात्य निर्मात्यांनी कमल हसनची भूमिका असलेले एकेक दाक्षिणात्य चित्रपट हिंदीत डब करण्याचा धडाका लावला. या गोष्टीचा आपल्या करियरवर परिणाम होतो आहे, हे लक्षात आल्यानंतर कमल हसननं त्याच्या परवानगीशिवाय कोणीही त्याचे चित्रपट डब करू शकणार नाही, असं जाहिर करून टाकलं. पण तरीही 'निनयथाले इन्नी ककुम' हा कमल हसनची भूमिका असलेला चित्रपट डब करून 'प्यारा तराना' काढल्याच्या आरोपावरून या चित्रपटाच्या निर्मात्याविरुद्ध कमल हसननं कोर्टात दावा दाखल केला आहे. मद्रास हायकोर्टात दाखल केलेल्या खटल्यात या निर्मात्यानं फिल्मचे सगळे अधिकार खरेदी केले असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे कोर्टात निकाल लागेपर्यंत या चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालण्यात आली आहे. ◻

प्रेम चोप्राला आता त्याच्या व्हीलनगिरीचा अतिशय कंटाळा आला असून आपली इमेज बदलण्याची त्याला इतकी काही घाई झाली आहे की, त्या भरात त्याने त्याला ऑफर करण्यात आलेल्या कित्येक चांगल्या भूमिका नाकारल्या आहेत. कारण एकच की, त्या व्हीलनच्या आहेत, एक व्हीलन म्हणून सिनेमात यशस्वी झालेला प्राण तितक्याच सहजतेनं चरित्रनायकाच्या भूमिकेतही यशस्वी झाला. पण प्रेम चोप्राच्या मते, 'प्राणला मनोजकुमारने 'उपकार'मध्ये भूमिका देऊन चांगला ब्रेक दिला; पण मला कोणीच तसा चान्स देत नाहीत. मला जर कोणी अशी भूमिका दिली तर मी पण ती निश्चितच चांगली करेन आणि लोकांच्या पसंतीस उतरेन' अर्थात प्रेम चोपडाचं हे स्वप्नं प्रत्यक्षात कितपत उतरेल शंकाच आहे कारण 'उपकार'मधील प्राणची पहिलीच चरित्रनायकाची भूमिका प्रेक्षकांनी डोक्यावर उचलून धरली होती तर प्रेम चोप्राला 'जादू टोना'मध्ये पहिल्यांदाच मिळालेल्या अशा प्रकारच्या भूमिकेत त्याचा मात्र सगळ्यांनी पार धुव्वा उडवला होता ! ◻

सौंदर्य आणि अभिनय या दोन्ही आघाड्यांवर रेखाच सर्वश्रेष्ठ असल्याचं 'सिलसिला'नं सप्रमाण सिद्ध केलं तर 'उमराव जान'ला मिळालेल्या बक्षीसानं यावर शिक्कामोर्तब केलं. त्यामुळे रेखा सध्या जमिनीपासून दोन फूट वरून चालत असली तरी या बाबतीतील रेखाची प्रमुख स्पर्धक आहे राखी. नायिकाप्रधान चित्रपटात आजपर्यंत राखी एवढी कोणीच यशस्वी होऊ शकली नाही. अगदी रेखासुद्धा ! आणि हीच खंत सध्या रेखाच्या मनात आहे. अगदी नुकतच उदाहरण म्हणजे 'जीवनधारा ! संपूर्णपणे रेखा भोवतीच फिरणारा हा चित्रपट असून यात रेखाखेरीजही राज बब्बर, अमोल पालेकर, कवलजीत वगैरे गाजलेले नट आहेत. पण तरीही हा चित्रपट यशस्वी हू शकला नाही. याउलट दीपक पराशर, सुरेश ओबेराय, अरुण गोविल यांच्यासारखे सगळे नवोदित नट असूनही 'श्रद्धांजली' हीट झाला तो केवळ राखीच्या बळावर. या आधीही राखीने 'तपस्या सारखा चित्रपट एकटीच्या बळावर यशस्वी करून दाखवला होता. त्यामुळे रेखा सध्या नायिकाप्रधान कथेच्या शोधात आहे.

—शुभदा रानडे